सालअखेर ॥ ७ ॥ १८
किरकोळ अंकास ........................०४

Six monthly............3 " 8 as
Single copy.............................. 4as

नोटिशीबद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
पुढें दर ओळीस ०।०६
दुसरें खेपेस .......०१

Advertisement
Below 10 lines...2 Rs
per line over10... 4 as
Repetition per line 3 as

# वऱ्हाडसमाचार.

# THE BERAR SAMACHAR.

VOL XXVIII AKOLA MONDAY 2 APRIL 1894 NO 13

वर्ष २८ आकोला सोमवार तारीख २ माहे एप्रील सन १८९४ अंक १३

वऱ्हाडसमाचार

मिती फाल्गुन वद्य ११ शके १८१५

## मलकापूरचा आनंदोत्सव.

( वऱ्हाड हायस्कूल माजी विद्यार्थी समाजाचा ७ वा वार्षिक समारंभ. )

गेल्या २१।२२ या दोन तारखांस मलकापूर मुक्कामीं मोठा अपूर्व, टोलेजंग व रमणीय आनंदोत्सव झाला. चालू वर्षाचा समारंभ मागील साही समारंभा पेक्षा विशेष मोठा झाला. सुमारें दोडशे वर लोक बाहेर गांवाहून आले होते. त्यांत दर्यापूर, मेहकर, वाशिम, मुंबई इत्यादि लांबलांबच्या ठिकाणाहून बरीच मित्र मंडळी जमली होती. सर्व समारंभ उमत्त प्रकारें तडीस गेला. जमलेल्या पाहुण्याचा आदरसत्कार अगदीं राजेशाई थाटावर झाला. मंडळी सभास्थळा नजिक येतांच बटुकांची सलामी झाली. नौबदी वाजत होत्याच. मेनवानींचा बेत सोळा आणे होता. गवयांचीं गाणीं झालीं, हरदासांचें कीर्तन झालें, तालीम बाजांच्या कसरतीचे खेळ फार प्रेक्षणीय झाले. आट्यापाट्या व लानटेनिस हे खेळ मंडळी मोठ्या उत्सुकतेनें खेळली. बुद्बुळें, सोंगट्या, पत्ते, गंजिफा वगैरेचे डाव सतत दोन दिवस चालूच असत मोठमोठ्या विषयांवर रसभरीत व्याख्यानें झालीं, वादविवाद झाले व अनेक उपयुक्त ठरावही करण्यांत आले. राव बहादूर श्रीराम भिकाजी जठार हे या समयास भोजनास व पानसुपारीस मंडळीच्या आग्रहास्तव आले होते ह्मणून या समारंभास विशेष शोभा व रमणीयता आली. त्यांच्या भेटी पासून मंडळीस परम अल्हाद वाटला आणि सर्वजण त्यांच्या आगमनानें मोठी कृतकृत्यता व धन्यता मानूं लागले. जी. आय. पी. रेलवेनें या समाजावर मेहरबानी करून त्याच्या सभासदांस निम्या हांशिलावर समारंभास नेण्याचा परवाना दिला. सर्व साधनें अनुकूल झालीं आणि मलकापूरचा भव्य, सुशोभित व शृंगारलेला किल्ला व सभामंडप हे दोन दिवस अगदीं गजबजून गेले होते. आह्मांस कळविण्यास मोठा संतोष वाटतो कीं, मलकापूरच्या लोकांत कांहीं राम आहे. निःसंशय ते लोक पाणीदार आहेत. राजश्री केशवराव दामले, संपतराव देशमुख, कृष्णराव मल्हार, दत्तोपंत व श्रीपतराव कोल्हटकर, चंदुलाल पोस्टमास्तर, विष्णुपंत सावजी, वासुदेवराव पिंपळीकर इत्यादि प्रमुख स्वैसेवकांच्या मनोरम व जीवापाड सेवेबद्दल आह्मी त्यांची तारीफ करितों. त्यांच्या अनुकरणीय कृतीनें समाजाला एके प्रकारें मोठें सामर्थ्य आलें आणि त्याच्या सभासदा पैकीं पुष्कळजणांच्या गुप्त शक्ति प्रचलित झाल्या ही मोठी आनंदाची गोष्ट होय. एकंदरीनें हा समारंभ अत्यंत वर्णनीय झाला आणि आतां मलकापूर वाल्यांनीं सुखेनैव ह्मणावें कीं:—

रचिला ज्याचा पाया त्याची
बरी उभारणी झाली ।।
विघ्ना वाचुनि सर्वहि जुळलें
मनींचि चिंता सरली ।।

राव बहादूर जठार यांस मलकापुरास भरलेल्या समाजा कडून पानसुपारी करण्यांत आली. बुधवारीं अस्तमानाच्या सुमारास राव बहादुराची गाडी सभेकडे येतांना दुरून दिसली तेव्हां सर्व जणांनीं वाजत गाजत राव बहादुरांस सभेंत आणिलें. टाळ्यांचा गजर थांबल्या नंतर त्या समयास उचित अशीं पद्यें रा. रा. व्यंकटेश कृष्ण देसाई वकील, गंगारम आत्माराम सबनीस व दत्तात्रय कृष्ण कोल्हटकर यांनीं गाइलीं त्या वेळीं सर्व सभागृह चित्रा प्रमाणें तटस्थ होतें. नंतर रा. रा. मोरो विश्वनाथ जोशी म्हणाले कीं :— कोणा मनुष्याची स्तुती त्याच्या तोंडावर जाहिर रितीनें करण्याचा अलिकडे परिपाठ आहे. हा शिष्टसंप्रदाय पश्चिमेकडून आपल्या कडे आला आहे त्यालाच अनुसरून रावसाहेबांची रजा घेऊन मी कांहीं बोलतों. रावसाहेबांचा स्वभाव किती सुंदर आहे हें विदितच आहे. रावसाहेबांच्या कारकिर्दीनें डायरेक्टरच्या जागीं नेटीव लायक आहेत हें लार्ड किंबरले यांच्या तोंडून वदविलें. नंतर रावसाहेबांचा वाडिलोपार्जित स्नेहसंबंध व घरोबा कसा होता हें सांगून राजश्री जोशी यांनीं सद्गदित मुद्रेनें आपलें भाषण पुरें केलें. नंतर रा. रा. गणेश श्रीकृष्ण खापर्डे बोलले कीं:—

आजचा प्रसंग पाहिला म्हणजे मन द्विधा होतें. काय हा प्रसंग आनंदाचा! किंवा हा दुःखाचा! एकीकडे पाहिलें म्हणजे ज्या कार्यास्तव राव साहेब स्वदेश सोडून इकडे आले, लहाना पासून मोठ्या पदवी पर्यंत पायरी दरपायरी चढले आणि शेवटीं त्यांनीं सगळ्यांत उच्चस्थान मिळविलें तो सर्व अनुक्रम सिद्ध झाला. ज्या ठिकाणीं पूर्वीं ३१ शाळा असत तेथें आतां १८०० शाळा झाल्या. शेकड्यांनीं मोजले जात होते तेथें आतां हजारांनीं विद्यार्थी मोजले जातात. विद्यालयें खेडोखेडीं झालीं आणि बावीस वर्षांपूर्वीं जर कोणी इंग्रजींत व्याख्यान देण्यास उभा राहिला असतां तर त्याला पाच किंवा दहा इंग्रजी समजणारे श्रोते मोठ्या मारामारीनें मिळाले असते. त्याच ठिकाणीं आतां शेकडो मर्मज्ञ मिळतात. हें सर्व महत्कार्य करून, कीर्ती संपादन करून, सर्वांशीं प्रेम ठेवून, राव साहेब आतां आपल्या घरीं परत जातात तेव्हां हा प्रसंग आनंदाचा असा वाटतो. दुसरी कडे पाहिलें तर ज्या सत्पुरुषांनीं आम्हा सर्वांस लहाना पासून मोठे होई पर्यंत पाहिलें, वेळोवेळीं मदत केली, विद्याभ्यासास उत्तेजन दिलें, लहानपणीं कौतुकानें, मोठेपणीं प्रेमानें, व त्याहून मोठेपणीं मित्राचारानें वागविलें, त्या सत्पुरुषाचा आज वियोग होणार! मी लहान असून पुस्तकें खाकेंटीस मारून शाळेस जातांना राव साहेब कधीं भेटत तेव्हां अभ्यासाची चौकशी करीत. पुढें टक्क करूं लागलों तेव्हां रावसाहेब आनंद मानीत. पुढें युनिव्हरसिटीच्या डिग्री वगैरे मिळविल्या तेव्हां रावसाहेब पुत्रा प्रमाणें आदर करीत आणि प्रसंगोप्रसंगीं जसें वित्त मिळून लोकांत प्रचार होऊं लागला तेव्हां तर ते मित्रा प्रमाणें वागूं लागले. असे हे सत्पुरुष रात्रंदिवस सहवासांत राहून अनंत उपकार करून आज वियोग करणार या मुळें हृदयद्रव्य उकलून जातें. फार दिवस कोंडून ठेविलेले उद्गार जिव्हाग्रीं येतात आणि शोकाचें आवरण फार निबिड होतें. मोठें कार्य करून आलो तर आतां कौतुक कोण करील! आपल्या प्रसन्नतेनें कोण शाबासकी देईल! आणि कोणाचा आनंद आतां उत्तमोत्तम बक्षीसाचे ठिकाणीं मानावा! हे सर्व विचार मनांत येऊन कंठ दाटतो, तेव्हां हा प्रसंग दुःखाचा नव्हे काय?

दुःखांत सुख इतकेंच कीं हा वियोग चिरकालीन नाहीं. रावसाहेबांस इकडे येण्यास प्रसंग आहेत. यांच्या देहाची संतती इकडे अधिकारावर आहे. आपण प्रेमाची संतती आहोंच. लग्नकार्य प्रसंगीं राव साहेब इकडे येतील किंवा आपलें कोणाचें लग्न पुण्यास गेलें तर ते तिकडे काळजी घेण्यास आहेतच. तेव्हां इकडे असलेली औरस व प्रेमाची संतती राव साहेबांचें मन सदैव ओढील व या प्रसंगीं या भावी सुखावर अवलंबून राहिल्या वाचून दुसरा उपाय नाहीं.

या प्रांतांत येऊन राव साहेबांनीं सरकारी रितीनें जें महत्कार्य केलें तें सगळ्यास विदित आहेच. आपल्या लोकांच्या हातुन स्वतंत्रपणानें एक इलाखा चालविण्याचें काम उत्तम रितीनें होऊं शकतें ही गोष्ट राव साहेबांनीं स्पष्टपणें निदर्शनास आणिली ती इतक्या हुषारीनें व कर्तबगारीनें कीं शेवटीं लार्ड किंबरले साहेबांनीं पार्लमेंट मध्येंही स्तुती केली परंतु या विषयीं या ठिकाणीं मी बोलूं इच्छित नाहीं. हा विषय सरकारी व राष्ट्रीय संबंधाचा आहे म्हणून तो सोडून देऊन राव साहेबांच्या राहण्यामुळें समाजावर झालेले उपकारापैकीं थोडे मी सांगतों.

बाहेरून आलेला पुरुष कितीही चांगला असला तरी त्याची विचारसरणी आपल्या पासून भिन्न असल्यामुळें त्याचे व आपले विचारांचें ऐक्य नसतें. आपणास अमूक गोष्ट एका प्रकारची आहे असें वाटलें तर त्यास ती कशी वाटेल अशी सदैव चिंता असते. ही चिंता आपल्या मधील अधिकारी असला ह्मणजे दूर होते. व ती दूर होण्यापासून एका प्रकारचें विचारसातत्य चालतें. या विचारसातत्या पासून मोठा उपकार होतो तो असा कीं नवीन सुधारणा व विचार हे जुन्या पोषाखानें येऊन भेटतात व त्यामुळें ते नवीन व परकी असले तरी ते जुने व स्वकीय आहेत असें मानून आपण त्यांचा स्वीकार करितों व प्रत्येक नवीन विचारास प्रतिबंधक होणारा जो मनुष्यस्वभाव तो आडवा येत नाहीं. याचा परिणामीं समाजावर फायदा सहज रितीनें होऊन न कळत समाजाचें पाऊल पुढें पडत असतें. या गोष्टीचा अनुभव राव साहेबांच्या कारकीर्दींत फार पूर्णपणें आला. राव बहादूर दादेकर इकडे आले तेव्हां त्यांचा कांहीं काल प्रेमसंपादन करण्यांत व समूहाचा विश्वास आपणावर जडवून घेण्यांत गेला परंतु रावसाहेबांस तसा आयास पडला नाहीं. इकडे पूर्वीं पासून असल्यामुळें प्रेम व परिचय होताच तो सहज वृद्धिंगत होत गेला.

दुसरी गोष्ट अशी कीं परदेशी व परकी गृहस्थ अमलदार असला तरी त्याचा व आपला सतत सहवास घडत नाहीं. कारण गृहस्थिती, आचार विचार आणि रितीभाती भिन्न असतात. तो कितीही चांगला असला व केवळ अमृतवृष्टी करीत असला तरी ती वृष्टी परकीयताबुद्धी कायम असल्यामुळें आह्मावर बरोबर सारखी पडत नाहीं व तिचा व्हावा तसा उपयोग होत नाहीं. रावसाहेबांचे येथें असण्यामुळें ही अडचण सहज दूर झाली.

तिसरा फायदा असा कीं रावसाहेबासारख्या महापुरुषाचें वर्तन क्रियाप्रमाणें आपणा पुढें सदैव होतें. त्यांचे निरंतर दर्शनानें व सतत मननानें मनावर आपणास न कळतां दृढ ठसा उमटतो. व आपलें वर्तनही न कळत या ठशास अनुसरून होत असेंत. हा उत्तम उदाहरण डोळ्यासमोर असल्याचा उत्कृष्ठ फायदा आहे. व तो फायदा राव साहेबाशीं निरंतर समागम ज्यांना सुदैवानें घडला त्यांनाच झाला असें नाहीं तर वंशपरंपरा चिरकाल पावेतों हा फायदा सर्वांस मिळत जाईल.

रावसाहेबांची अधिकार चालविण्याची शैली खरोखरच अलौकिक होती. प्रसंगा अंतीं सदैव बरें वाईट ह्मणावें लागतेंच व कोपप्रसाद यथायोग्य वाटावे लागतात. चांगल्यास बक्षीस, वाईटांस शिक्षा या निवडून द्याव्या

लागतात. परंतु रावसाहेबांची पद्धति अशी विलक्षण कीं ज्यास शिक्षा होत असे तोही मनांत असें मानी कीं आपल्यास शिक्षा योग्यच होती व झाली ही अधिक नाहीं. आणि त्याची पूज्यबुद्धि पूर्वीप्रमाणेंच कायम राही. ज्यास बक्षीस मिळालें त्याची कृतज्ञतां बुद्धि वाढे. या उभय कारणानें बरा वाईटाचा मोठा अधिकार असूनही रावसाहेबांची लोकप्रियतेची कला शुक्लपक्षांतील चंद्राप्रमाणें उत्तरोत्तर वाढत राहिली. कांहीं अधिकारी आपला अधिकार योग्य चालवितां यावा ह्मणून लोकांशीं मिसळत नसतात व सदैव दूरदूर राहतात. रावसाहेबांचें असें चातुर्य कीं लोकांत असूनही आपला अधिकार सदैव योग्य रीतीनें चालवीत असावें व त्यापासून वैगुण्य कोणतेंही प्रकारचें उत्पन्न होऊं नये. ही यांची अधिकार चालविण्याची शैली खरोखर फार अनुकरणीय होती.

असो. मी सर्व दिवस बोलत राहिलों तरी रावसाहेबांचे गुणानुवाद संपूर्ण होणार नाहींत व आपणासही ऐकण्याचा कंटाळा येणार नाहीं. परंतु प्रसंगास अनुसरलें पाहिजे आतां रावसाहेबांचें ह्मणणें तर सहज असें होणार कीं:—आह्मी जातो आपल्या गांवा। अमुचा रामराम घ्यावा ॥

ईश्वर मोठा आहे परंतु भक्तांच्या आधीन असतो. राव साहेबांच्या मनांतून हा समारंभ भाषणपद्धति वगैरे न व्हावी असें होतें तथापि आपल्या सर्वांच्या आग्रहास्तव स्वतःचें मन मोडून तें सर्व कबूल केलें. प्रकृति बरी नसल्यामुळें भोजनास येण्याचें मनांत नव्हतें तरी मंडळीचा आग्रह त्यांना मोडवला नाहीं. स्वतांस कष्ट झाले ते सोसून त्यांनीं आपणास पंक्तीचा लाभ दिला याचें स्मरण झालें ह्मणजे प्रेमास पुन्हा पूर येतो आणि अत्यंत शोकाचीं सर्व चिन्हें येऊं लागतात. अशा स्थितींत त्यांना आपण काय उत्तर द्यावें हें सूचत नाहीं. महाभारतांत अठरा दिवसांचें युद्ध संपलें, धर्मास राज्याभिषेक झाला व सर्व सोहळा आटोपल्यावर परमेश्वर पांडवांची रजा मागून द्वारकेस जाऊं लागले त्या प्रसंगांची आठवण होते. राजा धर्मानें ह्मटलें कीं महाराज आपणास जा ह्मणावें तर त्या प्रमाणें मन बोलूं देत नाहीं. रहा ह्मणावें तर आपल्या इच्छे विरुद्ध वागण्यास धैर्य नाहीं. जें युक्त असेल तें करा असें ह्मणावें तर वाणी नीरस होते आणि प्रेम ठेवा असें ह्मणावें तर तो राहणारा नाहीं अशी आशंका असल्याचें दिसतें. तर आतां काय बोलावें हें सूचत नाहीं. ह्मणून मी स्तब्ध राहतो आणि उत्तरास्तव मुकाट्यानें पायावर डोकें ठेवितो. त्याच राजा धर्मांच्या कृतीचें अनुसरण करून मी सर्व समाजा तर्फे आपणास नमस्कार करितो आणि जा अथवा रहा, बोला अथवा नका बोलूं असें कांहींही ह्मणत नाहीं."

त्या नंतर रावबहादुर जठार बोलण्यास उठले तेव्हां टाळ्यांचा गजर झाला. ते म्हणाले कीं:— तोंडावर गौरव करण्याचा जो पाश्चिमात्य लोकांमधील शिष्टसंप्रदाय आहे त्यालाच अनुसरून कांहीं स्तुतीवर पद्यें गाण्यांत आलीं व भाषणेंही झालीं. या वेळीं मला मोठा विचार पडला आहे. काय बोलावें हें कांहीं सुचत नाहीं. गाणीं व भाषणें झालीं त्यांवरून आपलें सर्वांचें मजवरील प्रेम दिसून आलें. आपण आज जें प्रेम दाखविलें असें प्रेम माझ्या आठवणींत नाहीं. मी आपले आभार मानतों हें बोलणें मोठें शीतळ दिसतें. माझ्या मनांत काय चाललें आहे हें माझ्या मनाला ठाऊक. मला बाहेर कांहीं दाखवितां येत नाहीं. आजच्या मंडळीस भेटून मला जो परम आनंद होत आहे तो कांहीं सांगता येत नाहीं. तुमची भेट माझ्या जाण्याच्या वेळेस झाली ही मी मोठी ईश्वराची कृपाच समजतो. या मंडळींपैकीं कित्येकांशीं वडिलोपार्जित स्नेह संबंध आहे. असा आनंदाचा प्रसंग पुन्हा येईल असें वाटत नाहीं. आतां वियोग होणार ह्मणून हा दुःखाचा दिवस वाटतो. या पुढें इतकी सर्व प्रेमाची मंडळी एकदम भेटतील असें मला वाटत नाहीं. सृष्टिक्रमानें वियोग हा व्हावयाचाच तथापि या वेळीं आपल्या गांठी पडल्या ह्याच मी मोठा आनंद मानतों. आपण सर्व आपल्यास प्रेमाची मुलें ह्मणवूनघेतां आणि मोठ्या प्रेमानें मूलपणा घेत आहां तेव्हां मलाही वडिलपणाचा अधिकार चालवावा असें वाटतें. उपदेश करण्याचा माझा बिलकूल अधिकार नाहीं. येथें माझ्यापेक्षां कित्येक अधीक विद्वान आहेत व कित्येक अधीक वयोवृद्धही आहेत. पण सर्व लोक धंद्यांत गुंतले असतात आणि इतर विचार करण्यास त्यास वेळ नसतो. प्रत्येकानें कांहीं अवश्य गोष्टी स्मरण्या सारख्या आहेत त्या मी येथें सांगतों.

( १ ) ईश्वराचें नेहमी स्मरण ठेवा. ईश्वराला स्मरा ह्मणजे नुसतें भजन करा असें मी ह्मणत नाहीं. तसेंच भस्म लाऊन कांहीं धार्मिकपणा येत नाहीं. धर्मवासना मनांत वागली पाहिजे. ती मनांत जागृत राहू द्या ह्मणजे झालें. ईश्वराचे स्मरणाचा हेतु असा आहे कीं आपण नीतीनें वागावें, परोपकारबुद्धि आपल्या मध्यें असावी. आपण सगळे ईश्वराचे प्राणी आहों तेव्हां ईश्वराचें स्मरण ह्मणजे त्याच्या प्राण्यांवर दयार्द्रदृष्टी ठेवणें हें होय.

( २ ) सरकारा विषयीं राजनिष्ठा मनांत बाळगा. एखादे वेळीं राजनिष्ठा विसराल ह्मणून तिला विसरूं नका असें मुद्दाम सांगतो. हे जे आपण वऱ्हाडांत आलो व विद्येचा प्रसार झाला—या गोष्टी सरकार कमी औदार्यवान असतें तर घडल्या नसत्या व आजचा प्रसंग आला नसता. लार्ड किंबरले यांनीं जो आमच्या कामा विषयीं उल्लेख केला तो तसा होईल व पार्लमेंटांत आमचें नांव निघेल असें माझ्या स्वप्नी देखील आलें नाहीं. यावरून इंग्रज सरकार किती न्यायी आहे बरें! त्यांस योग्य वाटेल तेंच करितात हें आपण पक्कें स्मरलें पाहिजे.

( ३ ) हल्लीं प्रमाणें असेच नेहमी जमत जा. आणि तें केवळ गप्पा व मेजवान्या या करितां नको. तुह्मा सगळ्या मध्यें एकी व्हावी हा हेतू ध्यानांत वागवा. मी वऱ्हाडच्या हायस्कूलचा आहे असा प्रत्येकाला अभिमान असावा. नाहीं तर अलिकडे ज्याला त्याला वाटतें कीं मी शहाणा, मी स्वतंत्र आहे. आपण येथें एकत्र जमतां त्यांत कांहीं गृहस्थ विशेष शहाणे आहेत. स्वभावानें चांगले, वर्तनानें गोड, व विद्वत्तेनें जाडी जे आहेत त्यांनीं आपल्या आंगच्या गुणांनीं दुसऱ्याचा फायदा करून द्यावा. उगीच एकानें एक, दुसऱ्यानें दुसरें या प्रमाणें हवे तसे लेख लिहावे हें बरोबर नाहीं. धाकटे व तरुण आहेत त्यांनीं आपली योग्यता समजून असावें. आणि अशा रीतीनें आपणांस जे पाहिजेत ते हक्क मिळतील. आणि एकी नसेल तर सर्वांचेंच नुकसान आहे."

राव बहादूर जठार यांचें मार्मिक पण साधें भाषण आटोपल्यावर हारतुरे, पानसुपारी, अत्तर गुलाब हीं वाटण्यांत आलीं आणि अत्यंत गहिंवरलेल्या स्थितींत श्रीराम नामाचा जयघोष करीत मंडळींनीं राव बहादुरांचा निरोप घेतला.

---

गेल्या २१ वे तारखेस आकोल्यास सर्व वऱ्हाडतर्फे राव बहादूर जठार यांस पानसुपारी झाली. विद्याखात्याचे मुख्य मुख्य अधिकारी बहुतेक मुद्दाम आले होते. या शिवाय इतर नेटीव लोक पुष्कळ जमले होते. लोकप्रिय डेपुटी कमिशनर हेअर साहेब हे अध्यक्षस्थानीं होते. राव साहेब सिताराम विश्वनाथ पटवर्धन हेही या समारंभास हजर होते. सर्व थाट उत्तम होता. सोनेरी अक्षरांच्या कमानी, पोलिस ब्यांड, विद्यार्थिजनांच्या हातांतल्या पुष्पांजली, टाऊनहालांतली रोषनाई व शोभायमान सभास्थान, स्तुतीपर पद्यांचें गायन इत्यादिकांनीं समारंभ उत्कृष्ट झाला पाहिजे होता. परंतु त्या दिवशीं रा. रा. दत्तात्रय विष्णु भागवत बोलले तेव्हां मंडळीचा उल्हास कमी होऊन समयाला रसभंग झाला. वक्त्याची वाणी नीरस वाटली, उक्ती कर्णकटू होत्या, व गुणवर्णन कसेंबसें झालें. त्यांचें भाषण संपल्यावर राव बहादूर उत्तरादाखल बोलले कीं:—'माझ्या साठीं एवढी मंडळी जमली आहे तेव्हां आपणास भेटून मला काय वाटतें हें सांगणें जरूर नाहीं. बाहेर ठिकाणाहून व लांबलांबून लोक आले आहेत त्या सर्वांचा मी फार आभारी आहे. आणि त्यांत विशेषे करून मे० हेअर साहेब हे येथें आले आणि त्यानीं मजविषयीं पूज्यबुद्धि दाखविली त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे. कविता ह्मटल्या गेल्या व भाषण झालें त्या सर्वांत आपण माझा पुष्कळ गौरव केला आहे. त्या गौरवाला मी योग्य आहे असें मला वाटत नाहीं आपण सर्व थोर मनाचे आहां ह्मणून २६।२७ वर्षांचें प्रेम आपलें कायम राहिलें. आपण चांगले व सुजन आहां. खरोखर मी कांहीं केलें नाहीं. कोणीही या अधिकारावर असतां तर त्यानें कांहीं कमी केलें नसतें. आपल्या गौरवाबद्दल मी फार आभारी आहे." नंतर हार तुरे वगैरे वाटल्या नंतर दरबार बरखास्त झाला.

---

रा. ब. जठार अशा पानसुपाऱ्यांस फारसे अनुकूल नाहींत ह्मणूनच त्यांनीं अकोलेकरांच्या अनेक पुनरुक्त निमंत्रणांस मान्यता देण्याचें अनेकवार नाकारलें. शेवटीं मंडळींनीं आपली उत्कट इच्छा रा. सा. देवराव विनायक यांस कळविली तेव्हां आकोलेकरांस आपली खरी प्रीति आणि कृतज्ञता, अत्यान प्रेम व निर्दोष पूज्यबुद्धि व्यक्त करण्याची ही संधि केवळ रा. सा. बाबासाहेबांच्या मध्यस्थीनेंच मिळाली या बद्दल आह्मी त्यांचे फार ऋणी आहोत. बाबासाहेबां सारखे आमचे पुढारी आणि हितैषी असल्यावर काय पाहिजे ? प्रसंग विशेषीं सर्वांवर सारखा विश्वास ठेवल्यानें बाबासाहेबांकडून कधीं कधीं एकतर्फी आचरण घडतें तरी त्यांचे हेतु कधींही स्वार्थपर नसतात व ते नेहेमीं उदार प्रकृतीचे आहेत हें सांगणें ह्मणजे सूर्यास खद्योत प्रकाशानें शोधणें असें आहे. तरी या प्रसंगीं जे त्यांनीं आह्मावर उपकार केले आहेत ते बोलून दाखविल्या शिवाय आमच्यानें रहावलेंच नाहीं. तेच दिवशीं रात्रौ रा. ब. यांस बाबासाहेब यांच्या घरीं सुमारें शंभर मंडळीसह मेजवानी झाली. दुसरे दिवशीं सकाळीं अकरा वाजतां राव बहादुरांस पोंचविण्या करितां स्टेशनवर सर्व लहान थोर मंडळीचे थवेचेथवे जमा झाले व सर्वांस निरोप देत रा. ब. रवाना झाले. ईश्वर त्यांस वृद्धापकाळीं सर्व प्रकारें सुखी ठेवून सुसंपादित विश्रांतीचें चिरकाल सुख देवो अशी त्यांस आमची मनःपूर्वक प्रार्थना आहे.

---

मुंबई पुण्या कडील तीन सद्गृहस्थ थोड्या दिवसांच्या अंतरानें मरण पावले हें कळविण्यास फार दुःख वाटतें:—

(१) ठाण्याचे अरुणोदय पत्रकर्ते लिहितात कीं:— विद्या, उद्योग व बाणेदारपणा या संबंधानें या इलाख्यांतले एक प्रसिद्ध गृहस्थ मि. शंकर पांडुरंग पंडित हे गेल्या १८ वीला मुंबईस मरण पावले. हे पूर्वीं सरकारचे ट्रान्सलेटर होते, रेलवेशीं व मुंबई पोलिसाशीं यांचे तंटे झाल्याचे प्रसिद्धच आहे. हल्लीं ते पोरबंदर संस्थानचे व्यवस्थापक होते. आज कित्येक दिवसांपासून त्यांस क्षयाचा आजार झाल्यामुळें मुंबईस रजेवर होते. वेदार्थयत्न नांवानें जो थोडा भाग प्रसिद्ध झाला तो यांचाच उद्योग होता.

( २ ) राव बहादूर यशवंत वासुदेव आठले एम. ए. एल. एल. बी व बडोद्याचे नायब दिवाण हे मुंबईस आजारी होते ते गेल्या गुरुवारीं निवर्तले. यांच्या तोडीचें विद्वद्रत्न फार विरळा आढळेल ! यांच्या अंगीं परोपकार बुद्धि व विनय हीं अद्वितीय होतीं. युनिव्हर्सिटीचे परीक्षकांत यांच्या सारखे गुणपारखी आम्हास ठाऊक नाहींत.

( ३ ) पुण्यांतील सार्वजनिक कामांत वाखाणलेले व लोकप्रियतेस चढलेले रा. रा. सिताराम हरी चिपळूणकर हे गेल्या बुधवारीं विषमज्वरानें मेले. हे 'ज्ञानप्रकाशा' चे एडिटर होते तेव्हांचे लेख त्यांच्या निस्पृहतेची, विद्वत्तेची व सत्यनिष्ठेची उत्तम साक्ष देतील. सार्वजनिक सभेचे त्रैमासिक पुस्तकही हे काढीत असत.

---

# The Berar Samachar

MONDAY APRIL, 2, 1894

## RAO BAHADUR S. B. JATAR

(Farewell meetings at Malkapur and Akola)

Last week has been a week of leave-taking with Rao Bahadur ShriRam Bhikaji Jatar. To whichever part of the province his duties led him the people flocked in large numbers to say good bye and a marked eagerness could be readily seen in all young men to receive his parting blessing. The High School Ex students gathering mustered strong at Malkapur and invited him to a dinner and Pansupari and would take no denial.

Mr. Jatar by nature averse to all demonstrations, and, at the moment, rendered more so by reason of the function being intended for himself, hesitated longer than he would have otherwise done / But at last the importunities of the young gentlemen, and his admirers prevailed and he accepted the invitation. The dinner was superb in quality, perfect in arragement and unsurpassed in good will, while the Pansupari which followed in the evening carried the enthusiasm to the highest pitch. The few verses composed for the occasion and sung in his honor, were given out with a pathos which we have rarely witnessed. Mr. V. K. Desai, Mr. Kolatkar and Mr. Sabnis recited them in manner exquisite and with feelings so instilled into their voices that the whole of the large audience was nearly moved to tears. Mr. Joshi followed with a few words of introduction and Mr. Khaparde as president of the gathering rose to make the real speech of the evening. It was highly poetical full of touching images & scenes of alternative pleasure and pain, and culminated in an exceedingly effective address of leave-taking A considerably full report of it will be found in another column. The Rao Bahadur replied briefly and gave sound advice in saying goodbye.

While these things were a-doing at Malkapur the rest of the province was not idle. Amraoti sent an invitation to a function which unfortunately for want of time had to be declined. Akola had already secured a day and was very fortunate. On Friday the 23rd instant the Town hall was tastefully decorated, adorned with an arch at the gate and rendered as gay as buntings, devices and clever arragement of nick-nacks could possibly make it. The Police band came in full uniform and discoursed sweet music while the elite from nearly all parts of the province thronged the spacious grounds and hall to say formally goodbye to the honored guest of the evening Our popular Deputy Commissioner Mr. Hare was there early and conversed with a few that were near. The whole scene was very impressive and became more so when Rao Bahadur Jatar accompanined by his successor R. B. S. Patwardhan, appeared at the gate and was conducted by Raosaheb Devarao Vinayak to the raised platform at the western end of the hall.

From this point however, we were very sorry to observe that the arrangemente showed signs of being wanting in finish and nicety. Some who ought never to have been given prominence to were allowed seats on the dais, while many entitled by position, education &c. were accomodated in unnoticed rows, and crowded corners. The versesbegan to drag and Mr. D. V. Bhagvat who rose to speak was found exceedingly unequal to the occasion. Letting alone the faults of the manner the matter embodied in his address showed bad taste. His chief endeavour appeared to be to give brief sketch of the life of the principal guest, and even that was very rough, inperfect, absolutely devoid of any artistic touch and bald in the extreme. If one had got up on purpose to throw cold water on the ardour of the people, he certainly could not have done otherwise. The Rao Bahadur's extreme popularity alone saved the whole from becoming altogether unenjoyable. The reply was naturally brief and cold.

Comparisons are invidious but nobody could help in indulging in them and in proportion to the failure at Akola, the success at Malkapur appeared great. We hope next time our good people of Akola will select a better man to speak for them more especially as this is not his first failure on public occasions. A very distinguished public servant retired on that day to enjoy his well earned rest and we heartly wish him a long life of placid repose varied by occasional activities for the good of the country.

---

The seventh annual meeting of the Berar High-School Ex-students Assosiation came off very successfully on the 21st and 22nd. proxmo at Malkapur. The athletic feats ever exquisitely wonderful. In the Lawn-Tennis matches Amraoti won the game. The आट्यापाट्या and खो खो, (native plays) were very enthusiastically and cheerfully played. The meeting was largely attended by a good number of members from distant places. In a great measure the Railway Concession enhanced the the success of this year's gathring. Of course Mr. J. Garraett, Superintendent of the G. I. P. R Company, Nagpur Division, deserves thanks of the Samaj for granting the kind concession and the prompt manner in which he serves the public. He is an exceptionally popular officer on this Division of the G. I. P. R. and much esteemed by the Railway servants for his courtesy and uprightness.

---

## वऱ्हाड.

राव बहादूर श्रीराम भिकाजी जठार यांनीं गेल्या २४ वे तारखेस आपले कामाचा चार्ज राव साहेब सीताराम विश्वनाथ पटवर्धन यांस दिला आणि ते त्याच दिवसाच्या गाडीनें पुण्यास गेले. स्टेशनवर त्यांस पोंचविण्यासाठीं पुष्कळ लोक जमले होते आणि गाडींत बसतेवेळीं सर्वांनीं त्यांच्यावर पुष्पवृष्टी केली. रावबहादुरांची मूर्ती दृष्टीच्या बाहेर गेली तेव्हां सर्वजण त्यांचे गुण आठवूं लागले आणि असा देव माणूस विरळा असें सर्वतोमुखीं ऐकूं आलें.

राव साहेब सिताराम विश्वनाथ पटवर्धन यांनीं येथील शाळा तपासून पुष्कळ अवश्यक सुधारणा करण्या विषयीं सूचना केल्या. सध्यां ते इकडील विद्या खात्याची माहिती मोठ्या तत्परतेनें मिळवीत आहेत.

कर्नल मेकंझी यांस पेनशन द्यावयाचें होतें पण त्यांस आणखी एक वर्ष चाकरी करण्यास परवानगी मिळाली.

कर्नल स्पान्सकी डेपुटी कमिशनर, बुलडाणा यांस चालूं महिन्यांच्या १५ वे तारखे पासून दोन महिन्यांची हक्काची रजा मिळाली.

कर्नल स्पान्सकी साहेब यांच्या रजेंत श्रीकुमार हरवानजी असिस्टंट कमिशनर यांस बुलढाण्याचे डेपुटी कमिशनरचे जागीं नेमणार असल्या विषयीं प्रमोदसिंधुकर्ते लिहितात.

के० बापूजी यादव यांच्या देवीखात्याच्या सुपरिनटेंडंटच्या कामीं रा. रा. बकाराम पंत यांस नेमिलें.

---

नमुना नंबर १४३

कोणी स्थानापन्न होतां तेव्हां त्यास कर्ज वसूल करितां येण्यासाठीं सरटीफिकीट मिळावें ह्मणून त्यानें जिल्हे कोर्टास अर्ज केल्या विषयीं जाहिरात.

सन १८८९ चा अकट ७ कलम ६ प्रमाणें.

दि. कि. क्लास १९ मिसल नंबर $\frac{४}{१८९४}$

वर्ग १९

डिपुटी कमिशनर साहेब जि० इलिचपूर यांचे कोर्टांत.

नांव बनराज

बापाचें नांव हिरालाल

राहणार सातेगांव ता० दर्यापूर

जिल्हा इलिचपूर यांस मयत

हिरालाल गुलाबचंद बापाचें नांव राहणार सातेगांव तालुके दर्यापूर जिल्हा इलिचपूर यांचे कर्ज वसूल करितां येण्यासाठीं सरटीफिकीट मिळावें ह्मणून सदरहू अर्जदार यानें अर्ज केला आहे त्याज करितां सदरहू मयत मनुष्याचे माल मिळकतीवर किंवा तिचे कांहीं भागावर आपला हक्क आहे ह्मणून ज्या मनुष्याचा दावा असेल त्यास जाहिरातीचे द्वारें कळविण्यांत येत आहे कीं त्याणीं तारीख २० माहे एप्रिल सन १८९४ इ० रोजीं चिखलदरा येथें सदरहू अर्जाची चौकशी होईल त्या वेळीं या कोर्टांत हजर होऊन आपआपले हक्का विषयीं लेखी हकीकत दाखल करावी. तारीख १२ माहे ३ सन १८९४ इ०

C. E. Biddulph

जडज.

---

नादारी मोकद्दमा नंबर $\frac{२९}{१८९३}$

नमुना नंबर (जो)

वि० नादारी कोर्टाचे ज्यडज्य जि० आकोले.

सर्वत्र लोकांस नोटीस देण्यांत येते कीं, बाग्या वा। मान्या माहार राहणार सुकळी परगणे बारशी टाकळी हा नादारी आहे असा आज तारीख ३ माहे जानेवारी सन १८९४ इ. रोजी ठराव झाला आहे. आणि तारीख २८ माहे एप्रिल सन १८९४ हा दिवस नादाराचे सावकारांनीं नेमण्या करितां आणि सावकारांनीं आपले तर्फेचा आसायनी नेमून देण्या करितां व नादारानें आपल्या सुटके विषयीं दिलेल्या अर्जाचा निकाल करण्या करितां नेमिला आहे.

नादाराच्या सुटके संबंधी ज्या सावकाराची तक्रार सांगण्याची इच्छा असेल त्या सर्वांनीं त्या बद्दल आठ आण्याच्या स्टांप कागदावर अर्ज लिहून त्या अर्जानें नोटीस द्यावी त्या नोटीशींत ज्या आधारावरून तक्रार सांगणें असेल ते आणि त्या बद्दल ज्या साक्षीस समन्स करण्याची इच्छा असेल त्या साक्षीदारांचीं नांवें नमूद करावी. ही नोटीस जमण्या करितां नेमलेल्या तारखेच्या निदान तीन दिवस तरी पूर्वीं दाखल केली पाहिजे.

कोर्टांत सावकारांनीं पाहण्या करितां नादारानें दाखल केलेल्या यादी उघड ठेविल्या आहेत.

ज्यास नादारावर दावे नोंदविणें असतील त्याणीं आठ आण्याचे स्टांपावर अर्ज करून त्यांत दाव्याची हकीकत लिहून द्यावी. व ते दावे खरे असल्या बद्दलचे प्रतिज्ञा लेख लिहून त्यावर अर्जदारानें आपली सही केली पाहिजे.

जे सावकार दूरचे राहणार असतील त्यांनीं आठ आण्याचे स्टांपावर दाव्याची हकीकत लिहून एखाद्या जुडिशिअल आफिसरापुढें तिच्या खरेपणाविषयीं शपथ लिहावी आणि ती यादी टपाला कडून कोर्टास पाठवावी ह्मणजे ते दावे रजिष्टरांत दाखल होतील कळावे तारीख २६–३–९४ इ०

B. B. Sule
Judge
Bankruptcy Court
AKOLA

---

## वर्तमानसार.

आजच्या मंगल मूहूर्तावर कोल्हापूरच्या तरुण महाराजास राज्यकारभार करण्याचा पूर्णाधिकार देण्यांत येणार असल्या मुळें, सर्व ठिकाणच्या हिंदुलोकांनीं हा दिवस मोठ्या आनंदाचा करावा.

---

## सर्व नजरबंदांच्या माकडचेष्टांस हाणून पाडतां येतें.

मी रस्त्यांत जेव्हां झोकांडी खात चालत असें तेव्हां लोकांनीं माझ्याकडे बोट दाखवून हिणवावें कीं पहा काय बेटा झिंगून गेलेला आहे आणि प्रथम दर्शनीं तुम्हासही खास त्यांच्या सारखेंच वाटलें असतें. परंतु तें सर्व चुकत होते. भर रस्त्यांत मला चालतांना झोकांड्या येतात ह्मणून आपण मला विचाराल तर त्याचें समर्पक उत्तर देण्यास माझ्या आयुष्यक्रमाचें पूर्व मार्गावर थोडेसें गेलें पाहिजे.

आज तागाईत एखाद्या आनंदी व रंगेल मनुष्याप्रमाणें मी सुखी प्राणी होतो परंतु चार पांच वर्षांपूर्वीं मला वाटूं लागलें कीं माझ्यांत कांहीं कांहीं तरी कमी जास्त होत आहे. जेवतांना पूर्वींसारखी माझी क्षुधा राहिला नव्हती. मला भूक लागे व खाण्याची ईच्छा होई परंतु तोंडांत घास गेला कीं लागलीच पक्वाशय उमळून येई व जसें कांहीं बंडावा करून माझ्या हेतूस हाणून पाडी. हें मला अगदीं नवीनच व त्याचें मला मोठें आश्चर्य वाटे. मी जेव्हां ह्मणून खाण्याचा आव घाली तेव्हां तेव्हां मला फारच तिटकारा येई. कदाचित पोटांत कांहीं अन्न गेलें तर तें अन्न किंवा मांस न वाटतां एखाद्या शिशासारखें जड वाटे त्यामुळें निजायाला जातांना आपल्यास जशी सुस्ती चढून थकवा येतो त्या प्रमाणें मला होत असे. ह्यामुळें रात्रीं झोपेचा कल अगदीं बदलला झोंप थोडी पण चांगली येई. कधीं कधीं बरोबर येत नसे, व धुंद झाल्यासारखें मला वाटे त्यामुळें मी केव्हां केव्हां अफू किंवा इतर अंमली पदार्थ घेत असें. मी जीभ पाहातो तों तिच्यावर थर जमलेला आणि काम करण्याची हौस बिलकूल नाहींशी झालेली असे.

माझ्या बरगड्यांत आणि पाठींत सपाटून दुखत असे व कधीं कधीं ह्या वेदना खांद्यांत भाला टोचल्यासारख्या वाटत. मी आरशांत पाहिलें तों माझे डोळे पिंवळे दिसू लागले. आणि माझ्या दांता व हिरड्या सभोंवती कीट जमलेला दिसे व मुखमार्जन करण्यास पाणी न मिळाल्यामुळें किंवा इतर साधनें दातानवळ नसल्यामुळें माझ्या तोंडाची घाण फारच येई. माझा कोठा फारच जड झाला आणि पक्वाशयांत घाणेरडा वायु उत्पन्न होऊन तोंडावाटे ढेंकर देतांना निघून जाई. ह्या वेळेस मला किती वाईट वाटत होतें हें मी कधीं विसरणार नाहीं ह्या वेळीं रस्त्यांत चालत असतां एकदम घेरी यावी, हलक वाटावें. आणि गरगर फिरल्यासारखें वाटून झोकांड्या देत चालावें व जमिनीवर सबशेल पडून नमस्कार घालावा लागत असे. माझ्यानें हें विघ्न जितकें टाळता येईल तेवढें टाकून

घेई व आतां तें गेलें असें समजून तो दिवस घालवीत असे.

माझ्या मित्रमंडळीनें व वैद्यानें जीं जीं औषधें घेण्यास सांगितलीं तीं घेतलीं त्या पासून गुण न येता मी अगदीं सुदामदेव झालों. व आतां ह्या वस्तीस रामराम ठोकून परलोकचा रस्ता धरावा असे मला वाटूं लागलें ह्या प्रमाणें माझा क्रम चालला होता.

आतां मी तुह्मांस थोडक्यांत निवेदन करतो कीं बरा कसा झाला ह्याचें कारण आपणास कळवावें हें अगदीं रास्त आहे. लंडनांत माझा एक स्नेही होता. त्याच्या कानावर माझी गोष्ट पडल्याबरोबर त्यानें सांगितलें कीं मदर सिगेलचा रोगहारक सिरप (ह्मणचे माता सिगेलचा रोगहारक पाक) तुम्हांस फारच गुणकारी होईल.

माझा कांहीं ह्याच्या ह्मणण्यावर भरंवसा बसेना. परंतु एक बाटली तर थोडे दिवस घेऊन पहावी ह्मणून विचार केला. मला ह्या औषधापासून इतका जल्द गुण आला कीं मला खातांना बरें वाटावें व झोप चांगली यावी. मला हें पथ्यावर पडल्यामुळें इतकें बरें वाटलें कीं मी ह्या औषधाच्या आणखी चार बाटल्या पार केल्या.

मी बरा झालों. हें औषध दैविका सारखें वाटलें. मला खाचित वाटलें कीं हें औषध ईश्वराच्या प्रेरणेनेंच मला मिळालें.

मी आतां पुन्हां ताजा तवाना झालों व त्यामुळें ज्या मला आनंदाच्या उकळ्या फुटल्या त्या सांगता पूर्वत नाहींत. आतां केव्हां तरी थोडेसें अपचन झालें कीं तें सर्वांस होत असेंत, त्या वेळेस मी ह्या औषधाचा लहान घोट घेतो व लागलीच मला त्यापासून आराम वाटतो.

ह्याचा तत्काळ गुण आल्यामुळें मला नजरबंदीच्या खेळाची आठवण होते परंतु खरोखर माता सिगेलचा क्युरेटिव सिरपांत डोळ्यांत माती टाकण्यासारखा कांहीं प्रकार नाहीं. मला अनुभवावरून खात्रीनें सांगता येतें कीं कितीही जुनाट अग्निमांद्य व अजीर्ण अगदीं वाईट स्थितीपासून असो तरी ह्या औषधा पासून हटकून गुण यावयाचाच

मी तुमचा उपकार मानणारा

(सही) जे. सी. सिमसन

२१ ह्यानोवरचा रस्ता, न्यूकास्टल अंडर लाईन, स्टाफर्ड शिंग्लन.

B. T.

NEARLY READY

**CRIMINAL COURT MANUAL.**

*for the*

Hyderabad Assigned Districts

by

Mr. R. Obbard

assisted by

Syed Meer Alum,

Containing the uncancelled Notifications of the Government of India extending Laws and promulgating Local Laws (with reprints of Forest Law, Abkari Rules, Municipal Act, Courts Law, Rules, regulating Legal Practitioners and other Local and Special Laws), the Notifications and rules published under the authority of the extended Laws, the uncancelled Circulars and Orders of the Government of India, Resident, Commissioner, and Judicial Commissioner relating to Crimial matters, and full infoimation in regard to the prescribed registers, returns and forms, to be used in and by Criminial Ccurts, with notes by Mr. R. Obbard, and a copious Index.

PRICE RUPEES 5

Subscriptions registered by Syed Meer Alum at the office of the Civil and Sessions Judge, Amraoti Camp Berar.

नमुना नंबर १४३

कोणी स्थानापन्न होतो तेव्हां त्यास कर्ज दहल करितां येण्यासाठीं सरटिफिकीट मिळावें ह्मणून त्यानें जिल्हे कोर्टास अर्ज केल्या विषयीं जाहिरात.

सन १८८९ चा अक्ट ७ कलम ६ प्रमाणें.

डि. कि. क्लास १९ मिसल नंबर $\frac{३}{१८९४}$

वर्ग १९

डिपुटी कमिशनर साहेब जि० इलिचपूर यांचे कोर्टात.

नांव सेखआमद

बापाचें नांव सेखवजीर मु०

राहणार अंजनगांव ता० दर्यापूर

जिल्हा इलिचपूर यांस मयत

सेखवजीर बापाचें नांव सेखमानू राहणार अंजनगांव तालुके दर्यापूर जिल्हा इलिचपूर यांचे कर्ज वसूल करितां येण्यासाठीं सरटीफिकीट मिळावें ह्मणून सदरहू अर्जदार यानें अर्ज केला आहे त्याज करितां सदरहू मयत मनुष्याचे माल मिळकतीवर किंवा तिचे कांहीं भागावर आपला हक्क आहे ह्मणून ज्या मनुष्याचा दावा असेल त्यास जाहिरातीचे द्वारें कळविण्यांत येत आहे कीं त्याणीं तारीख २० माहे एप्रिल सन १८९४ इ० रोजीं चिखलदरा येथें सदरहू अर्जाची चौकशी होईल त्या वेळीं या कोर्टांत हजर होऊन आपआपले हक्का विषयीं लेखी हकीकत दाखल करावी. तारीख ६ माहे ३ सन १८९४ इ०

C. E. Biddulph

जडज्य.

नमुना नंबर १४३.

कोणी स्थानापन्न होतो तेव्हां त्यास कर्ज वसूल करितां येण्यासाठीं सरटिफिकीट मिळावें ह्मणून त्यानें जिल्हे कोर्टास अर्ज केल्याविषयीं जाहिरात.

सन १८८९ चा अक्ट ७ कलम ६ प्रमाणें.

दि. कि. क्लास १९ मिसल नंबर $\frac{८}{१८९४}$

विद्यमान सिव्हील जडज्य साहेब जिल्हा यांचे कोर्टात.

नांव मदनगोपाळ

बापाचें नांव मोतीलाल मारवाडी

राहणार दानापूर ता० अकोट

जि० अकोला यांस मयत

मोतीराम बापाचें नांव सदाराम राहणार दानापूर तालुके अकोट जिल्हा अकोला यांचें कर्ज वसूल करितां येण्या साठीं सरटीफिकीट मिळावें ह्मणून सदरहू अर्जदार यानें अर्ज केला आहे त्याज करितां सदरहू मयत मनुष्याचे माल मिळकतीवर किंवा तिचे कांहीं भागावर आपला हक्क आहे ज्या मनुष्याचा दावा असेल त्यास जाहिरातीचे द्वारें कळविण्यांत येत आहे कीं त्याणीं तारीख १६ माहे एप्रिल सन १८९४ इ० रोजीं सदरहू अर्जाची चौकशी होईल त्या वेळीं या कोर्टांत हजर होऊन आपआपले हक्का विषयीं लेखी हकीकत दाखल करावी. तारीख २७ माहे मार्च सन १८९४ इ०

V. N. Dandeker.

सिव्हील जडज्य.

नादारी मोकदमा नंबर $\frac{२४}{१८९३}$

नमुना नंबर (जी)

वि० नादारी कोर्टाचे ज्यडज्य जि० अकोले

सर्वत्र लोकांस नोटीस देण्यांत येते कीं, निंब्या वा॥ झिंगऱ्या माहार राहणार सुकळी हा नादारी आहे असा आज तारीख २१ माहे जानेवारी सन १८९४ इ० रोजी ठराव झाला आहे. आणि तारीख २८ माहे एप्रिल सन १८९४ हा दिवस नादाराचे सावकारांनीं नेमण्या करितां आणि सावकारांनीं आपले तर्फेचा आसायनी नेमून देण्या करितां व नादारानें आपल्या सुटके विषयीं दिलेल्या अर्जाचा निकाल करण्या करितां नेमिला आहे.

नादाराच्या सुटके संबंधी ज्या सावकाराची तक्रार सांगण्याची इच्छा असेल त्या सर्वांनीं त्या बद्दल आठ आण्याच्या स्टांप कागदावर अर्ज लिहून त्या अर्जानें नोटीस द्यावी त्या नोटीशींत ज्या आधारावरून तक्रार सांगणें असेल ते आणि त्या बद्दल ज्या साक्षीस समन्स करण्याची इच्छा असेल त्या साक्षीदारांचीं नांवें नमूद करावी ही नोटीस नमण्या करितां नेमलेल्या तारखेच्या निदान तीन दिवस तरी पूर्वीं दाखल केली पाहिजे.

कोर्टांत सावकारांनीं पाहण्या करितां नादारानें दाखल केलेल्या यादी उघड ठेविल्या आहेत.

ज्यास नादारावर दावे नोंदविणें असतील त्याणीं आठ आण्याचे स्टांपावर अर्ज करून त्यांत दाव्याची हकीकत लिहून द्यावी. व ते दावे खरे असल्या बद्दलचे प्रतिज्ञा लेख लिहून त्याजवर अर्जदारानें आपली सही केली पाहिजे.

जे सावकार दूरचे राहणार असतील त्यांनीं आठ आण्याचे स्टांपावर दाव्याची हकीकत लिहून एखाद्या जुडिशिअल आफिसरापुढें तिच्या खरेपणाविषयीं शपथ लिहावी आणि ती यादी टपाला कडून कोर्टास पाठवावी ह्मणजे ते दावे रजिष्टरांत दाखल होतील कळावे तारीख २६-३-९४ इ०

B. B. Sule
Judge
Bankruptcy Court
AKOLA

नोटीस

बजी मर्दे तुकाराम राहणार पंडली अगर ह्मसोबाचें दोनद तालुके मुर्तिजापुर इजला:—

या नोटिशीनें कळविण्यांत येते कीं, तूं तारीख १६ मार्च सन १८९४ इसवीच्या 'प्रमोदसिंधू' तून नोटीस दिलीस ती पोंचली. त्यांतील सर्व मजकूर खोटा आहे. मी तुला सोडलें नाहीं. मी तुला नांदविण्यास तयार आहे. मुलीला देवाच्या पायावर घालून नवस फेडावा ह्मणून माझी आज्ञा घेऊन गेलीस. आतां असें दिसतें कीं, तो तुझी लबाडी होती. तुझा भाऊ नामें सुऱ्या वल्द यशवंत हा तुला फटिंगपणानें वागत असतांही कसा आसरा देतो हें मला समजत नाहीं. तूं कोणा लबाड इसमाच्या नादीं भरून ही नोटीस दिली आहेस. तूं माझ्या इच्छे विरुद्ध बाहेरगांवीं राहतेस ह्मणून मी तुला अन्नवस्त्रा बद्दल कवडी देखील देणार नाहीं.

ही नोटीस पोंचतांच तात्काळ माझ्या घरीं येऊन संसार करावा. तूं नीट चालीनें इतके दिवस राहिलीस अशी माझी व पंचाची खात्री करून द्यावी आणि या पुढें सरळ वागशील अशी व्यवस्था ठेवावी. दुसरा वरठाव करशील तर तुजवर व पाटाच्या नवऱ्यावर फौजदारी करून कोर्टांत तुह्मां दाघांची व तुमच्या साथीदारांची खोडकी मोडीन. जाते वेळीं सुमार २०० रुपये किंमतीचा दागदागिना अंगावर घालून गेली आहेस. तोही परत येते वेळीं घेऊन यावा. तसें न केल्यास त्या बद्दल तुझा व तुला फूस देणाऱ्यांचा कोर्ट मार्फत योग्य जबाब घेतला जाईल. अन्नवस्त्रा करितां कर्ज काढलें ह्मणतेस तें सर्व खोटें आहे. तुझ्या खोड्या व गैरशिस्त वागणुकीं बद्दल मी तें कर्ज बिलकूल देणार नाहीं. तूं या आठ दिवसांत न आलीस तर तुला ताब्यांत घेण्या साठीं दिवाणींत फिर्याद करून तुला ताब्यांत घेतलें जाईल. फंद तुझे काडीमात्र चालणार नाहींत. कळावें. तारीख २९ माहे मार्च १८९४ इसवी.

(सही)

तुकाराम वा। उकाजी पवार जात बंजारी राहणार भामोद तालुके दर्यापूर निशाणी वखर.

नोटीस

सय्यद कासम उर्फ गबू मियां वल्द मीर गजफरअली जहागीरदार मौजे टाकळी व कठोरा राहणार नांदगांव पेठ तालुके व जिल्हे उमरावती यांस मी खाली सही करणार इजकडून अशी नोटीस देण्यांत येते कीं सदरहु जहागीरीची वहिवाट वगैरे पूर्वी पासून तुमचे कडे असून तुह्मी त्या जहागिरीची तहसील वसूल करून घेत आहा. व प्रत्येक हिस्सेदारास हिशा प्रमाणें बटवाडा करून देत होता. त्या जहागीरीत माझे वाटणीचा एक आण्याचा ताबा व हिस्सा आहे. त्याचे उत्पन्न गेल्या दोन वर्षांपासून दिलें नाहीं ह्मणजे सन १८९२ व १८९३ या दोन वर्षांचा माझे हिश्याचा पैसा आपलेकडे जमा आहे तर तुह्मी तो पैसा माझा मला [illegible] पोंहचता केला पाहिजे. आणि आज तारखे-पर्यंत तुमचेकडे तुंबलेला पैसा तुह्मी ही नोटीस पावल्या तारखे पासून आठ दिवसाचे आंत माझे घरीं आणून देऊन चुकती पावती घेऊन जावी तसें न केल्यास कायद्या प्रमाणें तजवीज केली जाईल.

(सही)

न्यामुबी मर्दे सय्यद महमद जहागीरदार तर्फे मुखत्यार महेबुबलां.

☞ हें पत्र आकोलें येथें कै० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

साळअखेर " ७ " १८

किरकोळ अंकास ..........८४

नोटिशीबद्दल.

१० ओळीचे आंत रु० १

पुढें दर ओळीस ८१८६

दुसरे खेपेस ......८१

Six monthly..........3 " 8 as.

Single copy.......................... 4as

Advertisement.

Below 10 lines.. 2 Rs

per line over10... 4 as

Repetition per line 3 as

# वऱ्हाडसमाचार.

# THE BERAR SAMACHAR.

VOL XXVIII AKOLA MONDAY 9 APRIL 1894 NO 14

वर्ष २८ आकोला सोमवार तारीख ९ माहे एप्रील सन १८९४ अंक १४


## सर्व नजरबंदांच्या माकडचेष्टांस ह्मणून पाडतां येतें.

मी रस्त्यांत जेव्हां केव्हांही खात चालत असें तेव्हां लोकांस माझ्याकडे बोट दाखवून हिणवावें कीं पहा काय वेडा झिंगून गेलेला आहे आणि प्रथम दर्शनीं तुम्हांसही खास त्यांच्या सारखेंच वाटलें असतें. परंतु तें सर्व चुकत होतें. मी रस्त्यांत मला चालतांना लोकांच्या येतात ह्मणून आपण मला विचाराल तर त्याचें समर्पक उत्तर देण्यास माझ्या आयुष्यक्रमाचें पूर्व मार्गावर थोडेसें गेलें पाहिजे.

आज तागाईत एखाद्या आनंदी व रंगेल मनुष्याप्रमाणें मी सुखी प्राणी होतो परंतु चार पांच वर्षांपूर्वी मला वाटूं लागलें कीं माझ्यांत कांहीं कांहीं तरी कमी जास्त होत आहे. जेवतांना पूर्वीसारखी माझी क्षुधा राहिला नव्हती. मला भूक लागे व खाण्याची इच्छा होई परंतु तोंडांत घास गेला कीं लागलीच पक्काशय उमळून येई व जसें कांहीं कंडावा करून माझ्या हेतूस ह्मणून पाडी. हें मला अरिष्ट नवीनच व त्याचें मला मोठें आश्चर्य वाटे. मी जेव्हां ह्मणून खाण्याचा आव घाली तेव्हां तेव्हां मला फारच तिटकरा येई. कदाचित पोटांत कांहीं अन्न गेलें तर तें अन्न किंवा मांस न वाटतां एखाद्या शिशासारखें जड वाटे त्यामुळें निजायला जातांना आपल्यास जशी सुस्ती चढून थकवा येतो त्या प्रमाणें मला होत असे ह्यामुळें रात्री झोपेचा कल अगदीं बदलला झोप थोडी पण चांगली येई. कधीं कधीं बरोबर येत नसे, व धुंद झाल्यासारखें मला वाटे त्यामुळें मी केव्हां केव्हां आफू किंवा इतर अंमली पदार्थ घेत असें. मी जीभ पाहातो तें तिच्या वर थर जमलेला आणि काम करण्याची हौस बिलकूल नाहींशी झालेली असे.

माझ्या बरगड्यांत आणि पाठींत सणाटून दुखत असे व कधीं कधीं ह्या वेदना खाद्यात मला टोचल्यासारख्या वाटत. मी आरशांत पाहिलें तों माझे डोळे पिवळे दिसू लागले. [illegible] माझ्या दांतां व हिरड्या सभोंवती कीट [illegible] दिसे व मुखमार्जन करण्यास पाणी न मिळाल्यामुळें किंवा इतर साधनें दंत जवळ नसल्यामुळें माझ्या तोंडाची घाण फारच येई. माझा कोठा फारच जड झाला आणि पक्काशयांत घाणेरडा वायू उत्पन्न होऊन तोंडावाटे ढेंकर देतांना निघून जाई ह्या वेळेस मला किती वाईट वाटत होतें हें मी कधीं विसरणार नाहीं ह्या वेळीं रस्त्यांत चालत असतां एकदम घेरी यावी, हलक वाटावें. आणि गरगर फिरल्यासारखें वाटून झोकांड्या देत चालावें व जमिनीवर सपशेल पडून नमस्कार घालावा लागत असे. माझ्यानें हें विघ्न जितकें टाळतां येईल तेवढें टाळून येई व आतां तें गेलें असें समजून तो दिवस घालवीत असें.

माझ्या मित्रमंडळानें न वैद्यानें जीं जीं औषधें घेण्यास सांगितलीं तीं घेतलीं त्या पासून गुण न येतां मी अगदीं सुद्धां मंदच झालों. व आतां ह्या वस्तीस रामराम ठोकून परलोकचा रस्ता धरावा असें मला वाटूं लागलें ह्या प्रमाणें माझा क्रम चालला होता.

आतां मी तुह्मांस थोडक्यांत निवेदन करतो कीं बरा कसा झाला ह्याचें कारण आपणास कळवावें हें अगदीं रास्त आहे. लंडनांत माझा एक स्नेही होता. त्याच्या कानावर माझी गोष्ट पडल्याबरोबर त्यानें सांगितलें कीं मदर सिगेलचा रोगहारक सिरप (ह्मणजे माता सिगेलचा रोगहारक पाक) तुम्हांस फारच गुणकारी होईल.

माझा कांहीं ह्याच्या ह्मणण्यावर भरंवसा बसेना. परंतु एक बाटली तरी थोडे दिवस घेऊन पहावी ह्मणून विचार केला. मला ह्या औषधापासून इतका जल्द गुण आला कीं मला खातांना बरें वाटावें व झोप चांगली यावी. मला हें पथ्यावर पडल्यामुळें इतकें बरें वाटलें कीं मी ह्या औषधाच्या आणखी चार बाटल्या पार केल्या.

मी बरा झालों. हें औषध दैविका सारखें वाटलें. मला खचित वाटलें कीं हें औषध ईश्वराच्या प्रेरणेनेंच मला मिळालें.

मी आतां पुन्हां ताजा तवाना झालों व त्यामुळें ज्या मला आनंदाच्या उकळ्या फुटल्या त्या सांगतां पुरवत नाहींत. आतां केव्हां तरी थोडेसें अपचन झालें कीं जें सर्वांस होत असतें, त्या वेळेस मी ह्या औषधाचा लहान घोट घेतो व लागलीच मला त्यापासून आराम वाटतो.

ह्याचा तत्काळ गुण आल्यामुळें मला नजरबंदीच्या खेळाची आठवण होते परंतु खरोखर माता सिगेलचा वनस्पति सिरपात डोळ्यांत माती टाकण्यासारखा कांहीं प्रकार नाहीं. मला अनुभवावरून खात्रीनें सांगतां येतें कीं कितीही जुनाट अग्निमांद्य व अजीर्ण अगदीं वाईट स्थितींत असून असो तरी ह्या औषधा पासून हटकून गुण यावयाचाच

मी तुमचा उपकार मानणारा

(सही) जे. सी. सिमसन

२१ ह्यानोवरचा रस्ता, न्यूकासल अंडर लाईन, स्टाफर्ड शिरलन.

B. T.

## विजया दशमीचें सोनें

(११ व्या अंकावरून चालू)

We paused beside the pools that lie
Under the forest bough;
Each seem'd as 'twere a little sky
Gulf'd in a world below;
A firmament of purple light
Which in the dark earth lay,
More boundless than the depth of night
And purer than the day—
In which the lovely forests grew
As in the upper air,
More perfect both in shape and hue
Than any spreading there.
There lay the glade and neighbouring lawn,
And through the dark green wood
The white sun twinkling like the dawn
Out of a speckled cloud.

पादप विटपा खालीं स्वच्छ जलाशय
सुरम्य जें होतें ॥
प्रतिबिंबित गगनानें लघु तेजःपुंज
वाटले हो ! तें ॥ २२ ॥
सुरुचिर नीलरोहित वर्णाचें पात्र
कृष्ण भूवरिया ॥
प्रत्येक लघुजलाशय ! बसलें फिरलों
सरस्तटावरि या ॥ २३ ॥
रजनिहूनि विपुल गहन दिनहूनिहूनि
तत्प्रभा दिसे अगळी ।
प्रतिबिंबित करि सर्वहि उपकंठी जें;
न एक ही वगळी ॥ २४ ॥
सुमनोहर वनराजी, तेथें तरुगर्भपुष्प–
फल–वृंद ।
अविकाचि मोहक; दिसेत तदाकृति वर्ण
कांति बहु सुखद ॥ २५ ॥
येथें दिसे वनदरी– येथें हें रान
(जें समीप असे) ।
कृष्ण हरिद्वनराजीतुनि रविचें बिंब
पांढरें विलसे ॥ २६ ॥
मेघच्छटाक्रमित दिग्भाग उषःकाळ
जेवि चित्रछवि ।
कंपित पर्णी दिनकर; अभिनव शोभा
जलीं दिसे तरुंचि ॥ २७ ॥

वऱ्हाडसमाचार

मिती चैत्र शुद्ध ३ शके १८१५

उमरावतीस गेल्या महिन्यांत 'सुहृत्समाजा' ची व्याख्यानमाला झाली त्यांत रा. रा. मोरो विश्वनाथ जोशी यांचें 'अप्रतिबंधक व्यापार' या विषयावर संभाषण झालें. व्याख्यान फार सुश्राव्य व सुबोध होतें. याचा गोषवारा येणें प्रमाणें:—

रा. रा. जोशी यांनीं आरंभी विचार कळविण्याची सुरुवात समाजानें अशी सवीस उचित संधी आणून दिली ह्मणून समाजाचे आभार मानून विषयास सुरवात केली. 'अप्रतिबंध व्यापार' ह्मणजे व्यापारावर कोणतेही रीतीचा प्रतिबंध नसणें अशी व्याख्या देऊन ते मालाच्या किंमती कशा बदलतात इकडे वळले. एका देशांतील व्यापाराचे संबंधानें विचार करितां मालाची किंमत तो उत्पन्न करण्याकरितां लागणाऱ्या श्रमाप्रमाणें असते अप्रतिबंध व्यापार ह्मटला ह्मणजे दोन किंवा जास्त देशांमधील व्यापार. व दोन किंवा जास्त देशांतील व्यापाराचे संबंधानें विचार करितां मालाचे किंमती संबंधानें जो वर नियम दिला आहे त्यांत थोडा फरक करावा लागतो. फरक ह्मणून इतकाच कीं मालाची किंमत तो उत्पन्न करण्याचा खर्च व तो एका देशांतून परदेशांत नेण्यास लागलेला खर्च या बरोबर असते. कोणत्याही देशाचा इतर देशाशीं व्यापार जो होतो तो देशाला फायदेशीर असण्याला मुख्य गोष्ट ही असली पाहिजे कीं त्या देशाचा आलेला माल गेलेल्या मालापेक्षां किंमतीनें कमी असला पाहिजे कारण त्यामुळें त्या देशांत तितका पैसा येणें होतो. हिंदुस्थानाचे स्थितीचा विचार करितां आलेला माल गेलेल्या मालापेक्षां कमी असतो खरा! सन १८७५ पासून १८९२ पर्यंतचे आंकड्यावरून असें दिसतें कीं आलेला माल सुमारें दुपटीनें वाढला आहे. परंतु गेलेला सुमारें शेंकडा ८५ या रीतीनें वाढला आहे. या वरून वरवर हिंदुस्थानची फार उत्तम स्थिति वाटते. पण ही भ्रांति आहे. याचें कारण अर्थशास्त्रावरहिरचें आहे. होमचार्जेसचा वाढता बोजा, पेन्शनें, हुंडणावळ, लष्करीखर्च, हिंदुस्थानचे तिजोरीचा बोजा आणि नेहमीं वाढणारें कर्ज यामुळें हिंदुस्थान इतका गांजून गेला आहे कीं अर्थशास्त्राचे नियमा प्रमाणें जरी देशाची उत्तम स्थिती आहे तरी या थोडक्यामुळें त्याला वर डोकें काढतां येत नाहीं. इतकें सांगून रा. रा. जोशी हे अप्रतिबंध व्यापार चांगला आहे किंवा नाहीं या कडे वळले. या संबंधानें हिंदुस्थानानें कोणता पक्ष स्वीकारावा याचा उलगडा न करतां त्या संबंधानें साधक बाधक कारणें कोणतीं हीं त्यांनीं सांगितलीं हिंदुस्थानचे संबंधानें त्यांनीं सांगितलें कीं आह्मास जरी एक पक्ष चांगला वाटला तरी तो स्वीकारणें आमचे हातीं नाहीं.

व्यापार अप्रतिबंध ठेविल्यानें पुष्कळ फायदे होतात:– एक तर जिनसाची किंमत त्याला उत्पन्न करण्याचे श्रमावर अवलंबून राहते. जकात नसल्या कारणानें श्रम व नेण्या आणण्याचा खर्च या शिवाय माल घेणारास जास्त किंमत पडत नाहीं व या मुळें जिनसा स्वस्त मिळतात. दुसरें श्रम विभागामुळें ज्या देशांत जे जिन्नस होतात तेच जिन्नस उत्पन्न होत गेल्यानें लोकांना जिन्नस तयार करण्यास सोपें जातें. व जिन्नस ही चांगले होतात. तिसरें व्यापार व अनेक देशांशी चढाओढ लागल्या कारणानें जिन्नस अधिक स्वस्त रितीनें तयार करण्याची चढाओढ लागते या रीतीनें यंत्रादिकांच्या कल्पना निघतात. चवथें–देशांचा एकमेकांशीं व्यापार वाढल्यामुळें दळण वळण जास्त होतें व त्यामुळें देशांचा जास्त निकट संबंध होतो. व पांचवें– परस्पर भिन्न राष्ट्रामध्यें एकी वाढते.

व्यापारावर मालक कराच्या रूपानें प्रतिबंध कां ठेवावे या विषयीं बहुशा खालील कारणें दिलीं जातात:—

पहिलें—देशांतील उद्योग व व्यापार बाल्यावस्थेंत असतील तर ते वाढत जातात प्रतिबंधन ठेविलें तर हे व्यापार बसतील व असा देश दुसऱ्या देशाशीं टक्कर मारण्यास कधीं समर्थ होणार नाहीं. दुसरें—एकच देश सतत एकच जिन्नस किंवा एका प्रकारचे जिन्नस उत्पन्न करित गेल्यानें एकमार्गी होतो. वैचित्र्य कांहीं राहत नाहीं व अशा रितीनें एक देश दुसऱ्या देशावर अवलंबून राहतो व लढाई किंवा दुसऱ्या कांहीं गोष्टींनीं दुसऱ्या देशांनीं माल धाडणें बंद केलें तर देशांत ते जिन्नस उत्पन्न करण्याचें साधन नसल्या कारणानें देशाची धांदल उडून जाते. प्रसंग विशेषीं उपासमार होण्याचाही प्रसंग यावयाचा. पहिलें कारण नेहेमीचें नाहीं व उद्योग धंदे अगदीं बाल्यावस्थेंत असले तर व्यापारावर कांहीं रितीनें प्रतिबंधन असणें रास्त होईल. परंतु ही बाल्यावस्था निघून गेल्यावर प्रतिबंध ठेवण्याची जरूरी राहणार नाहीं. दुसऱ्या कारणा संबंधानें ववतां देशांत थोडे बहुत सर्व जिन्नस होत असावे हें ही इष्ट आहे. निदान जो पर्यंत जगामधून लढाई नाहींशी होणार नाहीं तो पर्यंत तरी यांची जरूरी आहे. पुढे नाहीं. एकंदरीत तत्वदृष्ट्या विचार करितां व्यापारावर प्रतिबंध असणें चांगलें नाहीं. परंतु कांहीं विशिष्ट स्थितींत कांहीं प्रमाणावर ते असले तर चालतात इतकेंच नाहीं तर फायदेशीरही होतात. व जग सुधारून जाऊन सर्व लोक आपणास बंधु मानूं लागतील व हें लवकर घडून येणें यांतच लोकांचें हित आहे. हा सिद्धांत मान्य असला तर अप्रतिबंध व्यापार अशी स्थिती आणणारें एक मोठें साधन आहे. रा. रा. गणपतराव खापर्डे यांनीं आपले सरशेवटचें भाषणांत हींच तत्वें जास्त स्पष्ट व सुगम केलीं. याच विषयावर राव बहादूर महादेव गोविंद रानडे यांनीं दिलेल्या व्याख्यानाचा उल्लेख केला. व्यापारावर प्रतिबंध असणें कांहीं प्रसंगीं किती योग्य असतें व हिंदुस्थाना संबंधानें फायदेशीर होईल हें त्या व्याख्याना वरून स्पष्ट कळण्या सारखें आहे. बहुतेक सर्व राष्ट्रांतून मालावर कमी जास्त प्रमाणानें कर आहेत व या रीतीनें जो पर्यंत सर्व राष्ट्रांनीं अप्रतिबंध व्यापाराचें तत्व अंमलांत आणलें नाहीं तों पर्यंत एका राष्ट्रानें तें तत्व अंमलांत आणणें फायदेशीर नाहीं.

---

गेल्या शिमग्याच्या सणात मलकापुरास 'वऱ्हाड हायस्कूल माजी विद्यार्थी समाजा' ची सभा भरली होती त्या वेळीं मुख्य तीन चार उपयुक्त विषयावर विवेचन झालें. वऱ्हाडांत विद्यादानाकडे सरकार पैसा थोडा खर्च करिते आणि तो इतका कमी आहे कीं, मुंबई इलाख्या सारख्या पुढें सरसावल्या विद्यापीठाच्या ठिकाणीं सरकारी उत्पन्नांतून ज्या प्रमाणानें विद्यादानाकडे खर्च होतो तितकें प्रमाण या मागसलेल्या व अडाणी मुलुखांत नाहीं. ही गोष्ट अत्यंत शोचनीय असून हल्लींची काटकसरीची विद्याखात्याची पद्धति अत्यंत घातुक होत चालली आहे. या सर्व गोष्टी लक्ष्यांत घेऊन समाजानें एक कमिटी नेमिली आणि प्रांतिक सरकाराकडे या बाबतींत अर्ज करण्याचें काम कमिटीकडे सोंपविलें. राव बहादुर जठार व राव साहेब पटवर्धन या उभयतांस काटकसरीची पद्धत मान्य नाहीं. तेव्हां या समाजाच्या ठरावास राव साहेब पटवर्धन यांचा चांगला जोरा मिळेल अशी उमेद आहे.

दुसरा विषय वऱ्हाडांतील सरकारी चाकरी संबंधानें होता. त्यावर असा ठराव झाला कीं वऱ्हाडांत सरकारी नोकरींत शिकलेल्या लोकांचा व्हावा तसा प्रवेश होत नाहीं तरी सरकारास असा अर्ज करावा कीं मुंबई वगैरे प्रांतांतल्या प्रमाणें या प्रांतांत सरकारी नोकरांच्या योग्यते संबंधानें कांहीं नियम ठरवून त्या नियमानुसार जागा भरीत जाव्या व तसेंच अमूक वर्षें राहिल्या खेरीज उमेदवारांस अमूक खात्यांत जागा देऊं नये अशा संबंधानें असलेल्या सरक्युलराची योग्य अंमलबजावणी होत जावी.

तिसरा प्रश्न डाक्टर भांडारकर यांनीं हिंदु ग्रजुएट लवकर मरण्याचीं कारणें गेल्या पदवीदानाच्या समारंभाच्या वेळीं सांगितलीं त्याज बद्दल समाजाचें मत कळविण्या विषयींचा होता. डाक्टर भांडारकर यांच्या मतें पारशी ग्रजुएट मंडळींत तीन गोष्टी नाहींत अशा हिंदु ग्राजुएट मंडळींत आढळतात आणि त्या कारणांनीं मरणाची संख्या वाढते. हीं कारणें म्हणजे व्यायामाभाव पौष्टिक अन्नाचा अभाव व बालविवाह हीं आहेत. राजश्री बापट, खोलकुटे, जोशी खापर्डे इत्यादिकांचीं सुरस भाषणें झालीं. अगोदर मरणाचें प्रमाण अधीक आहे ही गोष्ट एकंदर लोकसंख्येच्या मानानें खरी ठरते कीं काय असा प्रश्न मंडळीस घातला आहे. शिवाय मंडळीच्या मतें विद्यार्थ्यांचें दारिद्र्य व शक्तिहारक व शरीरास पिळून काढणारी चुकीची शिक्षणपद्धती हीं कारणें दर्शविण्यांत आलीं. हा विषय खाजगी विचारावर सोंपविला असून प्रत्येकानें आपापला लेखी अभिप्राय जनरल सेक्रेटरी रा. रा. गोपाळ वामन बापट यांस कळवावा असें ठरविण्यांत आलें.

चवथा व पांचवा ठराव वऱ्हाडच्या वकिली संबंधानें होते. वऱ्हाडस्थ एल. एल. बी. पसार झालेल्या गृहस्थास वकिलीची परवानगी असावी आणि म्याट्रिक्युलेशन परीक्षेची अट जुन्या परीक्षेस बसलेल्या उमेदवारास लागूं करू नये. हा ठराव समाजा मार्फत स्थानिक सरकारास धाडण्यांत येईल.

खामगांव अगर धामणगांव येथें पुढील वर्षाची सभा भरेल पण कांहीं कारणानें तसें न च जुळलें तर आकोल्यास सभा होईल असा शेवटील ठराव झाला.

---

रेलवे कंपन्या तिसरे क्लासच्या उतारूच्या सोयीकडे कांहीं लक्ष पुरवीत नाहींत आणि सरकार त्यांच्यावर त्याविषयीं कांहीं जोरा चालवीत नाहीं. ही गोष्ट उभयतास लांछनास्पद आहे. प्रजेचें हिताहित पाहणें हें सरकारचें काम आहे परंतु तें जेथें परभारें दुसऱ्या कडून करून घ्यावयाचें तेथें देखील आमच्या सरकारची छाती होत नाहीं. तिसरे क्लासच्या गाडींत लघवीची सोय नसते. ही अडचण इतर शेंकडो गैरसोयी पैकीं मुख्य आहे. तिसरे क्लासचे उतारू म्हणजे निवळ मेंढरें समजतात. त्यांचा वाली कोणी नाहीं ज्यांस सरकारपाशीं दाद मागतां येते ते लोक वरच्या क्लासांतून प्रवास करणारे असतात. तेव्हां दाद घेणारा तयार नाहीं इतकेंच नाहीं तर सरकारापर्यंत ओरड पोंचविणाराही कोणी मिळत नाहीं. थोडे दिवसांपूर्वीं एक शोचनीय हृदयद्रावक प्रकार घडला. एका उतारूंस लघवीस लागली. लघवीची तांतडी फार लागली. गाडींतून उतरून लघवी करण्यास कोठें अवसर मिळेना. व डब्यांत कांहीं सोय नाहीं. दुसरे उतारू पुष्कळ होते पण या दुःखाचा वांटेकरी कोण व कसा होणार तो इतका परस्वाधीन झाला व घाबरला कीं सर्व विधी धोतरांत व डब्यांत झाला. लोकांना किळस व घाण आली व जिन्नसपानसही कांहीं खराब झाले. पुढील स्टेशनवर ओरड झाली. त्या मनुष्याला शिक्षा केली आणि दंड त्याच्या खर्चीनें सफा करविला. ही भूतदया कीं चांडाल्वृत्ती! सर्व पृथ्वीचा बादशहा अगर पृथ्वीचा शास्ता अशा अडचणींत सांपडतां तर त्यानें लघवी थांबविली असती काय? जी गोष्ट मनुष्याच्या शक्तींतून निघून गेली तेथें तो अपराधी कसचा! ही दाद कोणी लावील काय!

---

इंग्लंडांत धर्मसंस्था सरकारी आहेत. म्हणजे सरकारचीं जशीं नानाविध राजकीय खातीं आहेत तसें एक निराळें धर्मखातें आहे ख्रिश्चियन धर्माचा प्राटेस्टंट म्हणून जो पंथ आहे तो राजाचा धर्मपंथ मानला आहे. आणि त्या पंथाच्या सर्व संस्था सरकारी खर्चीनें चालतात. मुख्य गोष्ट ही कीं आयर्लंड व वेल्स या देशांतून जे इतर पंथ प्ररूढ आहेत त्यांची व्यवस्था कांहीं सरकार मार्फत रहात नाहीं. ही राजनीति चांगली किंवा वाईट असो तिच्याशीं आपला कांहीं संबंध नाहीं. इंडियांत हें धर्मखातें घुसडलें तें मात्र आह्मास पसंत नाहीं. राज्यकर्त्यांचा धर्म निराळा, व प्रजेचा धर्म निराळा असा प्रकार आहे तरी देखील राजकर्त्यांच्या धर्माला विलक्षण मान दिला जाऊन त्या धर्मसंस्था सरकारी खर्चीनें चालतात. हिंदुस्थानांत या धर्मखात्या निमित्त दरसाल सोळा लाखा पासून अठरा लाख रुपये पर्यंत खर्चाचा बोजा पडतो. हिंदुस्थाना सारख्या नाना धर्माच्या देशांत एकही धर्म सरकारी असूं नये. खुद्द महाराणी सरकारचें आपल्या जाहिरनाम्यांत अभिवचन आहे कीं, कोणत्याच धर्माचा आह्मी पुढाकार घेणार नाहीं. सर्व धर्म सारखे मान्य आहेत आणि सरकार अगदीं तटस्थ राहील. नवल हेंच कीं, हा तिऱ्हाईतपणा पोकळ आडनांवाचा आहे. ख्रिश्चियन प्राटेस्टंट धर्मसंस्था सरकारी आहेत आणि येथल्या साठीं त्या निमित्त खर्च १८,६७,००० रुपये अंदाजला आहे. हिंदुस्थानांतील युरोपियन लोक देखील अनेक पंथांचे आहेत आणि त्यांत फक्त एक पंथ राजपंथ आहे म्हणून त्याचाच खर्च येथील हिंदु व मुसलमान लोकांवर लादला जात आहे. ही ख्रिश्चियन धर्माची न्यायदृष्टी! आमच्या मतें ज्याचा धर्म त्याच्या बरोबर. धर्मा निमित्त निराळें सरकारी खातें नको. निदान ही व्यवस्था या देशांत खपणार नाहीं. सरकार समर्थ आहे आणि त्यांची धर्मसंस्था बुडविणें लोकांच्या हातीं नाहीं. परंतु सर्व देश कर्जवान व नादार होत चालला आहे अशा वेळीं ही साऴिना अठरा लक्षांची धोंड इंडियाच्या खजिन्यावर नको होती पण ही बुद्धि स्वार्थसाधू अभिलाषी, व राज्यलोभी सरकारला कशी सूचणार! दरसाल अठरा लाखांचा बोजा इंडियावर लादणें हा केवढा अन्याय! ही राजनीती कोण सूज्ञ पसंत करील? ईश्वर जाणे!

---

कोल्हापूरचे तरुण राजपुत्र शाहू महाराज यांस गेल्या सोमवारीं राज्याभिषेक झाला ही अत्यंत आनंदाची व आल्हादाची गोष्ट आहे. ईश्वर करो आणि महाराज चिरायु व सुखी राहून कोल्हापूर संस्थान भरभराटीस येवो!

---

विलायती कापडावर जकात बसविण्या संबंधानें सरकारा विरुद्ध सर्व देशभर ओरड झाली तेव्हां एक निराळेंच पिल्लूं बाहेर आलें आहे. विलायती कपड्यावर जकात ठेवली तर म्यानचेस्टरवाल्यांचा आग्रह आहे कीं, इंडियांतील गिरणींच्या कपड्यावर जकात बसवावी. ही सूचना किती आपमतलबाची व विघ्नसंतोषीपणाची आहे हें विशेष स्पष्ट करणें न लगे. इंडियांतील गिरणीवाल्यावर जकातीचा बोजा दुप्पट पडला म्हणजे म्यांचेस्टरवाले विलायतच्या कपड्यावर एकपट जकात बसवूं देतील.!

---

हिंदुस्थानचे फडणीस मि. वेस्टलांड यांनीं १८९४–९५ च्या बजेटा विषयीं संभाषण करितेवेळीं गूढ राजनिती व्यक्त केली. किती जरी खजिन्यात तूट पडली तरी युरोपिअन लोकांच्याच हातांतून वरिष्ट प्रकारचा राज्यकारभार चालविला पाहिजे. युरोपिअन कामदारच या देशावरील प्रभुत्व कायम ठेवण्यास समर्थ आहेत. त्यांच्या वांचून मुख्य राज्यव्यवस्थेचें पान हालतां कामा नये. रुपयाची किंमत बरोबर दोन शिलिंग होती तेव्हां जे पगार होते तेच अद्याप कायम आहेत. युरोपियन अंमल राखण्या साठीं त्यांना पगाराचा मोबदला योग्य मिळालाच पाहिजे. हुंडणावळीचा भाव वाढल्या मुळें जो थोडा पगारावर अलावन्स नुकताच दिला आहे तो थोडा आहे आणि तो पूर्वींच द्यावयास पाहिजे होता. लष्करी खर्चही होत आहे तो कांहीं कमी होऊं शकत नाहीं. इत्यादि विचारें जोरदार भाषणानें मि. वेस्टलांड यांनीं केलीं त्यांचा अर्थ काय आहे? असें दिसतें. हिंदुस्थान तरो अथवा बुडो सरकारची व्यवस्था बदलत नाहीं. व खर्च कमी होत नाहीं. सरकारास दुःख वाटतें व या देशा विषयीं भूतदया येते परंतु सर्व राष्ट्र रसातळास गेलें तरी सरकारच्या गोष्टी कायम राहतीलच. या बाबतींत सरकार चकार कोणास काढूं देणार नाहीं. पण जेव्हां सर्व गोष्टींचा ओघच बदलून आपोआप त्यांचा हाविर्भाव बंद होईल तेव्हां होवो. सर्व देश विपत्तींत आहे. अशा वेळीं राजतृष्णा व धनलोभ सरकारचा एवढा बलवत्तर असावा व स्वहिता पुढें त्यांस कांहीं सुचूं नये हा नेटिवांचा दैवदुर्विपाक खरा!

---

The Berar Samachar

MONDAY APRIL, 9. 1894

Monday last was a day of national rejoicings in the whole of the Maharashtra. Lord Harris the Governor of Bombay, installed the young prince of Kolhapur on the throne of his ancestors. We are extremely delighted to find that the Government of India has so nobly fulfilled its pledge to retain the state of Kolhapur in all its grandeur and that the old historic principality of the Marathas has got a sharp, competent and youthful ruler after a long series of years. This state is the only remnant of the vast Maratha dominions and it is a matter of pleasure and pride that a scion is brought to the throne to represent the line of Shivaji the Great Founder of the Maratha kingdom. Like other human institutions, the state of Kolhapur had its share of tragedic events. On such times of joy we blot out past memories and drink deep the cup of pleasure that a fortuitous course of events passes round. As a scion of the Chatrapati Shivaji, the young Maharaja has at his command a warlike race and can procure masterly counsels from statesmen of the highest watermark. A vast kingdom he has to rule over and the prosperity of a resourceful country will depend upon his wise, economic and benevolent rule. He has in fact a splendid occasion to show forth a world of good deeds. We wish a happy day to the good people of the Kolhapur-state and pray to God that he may give the young Maharaja long life, health and prosperity.

---

The Hon'ble GangadharRao Mahadev Chitnavis is making a capital use of the right of interpellation. He represents ably the Central Provinces in the Imperial legislative Council and has done a good service to his province. The other day he opened the vexed question of the permanent settlement of the land-revenue. In 1862-63 Sir Richard Temple as Chief Commissioner expressed his opinion in favour of the policy of the permanent settlement. Sir Macdonald quoted the opinion as follows:—

'The period over which the limitation of the Government demand according to the new assessment, is to extend is thirty years for all districts alike. This has been sanctioned by Government. It has also been recommended that the boon of a permanent settlement, that is, the limitation of the Government demand in perpetuity, should be conceded to those landholders who might have brought their estates to a high state of [illegible]vation. The Government have decided that after the lapse of ten years from the commencement of the new settlement, and therefore even within the period of that settlement, those landholders who may be thought worthy of the concession, and who may desire a perpetual limitation of the Government demand, may have their assessments revised with a view to such limitation in perpetuity being declared.'

Thus there was every indication that the system of perpetual assessments of the Government demand will be followed in the Central Provinces. In 1862 Sir Charles Wood then Secretary of State made a proposal to the Government of India to adopt the system of a permanent settlement but upon continuous inquiries till 1883 Lord Kimberely finally abandoned the policy of a permanent settlement. In reply to the honorable member's question Sir A— Mac-Donald formally declared that the Government of India is not prepared to reopen the question. This flat denial is in fact a death blow to a proposal of the National Congress on the same subject. Whereever there is a revisional survey and a new adjustment of the enhanced land-tax there is the general and lound cry for permanent assessments of the land. The same is the case with Berar. We are sorry that fifty per cent of our hopes are scattered to the wind by the perusal of the above reply. Some proposals of the Local Government await the sanction of the Viceroy. Berar has two dangers to fight with. The first danger of revised assessments the people must be prepared to face. The second danger lies in the unjustifiable and almost unbearable enhancements in the old rates of assessment. The Berar Sarvajanik Sabha has well advertised to the evils of over-taxation upon the land-produce. We would only wish that the Government should lend a careful persual to our protest. Mr. Plowden has already signalled the approach of the enhancement of the Government demand in his last Administration report. The dearest interests of the people are at stake and the prosperity of the whole province trembles in the balance. Let us hope, however for the best. We must agitate in the matter until we get the object. It no permanent settlement be possible the only request of the people is that the enhancements should be just, right and acceptable.

---

In view of the ruinous military expenditure, Home-hharges, Compensation allowances &c-we cannot but condemn the whole budget. The following paras from the Summary will illustrate what we perceive in the bombast of Financial achievements:—

*(5)* "The Budget Estimates for 1894-95 show a deficit of Rx. 301,900

*(6)* The deficit with which the Government of India were threatened in 1894-95 was between three crores and three-and-a-half crores of rupees. The measures by which the deficit has been reduced to the amount shown in the Estimates are—

*(a)* stringent economy in expenditure;

*(b)* the suspension of a portion of the Famine Grant, RX. 1,076,200;

*(c)* contributions from Provincial Governments, amounting to Rx. 405000 and

*(d)* the imposition of Import Duties estimated to yield in 1894-95 a net return of RX. 1,140, 000.

(8) The rate of exchange is taken at 1*s.* 2*d* the rupee as compared with 1*s* 2¾*d*. in the Budget Estimate of 1893-94, and there is an addition to the direct expenditure under Exchange of RX. 1,371,500; Exchange Compensation Allowance are estimated to cost in 1894,95 RX. 1,11,3,300, of which RX. 400,400 will be Provincial. In consequence of the sterling borrowing necessitated by the failure to sell Council Bills during a part of *1893-94* the Interest charges in England in 1894-95 will be considerably increased but other decreases in sterling expenditure nearly counterbalance that increase.

(12) The Programme embodied in the Budget Estimates of 1895 is described as a programme of retrenchment and of vigilance intended to tide the Government over a transition period."

---

## वऱ्हाड.

येत्या १० वे तारखे पासून मि. हिजिन्स एक्झिक्युटीव्ह इंजिनिअर, दक्षिण वऱ्हाड यांस तीन महिन्यांची हक्काची रजा देऊन त्यांच्या जागीं बुलढाण्याचे असि. इंजिनियर यांस बढती दिली.

बंडाच्या वेळीं, व मल्हारराव गायकवाड यांच्या पदच्युतीच्या वेळीं नांवाजलेले व वऱ्हाडचे माजी रेसिडेंट सर रिचर्ड मीड हे फ्रान्सांत मरण पावले हा सृष्टिक्रम यथाकाल झाला!

गेल्या शुक्रवारीं सूर्यग्रहण सव्वा सात वाजण्याच्या अगोदर लागलें. अर्ध बिंब ग्रासलेलें स्पष्ट दिसलें. खग्रास ग्रहण या प्रांताला दिसलें नाहीं.

रा. रा. बंधुजी जनार्दन ए. अ. कमिशनर हे रजेवर गेल्यामुळें त्यांचें काम रा. रा. गोविंद राज अय्या पहात असतात.

रा. रा. त्रिम्बक गणेश परांजपे ए. असि. कमिशनर यांची बदली तुर्त मोर्शिस झाली आहे.

रा. रा नारायण पांडुरंग जोशी आफि• एक्स्ट्रा असि. कमिशनर यवतमाळ यांस तीन महिन्यांची हक्काची रजा मिळाली.

अकोल्याचे पोलीस सुपरीनटेंडेंट मि. काटग्रेव्ह यांस येत्या १५ वे तारखे पासून दोन महिन्यांची हक्काची रजा देण्यांत आली.

आणि वरील रजेंत असिस्टंट पोलीस सुपरीनटेंडेन्ट मि. कूड हे जिल्हे सुपरीनटेंडेंटचें काम पहातील.

रा. रा. गणेश गोविंद तहशीलदार यांस तीन महिन्यांची हक्काची रजा दिली. आणि त्या रजेंत रा. रा. रामचंद्र अंबादास नायबत हशीलदार यांस मूर्तिजापुराहून चिखलीस तहशीलदारीवर धाडलें.

रा. रा. विष्णु हरी तहशीलदार यांचा ३ वर्ग होता तो ४ था होऊन त्यांच्या वर्गावर रा. रा. विठुजी नारायण यांस बढती दिली.

रा. रा. माधवराव आण्णाराव हाथोळी तहशीलदार हे आफिशिएटींग होते ते कायम झाले.

आणि शेर महमदखान यांस आफिशिएटींग तहशीलदारी दिली.

रा. रा. रामचंद्र नारायण देशपांडे बी. ए. आफि. ए. असि. कमिशनर यांस वणी जिल्ह्यांत दुसरे वर्ग माजिस्ट्रेटचे अधिकार दिले.

---

### NOTICE

Under rule 12 of the Municipal rules it is hereby published for general information that elections to fill up the vacancy caused by resignation of Mr. E. Milner an elected member for Ward No. 111 shall take place from 7 A. M. to 5 P. P. M. on the 1st of May 1894 at the Town Hall.

Nomination papers will be received by Mr. Balkrisnna Balvant Sule Extra Assistant Commissioner, the Polling Officer, before the evening of the 23rd instant.

Dated Akola 3rd April 94 } B. M. Sathe Secretary Municipal Committee.

Akola

---

### नोटीस.

वार्ड नंबर ३ चे निवडलेले मेंबर मि. इ. मिलनर साहेब यांनीं राजीनामा दिल्या मूळें खाली झालेली जागा भरण्या करितां टाऊनहाल मध्यें ता० १।५।९४ इ० रोजीं सकाळचे ७ वाजे पासून दुपारचे ५ वाजे पर्यंत निवडणूक होईल.

मेंबरचे नावाचे कागद मि. बा. ब. सूळे हे ता. २३ चे सायंकाळचे आंत घेतील.

B. M. Sathe.

आकोला. ३ एप्रिल १८९४ } सेक्रेटरी म्यु० क० आकोला.

---

क्लास नंबर १९

विद्यमान डेपुटी कमिशनर साहेब जिल्हे उमरावती यांचे कोर्टांत

दिवाणी किरकोळ मुकदमा नंबर १ सन १८९४

प्रोबेट आणि आडमिनीस्ट्रेशन आक्ट नंबर ५ सन १८८१ प्रमाणें अर्ज.

काशीबाई भ्रतार रामजी कृष्णाजी नाईक काणव जात ब्राह्मण राहणार कारंजा ता० मूर्तीजापुर जि० उमरावती. } अर्जदार.

ज्या अर्थी सदरील काशीबाई भ्रतार रामजी कृष्णाजी नाईक काणव राहणार कारंजा ईनें आपला मयत मुलगा विठ्ठल रामजी याचे ईस्टेटी बद्दल प्रोबेट आणि आडमिनीस्ट्रेशन आक्टा अन्वये लेटर्स आफ आडमिनीस्ट्रेशन मिळण्या बदल या कोर्टास ता० २९।३।९४ रोजी अर्ज केला आहे. आणि ज्याअर्थी सदरील काशीबाई ईचें म्हणणें असें आहे कीं सदरील विठ्ठल रामजी हा तिचा मुलगा होता तो तारीख २३ माहे अगष्ट सन १८९१ ई० रोजी मयत झाला व त्यास स्त्री अगर संतान नसून अगदी जवळची वारीस त्याची आई अर्जदारीण ही आहे सबब लेटर्स आफ आडमिनिस्ट्रेशन मिळण्याचा हक तिजला आहे.

त्या अर्थी सर्व लोकांस या प्रसिद्ध जाहिरातीनें कळविलें जातें कीं सदरील काशीबाई ईनें मयत विठ्ठल रामजी याचे ईस्टेटी बद्दल लेटर्स आफ आडमिनीस्ट्रेशन मिळण्या विषयीं जो अर्ज केला आहे त्य अर्जाची चवकशी या कोर्टांत तारीख १६ माहे एप्रील सन १८९४ इ० रोजीं दिवसा ११ वाजतां होईल ते वेळीं ज्या कोणाची तकरार सदरहु काशीबाईस लेटर्स आफ आडमिनिस्ट्रेशन मिळुं नये अशी असेल अगर आपल्यास मिळावें अशी असेल त्यानें या कोर्टांत हजर राहून आपली तकरार कोर्टा समोर आणावी. आणि सदरील विठ्ठल रामजी याच्या जिनगीवर अगर जिनगी संबंधी ज्या कोणाचा कोणताही हक्क असेल त्यांणीं सदरील अर्जाची चवकशी वरील दिवशीं होईल तेव्हां हजर राहावें.

ही जाहीरात या कोर्टाचे अधिकाऱ्यानें सही निशी व कोर्टाचे शिक्यानिशी आज तारील ३ माहे एप्रील सन १८९४ इसवी. रोजी दिली असे.

H. S. Nicholetts
Deputy Commissioner
Amraoti District.

---

## वर्तमानसार.

नागपूरचे श्रीमंत प्रौढ प्रतापी बाजाराव च्या महालावें रीठ त्यांच्या वंशजाच्या ताब्यांत न देतां त्या जागेवर म्याकडोनाल्ड टौन हाल हीं इमारत लोक बांधित आहेत आणि ज्या सिटीस्कूलास 'खंसिटीस्कूल' असें योग्य नांव पाहिजे होतें तेथें 'नील-सिटीस्कूल' असें नांव दिलें जात आहे असें पाहून 'देशसेवक' पत्रकर्त्यांनें या देशाची खरी स्थिती इतिहासांतील दृष्टान्तानें दर्शविली आहे ती सर्वांनीं ओळखून ठेवण्या सारखी आहे:—

रोमन अधिकारी गाल लोकांच्या ठायीं असलेला स्वराष्ट्राविषयींचा अभिमान व स्वातंत्र्यप्रीति यांचा बीमोड करण्याम नेहमीं झटत. ज्या ज्या गोष्टींच्या स्मरणानें किंवा दर्शनानें गाल लोकांच्या हृदयांत स्वातंत्र्याचे किंवा शौर्याचे विचार उद्भवण्याचा संभव असे, त्या सर्व्यांचा नायनाट करण्याचा क्रम यांनीं एकसारखा चालविला होता. गाल लोकांच्या गांवांचीं व शहरांचीं मुळचीं नांवें बदलून त्यांस त्यांनीं आपलीं कांहीं तरी नांवें देऊन टाकिलीं; आणि त्यांचे जुने धर्माचार व संस्कार सर्व हळू हळू बदलावयास लावून त्यांस केवळ रोमन करून सोडिलें. फार काय पण त्यांच्या निरनिराळ्या देवतांसही रोमन लोकांनीं आपलीं नांवें दिलीं. याप्रमाणें गाल लोक सर्व प्रकारें हतवीर्य परतंत्र व अभिमानशून्य झाल्यामुळें व पूर्वींचीं त्यांचीं धर्मादिकांचीं बंधनें अगदीं तुटून नवीं ह्मणण्यासारखीं कांहीं त्यांच्यामागीं उत्पन्न न झाल्यामुळें त्यांची नीति अगदीं बिघडून गेली. त्यांच्या अंगचे चांगले गुण सारे मावळले. कुऱ्हाडीचा दांडा गोतास काळ, या ह्मणी प्रमाणें त्यांच्यापैकीं कित्येक जण आपल्या देशास व आपल्या लोकांस निरंतर निरंतरचे परवश करण्यास नाना प्रकारें कारणीभूत झाले दे० से०

समुद्राच्या तळीं काय आहे हें पाहण्या करितां नेपल्स येथें सिनोर टोसेली यानें बांधली आहे. तिच्या भिंती पोलादाच्या आहेत, व तळ कांचेचा आहे, आणि ती वाटेल तेव्हां पाण्याच्या खालीं वाटेल तितकी खोल नेतां येते. त्यांत आठ माणसांना बसतां येतें आंत विजेचे दिवे लावलेले आहेत व किनाऱ्यापासून त्या खोलींत टेलिफोन आहे.

क०

योगव राजाचें पुष्कळ जवाहीर आह्मी चोरलें व अमुक एका जागीं पुरून ठेवलें आहे असें एकानें मरतेवेळीं सांगितलें व त्याची माहिती व्हाईट यास आहे असेंही सांगितलें. व्हाईट यानें ती गोष्ट कबूल केली व तें ठिकाण दाखविण्याकरितां हल्लीं तो येत आहे. त्याच्या दाखविण्यानें जें जवाहीर सांपडेल त्याच्या किंमतीवर दाहा लाख रुपयांपर्यंत व्हाईट यास शेंकडा १० टक्के प्रमाणें व पुढें ५ टक्के प्रमाणें व्हाईट यास कमिशन देण्याचें कबूल केलें आहे.

काबुलच्या अमिरानें आपला सर्व व्यापार एकाच माणसाच्या हवालीं केला असल्यामुळें त्या मालावर इंग्रजी हद्दींत जकात बसविण्याचा पंजाब सरकारचा विचार चालू आहे.

अफगाण सरहद्दीवर ज्या रशियाच्या छावण्या आहेत त्या छावण्यांतली फौज फार वाढविण्यांत येतें आहे अशी सेन्ट पिटर्सबर्ग येथें बातमी आहे.

१८८८ त जपान देशांत ९,५७,९०० पौंड माल तयार झाला व इंग्लंडांतून ४,७०,००,००० पौंड आला होता त्याच्या बदला १८९० त २,२०,००,००० पौंड तयार झाला व ३,१०,००,००० पौंड आला त सेंच १८९२ त ६,४०,००,००० तयार झाला व २,४०,००,००० पौंड परदेशांतून आला. या माहितीवरून मुंबईच्या व्यापाऱ्यांनीं व गिरणी वाल्यांनीं कांहीं शिकावयास नको काय!

दिल्ली शहरांत सबल जाग्यांत बांधलेल्या सरकारी नव्या इमारतीच्या खालच्या भागांच्या खोल्यांत विकतां वारा लागावा ह्मणून दिल्ली शहराभोंवता जो तट आहे तो २०० फूट सखल करावा असें तेथील सरकारचें ह्मणणें होतें, पण हिंदुस्थानसरकारानें तसें करण्याची परवानगी देण्याचें नाकारलें असें सांगतात.

सोलापूर येथें उच्च जातीच्या स्त्रियांच्या व विवाहित मुलींच्या शिक्षणासाठीं एक वर्ग सुरू झाला आहे. त्या वर्गांत येणाऱ्या स्त्रियांस शिकविण्यासाठीं एक ब्राह्मण जातीची शिकलेली स्त्री मास्तरीण नेमिली आहे व मराठी चांगलें लिहितां वाचतां येणें, साधारण हिशेब करणें व शिवणकाम व लोकरीचें काम करणें, इतकें शिक्षण तूर्त त्या वर्गांत देण्यांत येत आहे. कोणासही कसांस येण्यास गैर सोय पडूं नये ह्मणून शिकायाची वेळ दुपारचे २ पासून ५ वाजे पर्यंत ठेविली आहे.

बडोदा प्रांतांतील शाळांत हिंदुधर्मशास्त्र शिकविलें जावें, असा ठराव होणार आहे ह्मणून ऐकतों.

तुरुंगांतील कैद्यांस ओळखतां येण्यासाठीं त्यांचीं मापें व खाणाखुणा वगैरे टिपून घेण्याची नवी पद्धत बंगाल्यांत व मद्रासेंत सुरू झालेली आहे. तीच पद्धत मुंबई इलाख्यांत सुरू करण्याचा ठराव या आठवड्यांत सरकारानें केला व त्या कामासाठीं १५०० रुपये पर्यंत खर्चाची मंजुरी सरकारानें दिली आहे.

हैद्राबाद—येथील सरकारी स्टांपाचे कारखान्यांतून ५०००० रुपयांची कोर्टफीचीं टिकिटें नुकीच नाहींशीं झालीं आहेत.

रत्नागिरीस हिंदु मुसलमानाचा दंगा उपस्थित होण्याचा समय आला होता पण पोलिसच्या बंदोबस्तानें आणि हिंदूच्या सावधगिरीनें तो नागच्या जागींच विझला गेला. जेथें हिंदुमुसलमानांची वस्ती आहे तेथें सरकारी रक्षणाची वाट न पहातां लोकांनीं सावधगिरि राखल्यास आत्मरक्षण होण्याचा हल्लीं काळ आला आहे

'पोट लागले पाठिशीं हिंडवी तें देशो देशीं' ह्या शुद्र कवीच्या उक्तीप्रमाणें परदेशीं जाण्यास मात्र लोक तयार झाले आहेत. गेल्या १० वर्षांत दरसाल तीन लक्ष लोक पोट भरण्यासाठीं बाह्य देशीं जातात असे सरकारी माहितीवरून दिसतें पण अलीकडे बाह्य देशाच्या कांहीं सरकारांनीं हिंदुस्थानच्या मजुरांवर मोठा कटाक्ष धरिला आहे, तो इतका कीं तीं सरकारें जनावरांसही हलक्या तऱ्हेनें नोटिवांस वागूं लागलीं आहेत. स. शो.

हल्लींतील वैद्यांचा परीक्षा करण्याचा मुख्य मार्ग नाडीपरीक्षा हाच आहे. व त्यावरून रोगाचें ज्ञान चांगलें होतें असा अनुभव आला आहे. नाडीपरीक्षेविषयीं अज्ञान वाळगणारांनीं ही गोष्ट ध्यानांत ठेविली पाहिजे.

अमेरिकेंतील बाल्टीमोर शहरांतील मेडिकल कालेजांत नुकताच असा एक प्रयोग करण्यांत आला कीं, एका रोग्याचे पोटांत विजेच्या दिव्याचा प्रकाश पाडून, खालींत सगळा अंधार करून, पोटांत शरीर धर्म कसकसे चालू आहेत ते त्या दिव्याच्या प्रकाशांत दिसून आले कपाल. आहे!

कनाटानिकट यल येथें शेंकडा १० स्त्रियांस पुरुषां मानें मिशा असतात. त्यात मोठा भाग अभिनिवेश जातीच्या स्त्रियांचा आहे. अमेरिकेंत ही फिलाडेल्फिया येथील बऱ्याच स्त्रियांस मिशा आलेल्या दिसतात.

सया०

अफु कमिशन जें इंडियांत बसलें होतें त्याचा खर्च इंडियावर बसविला जाणार आहे. विलायतच्या मिशनरी लोकांनीं ही मूळ उठावणी केली आणि अफू संबंधानें खोटा नाटा बोभाटा केला. इंडिया सरकार प्रजेस अफूच्या व्यापारानें व्यसनग्रस्त व अनीतिमान करिते असेंहा आरोप आदणयांत आले आणि कामन्स एमनें एक असा मतग्वाचा ठरावही केला. विलायतच्या लोकांच्या म्हणण्या वरून कमिशन बसविलें आणि त्याचा अवाढव्य खर्च इंडियावर लादला आहे हा न्याय कोठला! ट्रुथ नावाच्या पत्रकर्त्यानें हा अन्याय स्पष्ट करण्या साठीं एक चांगला दृष्टांत दिला आहे. तो असा कीं इंडियाच्या राष्ट्रीय सभेनें विलायतच्या दारूच्या व्यापारा संबंधानें कमिशन बसवावें आणि त्याचा खर्च इंग्लंडच्या खजिन्यावर बसवावा म्हणजे त्याचा खरा खरा अर्थ इंग्लिश लोकास कळेल. डोळ्यात अंजन घातल्या शिवाय डोळे नीट उघडणार नाहींत !

NEARLY READY

**CRIMINAL COURT MANUAL.**

*for the*

Hyderabad Assigned Districts

by

Mr. R. Obbard

assisted by

Syed Meer Alum,

Containing the uncancel'ed Notifications of the Government of India extending Laws and promulgating Local Laws (with reprints of Forest Law, Abkari Rules, Municipal Act, Courts Law, Rules, regulating Legal Practitioners and other Local and Special Laws), the Notifications and rules published under the authority of the extended Laws, the uncancelled Circulars and Orders of the Government of India, Resident, Commissioner, and Judicial Commissioner relating to Crimial matters, and full information in regard to the prescribed registers, returns and forms, to be used in and by Criminial Courts, with notes by Mr. R. Obbard, and a copious Index.

PRICE RUPEES 5

Subscriptions registered by Syed Meer Alum at the office of the Civil and Sessions Judge, Amraoti Camp Berar.

## नोटास.

राजमान्य राजश्री रामसा जगन्नाथ राहणार कामठी तर्फे मुखत्यार रघुवीर प्रसाद राहणार आकोट यांस.

खालीं सही करणार गौरी शंकर चंदी प्रसाद जात ब्राह्मण राहणार हिवरखेड तालुके अकोट या लेखान्वयें नोटीस देतो अशी कीं तुम्ही मजला हिवरखेड आणि दिवाणझरी या दोन गांवचा दरु कलालीचा पंट मक्ता रक्कम रुपये ४७२५ चार हजार सातशें पंचवीस रुपयाच्या ठरावानें देऊन मज पासून कबुलायत आणि जामीन कबजा लिहून घेऊन लायसन्स देतो अशी भलथाप देऊन शंकर गोपलीलाल शितलाल यास लायसेन्स दिलें आहे तर या नोटिसी वरून तुम्हास कळविण्यांत येते कीं कबुलायती प्रमाणें लायसेन्स माझे मजला मिळालें. तें न झाल्यास माझें झालेलें नुकसान आठ दिवसांत भरून द्यावें तसें न झालें तर दिवाणी कोर्टांत झालेलें नुकसान आणि या नोटिशीचा झालेला खर्च तुम्हा पासून भरून घेतला जाईल. कळावें. तारीख ४ एप्रिल सन १८९४ इसवी.

( सही )

गौरी शंकर चंदीप्रसाद दस्तुर खुद.

---

नमुना नंबर १४३

कोणी स्थानापन्न होतो तेव्हां त्याम कर्ज वसूल करिता येण्यासाठीं सरटिफिकीट मिळावें ह्मणून त्यानें जिल्हे कोर्टांत अर्ज केल्या विषयी जाहिरात.

सन १८८९ चा अक्ट ७ कलम ६ प्रमाणें.

दि. कि. क्लास १५ मिसल नंबर ६/१८९४

डिपुटी कमिशनर साहेब जि० इलिचपूर यांचे कोर्टांत.

नांव बीजराम

बापाचें नांव बालमुकुंद

राहणार चांदुरबाजार ता० येलिचपुर जिल्हा इलिचपूर यांस मयत

रामलाल जगनाथ राहणार चांदुरबाजार तालुके इलिचपूर जिल्हा इलिचपूर यांचें कर्ज वसूल करितां येण्यासाठीं सरटीफिकीट मिळावें ह्मणून सदरहू अर्जदार यानीं अर्ज केला आहे त्यास करिता सदरहू मयत मनुष्याचे माल मिळकतीवर किंवा तिचे कांहीं भागावर आपला हक्क आहे असें ज्या मनुष्याचा दावा असेल त्याच नोटिस तीचे द्वारे कळविण्यात येत आहे कीं त्याणीं तारीख २० माहे एप्रिल सन १८९४ इ० रोजीं लिखदरा येथें सदरहू अर्जीची चौकशी होईल त्या वेळीं या कोर्टांत हजर होऊन आपआपले हक्का विषयीं केली हकिकत दाखल करावी. तारीख २६ माहे मार्च सन १८९४ इ०

C. E. Biddulph

Offg: Deputy Commissioner,

जहज्य.

---

☞ हें पत्र आकोलें येथें कै० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

सालअखेर ... " १०
किरकोळ अंकास ..................०४

नोटिशीबद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
पुढें दर ओळीस ०१०६
दुसरें खेपेस .......०१

Single copy.......

Below per line Repetition 3 as

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR.

VOL XXVIII AKOLA MONDAY 16 APRIL 1894 NO 15

वर्ष २८ आकोला सोमवार तारीख १६ माहे एप्रील सन १८९४ अंक १५

### ह्या राजश्रानें केव्हां तरी पळ काढला असावा.

एका गृहस्थास त्याच्या धर्म वेडामुळें एका जुलमी सरकारानें कारागृह दाखविलें. तो ज्यांत कोंडला होता त्याच्या मजबूत दगडी भिंती पाहून त्याच्या मनाची खात्री झाली कीं आतां आपलें राहिलेलें आयुष्य ह्या एकांत व भयाण कारागृहांत घालविलें पाहिजे. जरी त्याला आतां पुढची गत चांगली नाहीं. असें भासत होतें तरी त्याला दुःखांत सुख इतकेंच वाटत होतें कीं मला जुलुमामुळें बळी व्हावें लागलें परंतु सद्वर्तनाचें उल्लंघन केल्यामुळें कांहीं नाहीं. जर त्याच्या स्वाधीनची गोष्ट असती तर ह्या संकटांतुन तो सहज पार पडला असता.

असें असून त्या बिचाऱ्यास सतत सोळा वर्षें हाल काढीत राहावें लागलें. हीं वर्षें संपतात तों त्याच्या मनांत आलें कीं, ह्या भिंतीवर पुढें आलेल्या दगडाच्या आधारानें वर चढावें व त्यानें खिडकीच्या वरून काय दिसतें ह्मणून वर डोकें केलें. आणि असें हें केल्या मुळें त्याला वाटलें कीं पुढें लोखंडाचे गज आहेत ते काढून टाकतां येतील व त्या चोकटीची आगळही लावली नव्हती. त्याच्या मनांत घोळूं लागलें कीं, काय मी पळ कां न काढावा ? त्यानें खिडकी तर उघडली आणि सहा फूट उडी जमीनीवर मारली आणि त्या प्रदेशांस शेवटचा राम राम ठोकला. जर त्यानें त्याच्या ठाम झालेल्या विराचे एकिकडे ठेऊन विचाराची दोरी जर सैल सोडली असती तर ह्या स्थळीं इतके दिवस कुंथत राहावें लागलें नसतें.

ह्या स्वधर्मार्थ प्राण अर्पण करणाऱ्या या विचाराची दैवघटित गोष्ट साधक व बाधक आहे. त्याच्या मनाची धांव बंद केल्यामुळें साधक. त्याला ज्या कारागारतव बंदींत टाकावयाचा होता तें नसल्यामुळें बाधक.

ही गोष्ट पत्र रूपानें जी सर्वांस आवडेल त्या प्रमाणें खालीं थोडक्यांत व साध्या शब्दांत सांगतों. एक लेखक बाई ह्मणते कीं आज सोळा वर्षें झालीं, पित्त क्षोभानें व अशक्तपणामुळें फारच गांजून गेले आहे. नेहमीं थकून जाऊन अगदीं हलक होऊन जाई. माझी अन्नावरची वासना उडाली, पुढें आणलेलें ताटास हात लावीन तर शपथ. कित्येक दिवस माझ्यानें एक घास देखील खाववत नसे. कधीं कधीं मला मळमळ सुटे पोटाचा नगरा होई आणि तोंडावाटें मोठा घट्ट बेडका येई.

मला फारच त्रासदायक खोकला होऊन व बरगड्यांत फारच वेदना होत व दम बरोबर छाटत नसे. मी फारच हलक झाले आणि दुकानांत आंत बाहेर करण्याचा माझा तकवा अगदीं निवून गेला. सन १८९१ च्या डिसेंबरांत माझ्या एका मित्राईकानें मदर सिजेलचा क्युरेटिव सीरप ( माता सिजेलचा रोगहारक पाक ) बद्दल बरेच गुणानुवाद गाईल्या मुळें मी तें औषध घेण्यास सुरू केलें. मी थोडें थेंब घेतल्या बरोबरें मला बरेंच समाधान वाटलें आणि पुढें पंधरा दिवस औषध घेतलें नाहीं तरी मला बरें वाटत होतें. मला असा धीर आला ह्मणून मी अगदीं बरी होई तों पर्यंत ह्या औषधाचा उपयोग केला. आमचे चिरंजीव आरथरास एक वर्ष सतत जेवल्यावर जड झाल्या सारखें व वेदना होत होत्या आणि पोटाची दामटी होऊन खळगा पडल्या सारखें वाटे. त्याला हें औषध घेण्याची मी गळ घातली आणि त्याचा शेवट ह्मणाल तर माझ्या सारखाच झाला. मला पक्कें माहीत आहे कीं, ह्या प्रदेशांतल्या बऱ्याच मंडळींनें दुसरे नाना उपाय करून थकले व जेव्हां ह्या सिरपाचा ( पाकाचा ) उपयोग केला तेव्हां तात्काळ गूण आला. ह्या औषधाचा ( ह्मणजे मा. सिजेलच्या सिरपाचा ) मला रामबाण गुण आला तो इतर पिडीतास ह्या मुळें यावा असें आपणास वाटत असेल तर हें पत्र आपण बेलाशक छापावें.

मी तुमची
( सही ) ( मिसीस ) एम वार्ड
१९४ इकसटन रोड
शडफर्ड नोटिंगहाम

ता. १ ली माहे एप्रिल सन १८९२

मीसीस वार्ड बाई साहेब ह्या त्रासदायक व भयंकर रोगा पासून बऱ्या झाल्या ह्मणून आह्मी तीस अभिनंदन करितों. आपल्या आयुष्यांत सोळा वर्षांचा वाटा सतत शारीरिक व मानसिक वेदनेंत घालवावा ह्मणजे फारच खराब समजावयाचें. कुब्राचे सोबती होणें फारच थोड्यांच्या ललाटीं लिहिलेलें असतें. परंतु दृढता ही सूर्यप्रकाशा सारखी सर्व जगभर जिकडे तिकडे सारखी पसरते तद्वत् हो पसरली पाहिजे. ही कमी राखावी हें त्याला अवगत आहे. तर तो त्याची काळजी घेईल व तो दूर झाल्यास आपल्या स्वाधीन करून घेईल.

ह्या बाईचा रोग पचनीय पिंडाचा ह्मणजे अग्निमांद्य व अजीर्णाचा होता, जो रोग फारच धोक्याचा व दुःख देणारा आहे, कारण कीं ह्या रोगाचा पगडा इतका बसतो कीं शरिरांतली सर्व अंगें ह्याचवा बळी पडतात व रक्ताभिसरणामुळें ह्या रोगाचें वीष सर्व शरिरांत पसरतें .ह्या रोगाचें मुख्य कारण निरनिराळ्या नांवानें होणारे परिणाम व चिन्हें हीं होत. तो जे औषध सांगते त्याच्या गुणाची ज्यास चांगली माहिती झाली आहे त्यास नवल वाटण्यास नको. मोठ मोठाले असाध्य रोग ह्या औषधास शरण येतात.

आमचे वीर जे आपल्या गुहेत कसा तरी वेळ काढीत होते त्यास बाहेर निघून जाण्याची गुरुकिल्ली माहित नव्हती.

जर ह्या ओळी अवलोकन करणारे दुःलाचे गुलाम झाले असतील तर त्यास तसें राहण्यास कांहीं कारण दिसत नाहीं.

तिच्या सचोटीच्या आटोक्यांत लिहिलेल्या पत्रा वरून रोगाचें शमन कसें होईल ह्याचा रस्ता दाखवून देतो. हें आमच्या पत्रव्यवहार करणाऱ्या गृहस्थाच्या लेखा वरून समजेल.

H. D,

---

### भागानगर.

ता. ८ माहे एप्रील सन १८९४ इ.

काल हिंदूचा वर्ष प्रतिपदेचा सण झाला आज मुसलमान लोकांचा रमजानचे ईदीचा सण आहे. हें शहर मुसलमानी राज्याची राजधानी तेव्हां ईदीचा थाट कसा होत असेल याचें वर्णन करण्या पेक्षां वाचकांचे कल्पनेवरच ठेवणें बरें दिसतें आपआपल्या सणानिमित्य ज्या त्या जातीचे. लोकांत आनंद असणें केवळ स्वाभाविक आहे. परंतु एक अभिनव गोष्ट दिसली ती अशी कीं प्रतिपदेच्या दिवशी काहीं सभ्य मुलमान मंडळींत आनंदोत्सव होत होता व कांहीं हिंदु आजचा हा दिवस सणा सारखा मानीत आहेत या दोन्हीही मुख्य जातींत एकाच समयावच्छेदें करून सारखा आनंद होण्यास दोघांसही सारखाच आनंद देणारी अशी एखादी गोष्ट घडली असली पाहिजे. आणि ती घडली हेंही खोटें नाहीं सिकंदराबाद छावणींतील पेनशनर असिस्टंट माजीस्ट्रेट खानबाहादूर शेख हिसामुद्दिन साहेब यांची नेमणूक हैद्राबादचे कायदे काऊनसिलांत झाली. सदरी खान बाहादूर हे हिंद व मुसलमानांत तसेंच श्रीमंता पासून गरीबा पर्यंत आबाल वृद्धास एकसारखे लोकप्रिय असल्या मुळें त्यांस निजामसरकारातून जे अयाचित मान मिळाला आहे याज बद्दल सर्व लोक त्यांचें अभिनंदन करीत आहेत. मला वाटतें या बाबदींत खान बाहादूर यांचें अभिनंदन करण्या ऐवजी ज्यांनीं या राजकार्य धुरंधर पुरुषाची अशा योग्य स्थळीं योजना केली असेल त्यांचें अभिनंदन करणें रास्त दिसतें व ज्या अर्थी ही निवड खुद्द दिवाण साहेब नवाब विकारुल उमराव बाहादूर यानीं स्वतः केल्याचे खान बाहादूर यांस आलेले खलिता वरून स्पष्ट होत आहे त्या अर्थी या योग्य निवडणुकी बद्दल दिवाण साहेबाचे व या निवडणुकी पासून निजामशाहींतील रयतेस जी उत्तम फळ प्राप्ती होईल तिज बद्दल सदरी रयतेचें अभिनंदन करावें हा मार्ग प्रशस्त दिसतो.

हें जोखमीचें काम यथासांग करून राजसेवा व लोकसेवा पुर्णत्वें करून बजावण्यास सर्व शक्तीमान प्रभू आमचे खानबाहादुरास आयुर्बल व शारिरिक आणि मानसिक बल देवो !

---

### वाशिम.

ता. ८ माहे एप्रील सन १८९४ इ.

शाळाखातें सर्व सुधारणाचें माहेर घर आहे. मुलांच्या शिक्षणा करितां तें सरकारानें निर्मित केलें आहे. मुलें शिकून तयार होतात तींच पुढें सुधारणा करितात. सरकारास राज्य चालविण्याच्या कामी मदत करितात. व अनेक तऱ्हेचे त्यांच्या पासून फायदे होतात. तेव्हां शाळाखात्याची व त्यांतील नौकरांची योग्यता किती आहे हें मार्मिक लोक जाणतच आहेत. "येऱ्या गबाळांचे काम नव्हें" असें हें सर्व खात्यांचें आदिस्थान खातें. यास मदत सरकार कमी करीत आहे असा सर्व हिंदुस्थानभर बोभाटा आहे या वरून या खात्याचें महत्व कित्येक मुत्सद्यांनाही कळत नाहीं असें कित्येक समजतात. इंग्लंड देशाची दोन हजार वर्षांच्या पूर्वीची स्थिती पाहा. त्या काळच्या लोकांची स्थिती पाहाः ते केवळ वनांत रहात, वल्कलें परिधान करीत अंगाला नानातऱ्हेचे रंग लावीत जेव्हां रोमन लोकांनीं त्या देशावर स्वारी केली त्या वेळीं त्यांची स्थिती कशी होती हें इतिहास प्रसिद्ध आहेच असें असतां ही जेव्हां त्यांच्यावर ज्ञानदीप प्रकाशला तेव्हां त्यांचें तें सर्व नष्टचर्य जाऊन विद्येच्या योगानें त्यांना हल्लींची उंच स्थिती प्राप्त झाली व त्यांचा सर्व जगतावर पगडा बसला आहे. हें सर्व कशानें झालें तर विद्येनें व ती विद्या संपादन करण्यास मदत शाळाखातें. ह्या प्रांतांत जेव्हां शाळाखातें नव्हतें तेव्हां काय ती स्थिती भाषा किती अशुद्ध ! आतां तरी बहुतेक लोकांची भाषा त्याच प्रकारची आहे. जिल्ह्याच्या ठिकाणीं जे लोक राहतात त्यांची व त्यांच्या संसर्गानें थोड्या इतरांची भाषा कांहींशी सुधारलेली आढळेल—अजून लोकसमुदायाला उन्नतीचा काळ येण्यास दिनावधि पाहिजे. अशा लोकांमध्यें राहून शिक्षणाचें काम करून विद्यार्थ्यांच्या मुखानें बोलवून विद्वान् वरिष्ट अधिकाऱ्यांना संतुष्ट करणें किती बिकट काम आहे "हें जावें त्याच्या वंशा तेव्हां कळे." परिक्षा घेणें व शिकविणें हें अगदीं सोपें आहे असें कोणीही समजूं नये. हीं दोन्ही कामें अगदीं वेगळीं आहेत. लहान असोत अगर मोठी असोत जेव्हां खात्याचे अधिकारी शाळेंत जातात तेव्हां त्यांनीं पाहिलें पाहिजे कीं, जर एखाद्या मुलाला कांहीं आलें नाहीं तर त्याला गुरूनें शिकविलें नाहीं असा त्याच्या माथीं दोष लाविण्या पुर्वीं आपण स्वतः त्या मुलाला शिकवून पहावें. जर त्या मुलाला आपल्या शिकविण्या पासून कांहीं समजलें तर मग मास्तराला दोष देण्यास जागा आहे असें समजावें. जर आपण शिकऊन त्या मुलाला कांहीं आलें नाहीं तर मग मास्तरावर डोळे वटारून फळ काय, शिव्या देऊन फळ काय, आरडा ओरड करून फळ काय किंवा अशाच प्रकारची दुसरी दाणादाण करून फळ काय ! असें मनांत आणून जें दोघांनाही हितकारक आहे असें वर्तन सभ्यपणानें ठेवलें पाहिजे. वऱ्हाडांत सुमारे २९

लक्ष वस्ती आहे या एवढ्या लोकांत सुधारलेले किती शुद्ध भाषा बोलतात; विद्येची जरूर कितीकांना आहे हें जर पाहूं गेलें तर समुद्रामध्यें वाळूचा कण टाकिला म्हणजे जसा थांग नाहीं त्याच प्रमाणें यांची ही स्थिति ! हे विचार सुचण्यास शाळा खात्याच्या अधिकाऱ्यांत झालेला फेरफार होय. श्रीराम शाहीचा शेवट होऊन पटवर्धन शाही सुरु झाली. अण्णासाहेब माहाजनी यांची नेमणूक खात्यावर होईल असें कांहींना वाटत होतें कारण अण्णासाहेब या प्रांतांत २३ वर्षां पासून असून त्यांना ह्या प्रांताची फार माहिती. कशी सुधारणा केली पाहिजे हें त्यांना ठाउक. ते ह्या प्रांतांत पहिल्या प्रतीचे विद्वान, दयाळू, खातें चालविण्यास अगदीं योग्य, हायस्कूलचे फ. अ., हायस्कूलचे हेडमास्तर, वऱ्हाड एज्युकेशनल इनस्पेक्टर या तिन्ही ठिकाणीं विजयी झाले. तेव्हां त्यास ही जागा योग्य होती, परंतु ईश्वरी करणी विचित्र असल्या मुळें त्यांच्या हक्काची पायमल्ली होऊन पर प्रांतातील गृहस्थांची नेमणूक झाली. त्यांची नेमणूक झाल्या पासून त्यांच्या कडकपणा बद्दल वर्तमान पत्रांतून चर्चा सुरू झाल्या मुळें बिचाऱ्या पोटार्थी मास्तरांची पाचावर धारण बसली आहे. पगार मिळतो तेव्हां काम इमानानें करणें हें प्रत्येकाचे कर्तव्य कर्म आहे. आपल्या पायांवर दगड पाडून घेईल असा आत्मघातकी कोणी असेल असें मला वाटत नाहीं. परंतु मीस्तर पटवर्धन हे सुधारलेल्या प्रांतांतून आलेले असून तिकडील अनुभव इकडे जर कदाचित त्यांनीं लागू केला तर कांहींना कांहीं तरी कोंग्यांशीच्या फेऱ्यांत पडण्याची कदाचित् पाळी येईल अशी भीती वाटत आहे ती निराधार आहे असें गेल्या शुद्ध वऱ्हाडीच्या अंकावरून समजून घ्यावें. ईश्वर कृपे करून त्यांना अती उंच स्थिती प्राप्त झाली. ईश्वर कृपें करून त्यांच्या हातांत हजार बारांशें लोकांचे अन्नाचा संबंध आला आहे. तेव्हां "जो रक्षी प्राण अन्न देऊन" या नात्यानें ते हाता खालील नोकरांचे मायबाप आहेत. या वरून एखाद्यानें अती निंद्य काम केलें अगर काम करण्यांत कुचरपणा केला तर त्याजवर पांघरूण घालावें असें कोणी म्हणेल असें नाहीं तरी वर्तमानपत्रावरून जो लोकांचा ग्रह झाला आहे तो लवकर दुर होण्या योग्य लोकांना नुतन कारकिर्दीचा अनुभव यावा व श्रीराम शाई प्रमाणें यांच्या नांवाचा आनंद ध्वनि सर्व प्रांतभर निघावा अशी सर्वांची मनापासून इच्छा आहे.

आपला 'क्ष'

---

वऱ्हाडसमाचार

मिती चैत्र शुद्ध ११ शके १८१६

चालू १८९४-९५ सालच्या बजेटा विषयीं जंगी वादविवाद झाला पण त्यांत दोन पक्ष अगदीं निरनिराळे दिसून पडले. सरकारी कौंसिलदार होते त्यांनीं एक विचारानें सरकारची बाजू उचलली आणि खाजगी कौंसिलदार होते त्यांनीं आपापलें म्हणणें स्पष्टपणें व जोरानें कळविलें. सरकारच्या मता विरुद्ध स्वकीय मतप्रकाशन लोकपक्षीय सभासदांनीं उत्कृष्टपणें केलें ही मोठी आनंदाची गोष्ट होय. सरकारचे अधिकारी या नात्यानें सरकारी कौंसिलदार जें कांहीं बोलले त्याचा सारा झोंक असा कीं सरकारचें करणें रास्त आहे व त्यास शहाणपण शिकविणारांनीं सरकारच्या कृतीस मान डोलवून स्वतः शहाणें ठरावें. अवाढव्य लष्करी खर्च कमी करितां येत नाहीं. राज्यकारभारांत युरोपियन अधिकारीच मुख्य पाहिजेत आणि हा युरोपियनपणा राखण्या साठीं हुंडणावळीच्या भावांतला फरक देणगी दाखल दिलाच पाहिजे. सर्व खर्च चालले पाहिजेत आणि तूट पडेल ती भरून काढण्या साठीं जकातीचा कायदाही अवश्य पाहिजे. विलायती कपड्यावर जकात कां केली याचीं कारणें कांहीं तरी दाखविण्यांत आलीं. सारांश प्रभुसत्ते पुढें शहाणपण नाहीं !

सर वेस्टलांड आपली फडणिशी नांवाजतांना म्हणाले कीं सर्व प्रतिष्ठित नेटीव लोक लाहोरास राष्ट्रीय सभेला जमले आणि त्यांनीं बारा ठराव केले. त्या पैकीं पहिले नऊ ठराव तर सरकारानें आपले खर्च वाढवावे अशा मुद्याचे आहेत. हें सर्व राष्ट्राचें शहाणपण पृथ्वी वरील कोणत्या राज्यकर्त्यांला उपयोगी पडेल तें पडो ! सर्व उत्पन्नाच्या बाबी तोडण्या विषयीं ज्या सूचना केल्या आहेत तेथें तर सर्व राष्ट्राच्या शहाणपणाचा कळस झाला. सरकार कोणत्या काळजींत आहे आणि त्या संकटांतून मुक्तता या भूगोलावरील मानवी राज्यांत वरील राष्ट्रीय सभेच्या उपायांनीं होईल तर होवो पण निदान सरकारास असले उपाय टाकून साधेच उपाय योजिले पाहिजेत.

वास्तविक पहातां सरकारानें आपण होऊन खर्च अवाढव्य वाढविले आहेत आणि ते एकसारखे वाढवीतच आहे तेव्हां राष्ट्रीय सभेनें खर्च वाढविण्याच्या कांहीं सूचना केल्या तर वेस्टलांड यांस दुःख वाटायाला नको. आदबशीर खर्च केला आणि अद्वातद्वा खर्च केला तरी त्याला संज्ञा 'खर्च' हीच द्यावी लागेल परंतु दोहों मध्यें जमीन अस्मानाचें अंतर आहे. सरकारची उधळपट्टी कुबेराला भिकारी करील. कोणीही खर्च करील. पण सरकार खर्च करितें तो इंग्लंडच्या वैभवाला व संपत्तीला जाऊन मिळतो. आणि राष्ट्रीय सभा जो खर्च करण्यास सांगते तो खर्च या देशाच्या कल्याणासाठीं वेंचला जाईल. उत्पन्नाच्या बाबी तोडल्या असें सरकारची कृतीच साक्ष देते. विलायती कपड्यावर जकात कां ठेविली नाहीं! या व अशा सहस्त्रावधि गोष्टी आहेत. राष्ट्रीय सभेचा उपदेश ऐकिला तर भारी-पगाराचीं इंडियांतील बंदिस्त कुरणें लुटण्यास थोडेच सांपडणार आहेत! राज्यलोभ, व स्वार्थ या पुढें मी मी म्हणणारे नांगी टाकतात तेव्हां सरकारला राष्ट्रीय सभेचा सल्ला कालत्रयीं आवडणार नाहीं !

---

लिटन शाहीच्या वेळीं 'दुष्काळ निवारण फंड' म्हणून एक फंड सरकारानें निराळा काढला. सन १८७८ च्या पूर्वीं १० वर्षांत दोन मोठे दुष्काळ पडले. त्यांच्या मानानें सरकारला सुमारें पंचवीस लक्ष मनुष्यास अन्न पुरवावें लागलें तेव्हां माणशी ५० रुपये सालीना धरले तर १२॥ कोट रुपये एका दुष्काळाच्या निवारणार्थ लागतात दुष्काळानें प्रजा मरूं नये म्हणून अशी योजना केली कीं दरसाल ॥. कोट रुपया पासून १॥ कोट रुपया पर्यंत रकम ठोक उत्पन्नातून निराळी काढावी आणि तिचा उपयोग सार्वजनिक कामें, रेल्वे वगैरे कार्यांकडे करावा म्हणजे रेल्वेचा फैलाव होऊन वाटेल त्या भागातून धान्याचा पुरवठा करण्यांत येईल आणि दुष्काळा पासून बचाव करण्या साठीं लोकां पाशीं दुसरीं अनेक साधनें उत्पन्न होतील. दरसालच्या या फंडामुळें गेल्या दाहा वर्षांत दुष्काळाचा तडाखा पूर्वीं प्रमाणें फार भयंकर भासला नाहीं. महर्गता व धान्याची कमतई अनेक वेळा झाल्या परंतु बाह्य सोयी वाढल्या मुळें लोकांचा बचाव झाला.

परंतु सध्यां सरकार नादारी आहे तेव्हां हा दुष्काळ फंड बंद करून साडे तीन कोट रुपयांची सूट पडत आहे ती दोन कोटीवर आणावी असा कोटिक्रम निघाला. दीड कोट रुपये दुष्काळ फंडाला देण्याचें सरकारानें बंद केलें ही गोष्ट फार वाईट व घातुक घडली. सर्व खानगी कौंसिलदारांनीं वरील युक्तिवादाची योग्य शहानिशा केली. दुष्काळ पासून बचाव करण्याचा फंड मोडून टाकला यांत लिटन शाहींतल्या सत्कृत्यावर पाणी पडलें. प्रजेचें दैन्य दुणावलें आणि सरकारनें आपली प्रतिज्ञा खोटी केली. दुष्काळ फंड चालू ठेवण्या विषयीं प्रजाजनास सरकारचें अभिवचन आहे. आतां हा फंड बंद करणें म्हणजे विश्वासघात होतो. लार्ड लिटन व सर स्ट्रेची यांनीं १८७८ पासून जो उत्तम क्रम घातला तो मोडणें लार्ड एलजिन यांस विहित नव्हतें. या दुष्काळ फंडाचा उपयोग ठराविक व सांकेतिक कामा कडेच होत जावा, चैनबाजीच्या कृत्याकडे होऊ नये आणि या फंडाविषयींचे नियम कडकडीत व्रतानें पाळले पाहिजेत अशा बद्दल खुद्द लार्ड लिटनचे लेखी विचार दफ्तरीं नमूद आहेत. या फंडाचा दुरुपयोग चालू सालच्या बजेटांत करितांना म्हणा अगर हा फंड समूळ बंद करितांना म्हणा मे. वेस्टलांड, बंगालचे लेफ्टनंट गव्हरनर इलियट व खुद्द लार्ड एलजिन यांनीं आपल्या भाषणांत ज्या कल्पना लढविल्या आहेत त्यांचें खरें तत्व अगदीं विश्वासघाताचें, अनीतीचें, व बेभरंवशाचें आहे. कोणी म्हणतात कीं देशभर रेल्वे झाल्या आहेत व इतर बहुत साधनें वाढलीं आहेत त्या अर्थीं दुष्काळ फंडाची जरूर उरली नाहीं. सर इलियट बोलले कीं 'दुष्काळ निवारण फंड' हे सज्ञा चुकीची व भ्रांतिमूलक आहे. सरकारा पाशीं शिल्लक असली तर ती रकम या फंडाच्या नांवानें खर्चिली जाईलच. पण जेथें तूट आरंभीं आहे तेथें दुष्काळ फंडाची गोष्टच विचारांत येतां येत नाहीं. गव्हरनरजनरल म्हणाले कीं लार्ड लिटन यांनीं ज्या गोष्टी केल्या त्या त्यांच्या मागील राज्यकर्त्यांस बांधू शकत नाहींत इतकेंच नाहीं तर एका गव्हरनर जनरलास पुढील गव्हरनर जनरलांस प्रतिबंधक अशी जमाखर्चाची बाब कांहींच ठरवितां येत नाहीं! हा प्रकार अत्यंत निराशाकारक आहे. तथापि इंडिया सरकारा विरुद्ध पार्लमेंट पर्यंत आपली मजल पोचविली पाहिजे आणि या गती शिवाय नेटीव लोकांस न्याय मिळण्याचा दुसरा दरवाजा कोठेच खुला नाहीं !

---

The Berar Samachar

MONDAY APRIL, 16 1894

In the discussion of the Budget the Hon'ble Mr. Playfair has condemned in sweeping terms the Govesnmental policy of absorbing the Famine Insurance Fund to keep down the deficit of three crores and a half below the round figure two. He insisted upon the Government to keep to its old pledge of 1878—the breach of which is evidently a danger—signal. In giving a short history of the Fund he emphatically alludes to the present abuse of it:—

'In the minute issued on 12th March, 1878, by a predecessor of Your Excellency, Lord Lytton, he stated that the sole justification for the increased taxation placed upon the people of India for the purpose of insuring the Empire against the calamities of future famines was the pledge that a sum not less than a million and a half sterling shall be annually applied to it, and His Lordship explained that an additional revenue raised by the new taxes was required not for the necessities of the State, not for general purposes but for the construction of a particular class of public works, and that a pledge had been given by the Government of India not to spend one rupee of the special resources thus created upon works of a different character. And finally Lord Lytton remarked—I use his own words—'to carry out adequately the engagement, thus publicly contracted, immediate, consistent and persistent adherence to certain lines of conduct on the part of the Central Government is absolutely necessary.'

Lord Lyton is dead and gone but one will be extremely sorry if his policy is thus abandoned at one stroke and one sitting of the Imperial Legislative Council. Lord Elgin has ill consulted the noble wishes of the Ryots and has indirectly cast a slur upon the administration of his distinguished predecessor. Lord Elgin proceeds to observe:—

"I Confess I think there is some confunsion of thought in reference to the position of the famine grant. I do not understand how it can be supposed possible for a Government to bind its suuccessors in all time coming to spend its revenue in a certain manner, whatever their judgement of the respective claims upon them may be at the time, and as a matter of fact, from the questions which have been read it does not appear that the Government of that day wished to do so. His Honour the Lieutenant-Governor has given us some very interesting information showing the good purpose to which the objects proposed by those who established the grant has been met."

Towards the close of his speech Lord Elgin confesses his helplessness in the whole matter and concludes with a placid, calm and sensible appeal to the people to trust the Government with good sense and justice.

"It has been acknowledge on all hands that our embarrassments have been serious, but financial embressment may proceed from varions causes. I do not think that on this occasion there has been any disposition to think that our embarrassments have arisen from causes under our control. Criticisms there, no doubt, are—what system of administration of human affairs could expect to escape them?—of different branches of our policy, but I think it is admitted on the one hand that in regard to expenditure we have been, and are, exerting ourselves to keep our expenses within bounds."

We do not think that the Government has acted up to its bow,—wow of deceptive professions.

---

If the following rules be adopted by the several Standing Congress Committees it will be a means of testing the sincirity and earnestness of the delegates of the National Congress. The rules are merely tentative and may be re-modelled to suit the necessities of different provinces:

1 Every delegate shall during the year following his sitting in the Congress bring about not less than four meetings of the people in towns and villages of that part or the country for which he sat in the last Congress, for the purpose of enlisting the sympathy with the congress cause, of explaining them the ends and objects and the means employed, of showing to them how they suffer and how their suffering may be avoided or at least lightened, of removing existing prejudices against the cause, and lastly of asking their cooperation according to their means. He shall address the meeting personally or through other men.

2 The proceedings of such meetings should be forwarded to the local Standing Congress Committee and copies of the same should be forwarded for publication in the nearest local vernacular newspaper.

3 The delegate who fails to do his duty as prescribed above, shall be declared unfit to sit in the next Congress, unless he make out a good excuse.

4 He shall be said to have made out a good excuse, when he has forwarded to the Standing Congress Committee a statement made before any two delegates ( who are not themselves defaulters ), that he was unable to do his duty from causes over which he had no control or that he was penitent for failing to do his duty, asked forgiveness, and promised to do his duty satisfactorily in future.

---

## SHARDA SADANA

A Missionary Dodge

To

The Editor Berar Samachar

Sir

Two weeks ago a friend of mine had a startling news to tell me. He had been to an evening party rather an evening 'Pansupari' at a Christian friend of his. The entertainment was given in honor of one Miss C. a Christian tutrix in the recently notorious Sharda Sadan. She was a young girl of 18 or 20 most sprightly and spirited, as my friend described, but wanting in experience of the world and wishing to revolutionise the Indian household and emancipate her sisters from all the domestic thraldom at one stroke. She told, he said, many an interesting story about the Sadan, cleared or tried her utmost to clear every black thing attributed to her Mistress the well known Pandita and seemed ready to defend her through fire and water. My friend gave me a very flattering picture of this girl that though so young had taken upon her single and unprotected self the task of bringing a Sharada girl to her parental house and was to return that very night ( the night of Pansupari ). This, my friend told me, was told to him by his host. This account was given to me by my friend the very night after his return from Pansupari.

But lo! wonder awaited us the next day. Another friend of mine called upon me at 10 a. m. the next day and told me that a farcical event had occurred that morning in the H † ‡ Wada. At about 8 a. m. a hired cart was seen coming towards the wada and the moment the cart stopped at a distance of about 75 paces from the house, a girl of 18 was seen emerging from the house. Fear and agitation had stamped themselves on her face. She cast terrified glances around and was on the point of going towards the cart when a middle aged man came out after her with anger, despair and misery queerly visible on his face. At the sight of the gentleman who seemed very much like her father the girl beat a precipitate retreat He went towards the cart and angrily demanded of the inmate why he had come there in that manner. The inmate, unfortunately my friend did not tell me who he or she was looked very much crest fallen, made shameless excuses and like a coward, as he must be, threw the whole blame upon the poor girl saying that he had gone there at the express desire of the girl herself and had no hand in persuading her to go with him and sullenly went away with the cart. You and your readers must be wondering what I mean by all this and what connection there is between the heroine of the Pansupari and the heroine of the H Wada.

Be patient, gentle readers, I will explain myself.

Yours faithfully

I

---

## वऱ्हाड.

हवामान—ऊन फार तापतें, उकाडा विलक्षण होतो, अभ्रें पुष्कळ येतात आणि किंचित् पाऊसही पडतो. ह्या सुमार असल्या मुळें अनेक दुखणीं बळावलीं आहेत.

आह्मास लिहिण्यास मोठा आनंद वाटतो कीं वऱ्हाडांतील पेनशनदार आसिस्टंट कमिशनर खान बहादूर हिसामुद्दीन यांस निजाम सरकारच्या कायदे कौंसिलांत सभासद निवडलें. हैद्राबाद दरबारांत खान बहादुरांचा यथायोग्य शिरकाव झाला हें ऐकून वहुतजण संतोष पावतील.

मशार निल्हे खान बहादूर यांच्या अध्यक्षते खाली एक कायत्री नवी शिकंदराबादेस निघाली असून तिच्या रचनेंत विशेष हाच कीं तिच्या वाचकांस वर्गणी माफ आहे.

'अमृतराव आबाजी विरुद्ध देवराव विनायक' हा दिवाणी खटला विद्यमान विश्वनाथ नारायण दांडेकर यांच्या कोर्टांत चालू होता तो गेल्या सोमवारीं निकालास लागला. रा. रा. गणेश श्रीकृष्ण खापर्डे यांनीं या प्रकरणांत प्रथम पंच या नात्यानें दहा महिने चौकशी करून नंतर निकाल सांगितला. परंतु हा पंचाचा निकाल रद्द व्हावा ह्मणून प्रतिवादीची तक्रार होती ती अखेर गैरवाजवी ठरून पंचाचा निकाल कोर्ट मार्फत कायम झाला. आपसांत तडजोड करावी व विकोपाला जाऊं नये हाच सज्जनांचा मार्ग.

रा. रा. गणश बापूजी एक्स्ट्रा असि० कमिशनर हे रजेवरून परत येथें आले आहेत. लवकरच यवतमाळास रवाना होतील.

राव साहेब सिताराम विश्वनाथ पटवर्धन बी. ए. डायरेक्टर यांची स्वारी उमरावतीहून इलिचपूरास गेली आणि नंतर चिखलदऱ्यास कमिशनरचे भेटी साठीं जातील.

एक वाईट खबर मोठ्या दुःखानें कळवावी लागते कीं रा० रा. गणेश गोपाळ दहिगांवकर क्लार्क आफ कोर्ट वाशिम हे गेल्या पांचवे तारखेस निवर्तले. वय सुमारें ४० वर्षांचें होतें. यांच्या आंगीं आज्ञाधारकपणा, गोड बालणें, मनमिळाऊ व हौशी स्वभाव इत्यादि गुण विशेष होते आणि ह्मणूनच हे लहान चाकरीपासून मोठ्या हुद्याला चढले. यांच्या मरणानें त्यांची तरुण पत्नी, वृद्ध पिता व इतर आप्तजन अगदीं निराधार झाले. हरी ठेवील तसें खरें!

रा. रा. केशव भास्कर गोळे हेडमास्तर पिंपळगाव हे क्षयाच्या आजारानें गल्या शनिवारीं मरण पावले हें कळविण्यास दुःख वाटतें. हे पाणीदार व हुशार पंतोजी होते. मागें चिरपारिस्याचा विस्तार मोठा आहे ईश्वरच त्याचा वाली!

---

## नोटीस.

---

राजश्री रामजी वल्लद भवानी कुळकर्णी व बापु वल्लद नारायण जात गुरव राहणार मौजे खेकडी तालुके आकोले यांस.

खाली सही करणार यांजकडून कळविलें जात आहे कीं मौजे खेकडी तालुके अकोले येथील शेत सर्वे नंबर २५।२६।२७ व करामदबाद तालुके आकोलें येथील सर्वे नंबर ६ असी शेते ४ बापजींनें आम्हांस खरेदी दिल्या वरून त्या संबंधानें हुकूम नाम होऊन आमची पुर्ण मालकी झालेली तुम्हांस माहीतच आहे

सदर्हू दर्शविलेली च्यारी सेते दहा वर्षांचे पट्यानें तुंम्हांस वहीतीस दिलीं आहेत. ती मुदत तुमची लेखी पट्या प्रमाणें गेल्या मार्च महिन्या पर्यंत पुरी झाली आहे तर तुमचे कडेस चढलेले साला़चे स्वामीत्वा बद्दल येणे रुपये आहेत ते ही नोटीस पावल्या पासून पंधरा दिवसांचे आंत आमचे दुकानी आणून पोहोचतें करावें व पुढे तुंम्हा जमिनीची किस्तगारी करू नये असें विषयीं या नोटीसीनें मनाई केली आहे.

सदर्हू नंबरातील बामळी वगैरे झाडाच्या कच्या मौल्यवान किमतीच्या अशीं झाडे आमच्या मालकीचीं तुंम्ही आमचे परवानगी वाचून तोडून विकल्याचे कळलें तर या बदल तुंम्हावर ब खरीदि घेणारावर फौजदारीत चोरीचा खटला अर्ज वगैरे देऊन करण्याची तजवीज केली जाइ[illegible] नुकसानीचा ही दावा करून जो [illegible] होईल ती कोर्ट खर्चा सुद्धा भरून घेतली जाईल सदर्हु बाबद ही नोटीस पावल्या पासून १५ दिवसात आमचे कडेस येऊन निकाल करावा. तसें केल्यास कायदेशिर तजवीज केली जाईल कळावे तारीख १२ माहें येप्रील सन १८९४

(सही)

चुनाबाई जवजे मुकंदलाल खातेदार

तर्फे मु० रामजी येकोबा

गु० दस्तुर खुद

---

नोटीस

रा. रा. जमनादास देवीदास मारवाडी राहणार विहीगाव तालुके खामगांव यांस नोटीस देणार लक्ष्मण वल्लद हरी महाले राहणार अठळी तालुके खामगांव नोटीशीनें असें कळवितो कीं माझा चुलत भाऊ नामे पुंनाजी व. कृष्णाजी महाले यानें तुह्मान वळ तारीख ४ माहे मार्च सन १८९१ इसवी रोजीं सरवे नंबर २७२ एकर तीस ३० गुंठे ३३ अकार रुपये २७ चे मौजे अठळी परगणे बाळापूर तालुके खामगांव जिल्हा अकोलें हें शेत रुपये ६०० श्यांस गहाण ठेविलें. व सदर्हू रुपये ६०० श्यांस व्याज दरमहा दर शेंकडा रुपये १ दोन प्रमाणें देणेंचें ठरलें. व हें सदरील घेतलेले रुपये ६०० व्याजासुद्धा समत १९९० मार्गशीर्ष शुद्ध ५ रोजीं तुह्मास परत द्यावे अशा करारानें सदरील व्यवहार तुह्माशीं झाला. गेले श्रावण मासीं माझा भाऊ पुंनाजी वल्लद कृष्णाजी मयत झाला नंतर मी त्याचा वारस ह्मणून सदरहू तुह्मास गहाण दिलेलें शेत माझे नावें सरकारांत लागलें. गहाण कागदाप्रमाणें मी तुमचे रुपये ६०० व्याजासुद्धां तुह्मास देण्यास आज सुमारें दोन महिन्यांपूर्वी तीन चार वेळां आलों परंतु तुह्मी रुपये घेऊन पावती दिली नाहीं इतकेंच नाहीं तर विनाकारण आह्मास त्रास देण्याच्या इरादयानें तुह्मी दिवस गत लावीत आला त्यामुळें आमचें सर्व प्रकारानें नुकसानी होत आहे करितां तुह्मास या नोटीशीनें असें कळविलें जातें कीं नोटीस पावल्या पासुन दाहा दिवसांत तुमचे गाहाणाचे रुपये (६००) व त्याचे व्याज अशी रकम आह्मी रा. रा. सोनाजी व॥ माहादाजी लोखंडकर राहणार लोखंडे तालुके खामगांव यांच्या दुकानावर ठेविली आहे तर रीती प्रमाणें भर पावती व गाहाणकागद देऊन रुपये घेऊन आपला निकाल करून घ्यावा. असें केलें नाहीं तर सर्व प्रकारची आमची नुकसान तुह्मा पासुन भरून घेऊ. व तुह्मी आह्मावर विनाकारण या सदरील रुपये बदल फिर्याद वगैरे केल्यास त्याचे जबाबदार आह्मी कोणच्याही प्रकारचे नाहीं हें तुह्मास कळावें. ह्मणून दिली नोटीस सही तारीख १२ माहे एप्रिल सन १८९४ इ०

(सही)

लक्षुमण वा॥ हरी माहले वस्ती

राहणार अटाळी तालुके

खामगांव दस्तुर खुद.

---

## वर्तमानसार.

सामरसेंटमध्ये आशाविक फोर्टे येथें खनिज तेलाचा झरा लागला आहे.

मि. ग्लाडस्टन यांणीं राजीनामा दिल्यामुळें रशियनलोकांस फार वाईट वाटत आहे.

लाहोरच्या आसपास बरेच दरवडे पडतात त्या पैकीं कांहीं दरवडेखोरांना पकडल्याचे समजतें.

मि. ग्ल्याडस्टन साहेब मुख्य प्रधान यांचा राजिनामा कबूल झाल्यामुळें त्यांच्या डोळ्यावर शस्त्रप्रयोग डाक्टर करणार आहेत.

दक्षिणेंतील रयतेच्या सुधारणुकी बद्दलच्या कायद्याचा मसुदा तयार झाला व तो गव्हरनर जनरलांच्या कायदे कौन्सिलापुढें ठेवण्यांत आला.

हल्लीं सरकारी नोकरींत हिंदु किती आहेत व मुसलमान किती आहेत आणि लोकसंख्येच्या मानानें ते आहेत कीं नाहींत अशा विषयावर हिंदुस्थान सरकारच्या कायदे कौन्सिलांत मि. फजलभाई विश्राम हे लवकरच एक प्रश्न पुढें आणणार आहेत.

म. मि.

पावसानें नाश—शिराझ (इराण) येथून आलेल्या तारेच्या बातमी वरून कळतें कीं, तेथें नुकतीच एक सारखी २० तास पर्यंत पर्जन्यवृष्टी होऊन त्या सपाट्यांत सुमारें २००० घरांचा नाश होऊन गेला! कित्येक जागचा शहरचा तट पडला. तेथील लोक विपत्तिग्रस्त होऊन गेले आहेत. दुसऱ्याही कित्येक गांवीं ह्या अति वृष्टीनें नाश होऊन कित्येक लोक प्राणास मुकले.

सर्प दंशावर स्ट्रिकनिया (कांजऱ्याचा अर्क) चा तोडगा करण्याचे संबधानें हिंदुस्थान सरकारानें हल्लीं विचार चालविला आहे असे तोडगे करून गूण आल्यांची उदाहरणें जमवणेंत येत आहेत.

हैद्राबादचे रेसिडेंट मि. प्लौडन हे ब्रह्मदेशचे कमिशनर होणार अशी गप्प होती. येथील दिवाण साहेबांची ६ महिन्याचीं मुदत भरत आली म्हणून त्यांस कायम करण्याकरितां कलकत्याकडे संधानें सूरू झालीं आहेत असें समजतें.

भयंकर कृत्य—आग्रा जिल्ह्यांत थोडे दिवसांपूर्वीं एक भयंकर कृत्य झालें. मुरा नावाचा एक ब्राह्मण एकाची बायको घेऊन पळाला व कांहीं महिन्यानीं तिला घेऊन परत आला. तें तिच्या नवऱ्यास कळतांच तो ७ असामींनिशीं त्याचे घरीं गेला; आणि पाहतों तों आपली बायको तिचा जार आणि मुलगी अशीं कड्या लावून आंत आहेत असें पाहतांच त्यानें घरास बत्ती ठोकून दिली? व ती तिन्ही मनुष्यें आंतल्या आंत जळून मेलीं!

देवळांवरील कराचें प्रकर्ण—काशि क्षेत्रांतील म्युनिसिपालिटीनें हिंदु देवळावर घरपट्टीचा कर बसविल्या बद्दल हिंदुस्थान सरकारचे कायदे कौन्सिलांत प्रश्न विचारण्यांत आला होता, त्याचा जबाब असा देण्यांत आला कीं काशींतील हिंदु देवालयाचा उपयोग ब्राह्मण वगैरे लोक बिऱ्हाडें करण्यांत करितात; यास्तव तीं देवळें करास पात्र आहेत. काशींतील म्युनिसिपालिटींत लोकनियुक्त हिंदु मेंबर पुष्कळ आहेत, त्यांणीं विचार करूनच पाणी पट्टीच्या रूपानें हा कर बसविला आहे.

लेथब्रीज साहेबांचा प्रयत्न—मानी प्रेस कमिशनर मि॰ लेथब्रीज हे हिंदुस्थानांतील प्रमुख जमिनदारांची एक मंडळी स्थापन करण्याचे प्रयत्नांत आहेत असें कळतें. जमीन दारांचें हक्कांचे हरण सरकार करीत आहे अशी लेथब्रीज साहेबांची समजूत असून त्याचे संरक्षण करितां विलायतेंतील कामन्स सभे पर्यंत प्रकर्ण चालवावयाचें असा त्यांचा मानस आहे.

दुर्भिक्ष—मध्य प्रांतांत यंदा गव्हांचें पिकाचा नाश झाल्यामुळें सु॰ एक लक्ष मनुष्यांचें पोटास मिळण्या करितां सरकारातून रिलिफ वर्कसचीं कामें सुरूं करावी लागतील असें प्रसिद्ध झालें आहे.

राजघराण्याची दुर्दशा—अयोध्येचे माजी नवाबाचे चिरंजिवानीं आपणांस नादार ठरविण्या बद्दल अलिपुर येथील डिस्ट्रिक्ट जज्ज कोर्टांत अर्ज केला आहे!!

वादळानें आगगाडी उडाली—मारिशस बेटांत गेल्या ८ व्या तारखेस मोठा अनर्थ झाला ५० उतारूनीं भरलेले आगगाडीचे ६ डबे सेंटलुइसच्या पुलावर गाडी आली तेव्हां मोठा झंझावात सुटून त्याणें उडून गेले व नदींत जाऊन पडले अर्थातच आंतील मनुष्यांस जळ समाधि मिळाली!!

स॰ शो॰

नागपूर येथील स्टेशनावर एका कच्छानें रुपयांनीं भरलेले ३ बद्रे स्टेशनच्या पडवींत आणून ठेवले व आपण तिकीट काढावयास गेला. दोन मिनिटांत परत येऊन पाहतो तों त्यांपैकीं एक बद्रा २६०० रुपयांचा गहाळ झाला सदरहु चोरीचा पत्ता अद्याप नाहीं.

फिलिपाईन बेटांत बंड झालें आहे, म्हणून स्पेनमधून सैन्य तिकडे जात आहे. हें बंड जपानी व इतर परकी लोकांच्या चिथावणीवरून उठलें असावें, असा संशय आहे.

मिचिगान सरोवर अमेरिकेच्या पूर्व किनाऱ्यावरील बंदरास एका प्रचंड कालव्यानें संयुक्त करण्याचा विचार घाटत आहे. कालवा १८० मैल लांबीचा होईल. व तो झाल्यास ७०० मैल मोठ मोठ्या सरोवरावरून घडणारा प्रवास वांचेल. लंडन, न्युयॉर्क, चिकागो येथील बहुकोट नारायणांनीं आपल्या थैल्यांचीं तोंडें मोकळी सोडण्याचा बेत चालविला आहे. खर्च सुमारें ५ कोटि डालर्स येईल.

रशियांत लवकरच सोन्यारुप्याचें हिरा माणकाचें प्रदर्शन व्हावयाचें आहे.

ज्योतिषी म्हणतात कीं ह्या वर्षांत या देशावर मोठे मोठे उपद्रव उद्भवणार आहेत.

कापूस—गेल्या जानेवारी महिन्यात ३,२२,२७,१०६ इतके रतल ८८,३१,००६ रु॰ किंमतीचा कापूस मुंबई बंदराहून रवाना झाला.

हिंदुस्थान व सिलोन—लंका यांच्या दरम्यान एक रेलवे करण्याचा विचार विलायतच्या लोकांत चालू झाला आहे. या कामास खर्च फारच लागणार आहे. ही रेलवे झाल्यानें उभय देशाच्या दरम्यानचा व्यापार वाढेल असें त्यांचें अनुमान आहे. हल्लीं कलकत्याचे तांदूळ जलमार्गानें सिलोन बेटांत जात असतात ते या रेलवेनें जाणार नाहींत असें ही त्याचें अनुमान आहे.

राज्यव्यवस्थेंत बदल—काश्मीरच्या राज्यव्यवस्थेंत पुष्कळच बदल होणार असल्याची वदंता आहे.

विजेचें एंजिन—हार्वी आणि पारिस यांच्या दरम्यान जाणाऱ्या एका गाडीस विजेचें एंजिन लाविलें होतें. ही गाडी एका तासांत ७१ मैल अशा वेगानें चालविली होती.

शेतकरी गव्हरनर—मद्रासच्या शेतकी बगाईतीच्या प्रदर्शनामध्यें मद्रासचे गव्हरनर यांस २ आणि पत्नी यांस १० रुपयांचीं अशीं बक्षिसें मिळालीं. कसा उद्योग आहे पहा।

कोर्टांत मारामारीची वेळ—गया येथील सबा. जज्ज बाबु ब्रिज मोहन प्रसाद यांचे कोर्टांत एका मुसलमान मौलवीची साक्ष चालली होती. साक्षीदार कठड्यास ओटंगून उभा राहिला होता, त्याला नीट उभे राहण्याविषयीं कोर्टानें सांगितले असतां त्यानें बेपर्वाईनें ऐकिलें नाहीं; म्हणून कोर्टाच्या शिपायाला त्याला नीट उभा करण्याचा हुकूम झाला. एका मुसलमान वकिलानें साक्षीदार मौलवीची कड घेऊन तोंड घातलें. इतक्यांत तेथें असलेले सुनी लोकही खवळून "मारो मारो" म्हणून ओरडूं लागले, त्यावेळीं मारामार व्हावयाचीच; परंतु हो हो करून शांतता झाली!

न्या. सु.

दक्षिण मलबार येथें मोप्ला लोकांनीं दंगा केला व हिंदु लोकांचीं दोन देवळें जाळलीं.

आस्ट्रिया व रशिया यांजमध्यें व्यापारासंबंधीं तहनामा झाला.

स्काटलंडला होमरूल मिळण्या बद्दल पार्लमेंटमध्यें अधिक मतानें ठरलें.

फ्रान्सांत ९१,७६,००० लोक शेतकीवर आपली उपजीविका करतात. ७,८९,००० व्यापारी पेढ्या ७०००,००० मजुरदार; ८ लक्ष फौजेवर २३,००० वर्तमानपत्रकर्ते वगैरे या प्रमाणें निरनिराळ्या धंद्यांत लोक गुतले आहेत.

सु. प.

चोरीचे जिन्नस ठेवण्यांत सुधारणा:—यूरोपांत इतर ज्या सुधारणा होत आहेत, त्या बरोबर चोरही आपल्या कसबांत सुधारणा करीत आहेत असें पुढील गोष्टीवरून म्हणणें भाग आहे. पारिस एथील एका भिकदर चोरानें एका जवाहिऱ्याचें एक वड्याळ चोरलें. त्याला पोलिसांनीं पकडून त्याचा सगळा झाडा घेतला, पण वड्याळ कोठें सांपडलें नाहीं. शेवटीं एका पोलिसचें लक्ष त्या चोराच्या तळव्याकडे गेलें तों तें त्यास फारच मोठें दिसलें. तेव्हां त्याच्या पायाचे तळवे तपासून पहातां ते कृत्रिम आहेत असें दिसलें तेव्हां ते फाडून तोडून पाहिलें तों त्यांत घड्याळ निघालें.

शु॰ सू॰

नोटीस

बाबडू वलद धनजी, इब्राम वलद गंगाजी, सखाराम वलद पांडू, कृष्णा नारायण, कालू वलद सपडू, फकिरा सुराजी, तानू वलद देवाजी, फकिरा रुपला, फकिरा हिराजी, रावजी वेडू, गोविंदा श्रावण, बळवंत लक्ष्मण, गणपत पांडू, नथू गंगाजी, मीरन पिंजारी, लक्ष्मण गंगाजी, सुपडू महादू, व लक्ष्मण सुपडू राहणार वस्ती मौजे रिंगणगांव तालुका एरंडोल जिल्हा खानदेश व सखाराम व॰ उखा वस्ती पिंपळकोठें उमाळ तालुका पेरंडोल जिल्हा खानदेश यांस. खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुम्ही वापरत असलेले नंबर माझे व माझे नांवावर आहेत व त्या बद्दलची देखरेख मात्र माझ्यातर्फें ती. रा. रा. माधवराव भाऊ मोघे उर्फ काकासाहेब अजूनपर्यंत पहात आहेत. परंतु आतां या नंबराची देखरेख मी स्वतः पहाणार करितां यापुढें जर माझे नंबर तुम्हास वापरावयाचे असतील तर कांहीं एक हरकत न दाखवितां येत्या जून पहिलीच्या आंत कायद्याप्रमाणें कबुलायती लिहून द्याव्यात व द्यावयाच्या नसल्यास हा नोटीस पावल्यापासून १५ दिवसाचे आंत नंबर सोडून मला लेखी कळवावें. तसें न कळविल्यास तुम्ही कबुलायती लिहून देण्यास तयार आहांत असें मी समजेन. व जून पहिली पर्यंत तुम्ही स्वतः कबुलायती लिहून देण्याची तजवीज न केल्यास मला मुखत्यार वगैरे पाठविण्याची तजवीज करावी लागेल. व त्या संबंधीं झालेला सर्व खर्च या नोटीशीच्या खर्चासुद्धां तुम्हाजवळून भरून घेतला जाईल. शेत न सोडल्यास व कबुलायती लिहून न दिल्यास कायद्या प्रमाणें व्यवस्था करण्यांत येईल कबुलायती देणें त्या मी किंवा मजकडून जो मुखत्यार येईल त्या शिवाय इतरास दिल्यास मला पसंत नाहीं. कबुलायतींतील अटी आपल्या दोघांच्या संमतीनें ठरतील. कळावें. तारीख १६ माहे एप्रील सन १८९४ इसवी.

(सही) वासुदेव रामचंद्र मोघे रिंगणगांवकर मुक्काम अकोलें प्रांत वऱ्हाड.

NEARLY READY

**CRIMINAL COURT MANUAL.**

*for the*

Hyderabad Assigned Districts

by

Mr. R. Obbard

assisted by

Syed Meer Alum,

Containing the uncancelled Notifications of the Government of India extending Laws and promulgating Local Laws (with reprints of Forest Law, Abkari Rules, Municipal Act, Courts Law, Rules, regulating Legal Practitioners and other Local and Special Laws), the Notifications and rules published under the authority of the extended Laws, the uncancelled Circulars and Orders of the Government of India, Resident, Commissioner, and Judicial Commissioner relating to Crimial matters, and full information in regard to the prescribed registers, returns and forms, to be used in and by Criminial Courts, with notes by Mr. R. Obbard, and a copious Index.

PRICE RUPEES 5

Subscriptions registered by Syed Meer Alum at the office of the Civil and Sessions Judge, Amraoti Camp Berar.

☞ हें पत्र आकोलें येथें के॰ वा॰ खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

सालवारी ... ,, १८
किरकोळ अंकास ..................४

नोटिशीबद्दल.
१. ओळीचे आंत रु० १
पुढें दर ओळीस ०।०६
दुसरे खेपेस .........०।

Six monthly...........3 8 as.
Single copy.................................. 4as

# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR.

Advertisement
Below 10 lines...2 Rs
per line over10... 4 as
Repetition per line 3 as

VOL XXVIII AKOLA MONDAY 23 APRIL 1894 NO 16

वर्ष २८ आकोला सोमवार तारीख २३ माहे एप्रील सन १८९४ अंक १६

ह्या राजश्रानें ... काढल... एका गृहस्थाम...
...का जुल्मी सरकारानें कारागृह दाखविलें. तो त्यांत कोंडला होता त्याच्या मजबूत दगडी भिंती पाहून त्याच्या मनाची खात्री झाली कीं, आतां आपलें राहिलेलें आयुष्य ह्या एकांत व भयाण कारागृहांत घालविलें पाहिजे. जरी त्याला आतां पुढची गत चांगली नाहीं असें भासत होतें तरी त्याला दुःखांत सुख इतकेंच वाटत होतें कीं, मला जुलमामुळें बळी व्हावें लागलें परंतु सद्वर्तनाचें उल्लंघन केल्यामुळें कांहीं नाहीं. जर त्याच्या स्वाधीनची गोष्ट असती तर ह्या संकटांतून तो सहज पार पडला असता.

असें असून त्या बिचाऱ्यास सतत सोळा वर्षे हाल काढीत राहावें लागलें. हीं वर्षे संपतात तों त्याच्या मनांत आलें कीं, ह्या भिंतीवर पुढें आलेल्या दगडाच्या आधारानें वर चढावें व त्यानें खिडकीच्या वरून काय दिसतें ह्मणून वर डोकें केलें. आणि असें हें केल्या मुळें त्याला वाटलें कीं पुढें लोखंडाचे गज आहेत ते काढून टाकतां येतील व त्या चौकटीची आगळही लावली नव्हती. त्याच्या मनांत घोळूं लागलें कीं, काय मी पळ कां न काढावा ? त्यानें खिडकी तर उघडली आणि सहा फूट उडी जमीनीवर मारली आणि त्या प्रदेशांस शेवटचा राम राम ठोकला. जर त्यानें त्याच्या ठाम झालेल्या विचारास एकीकडे ठेऊन विचाराची दोरी जर सैल सोडली असती तर ह्या स्थळीं इतके दिवस कुंथत राहावें लागलें नसतें.

ह्या स्वधर्मार्थी प्राण अर्पण करणाऱ्या या विचाराची दैववटित गोष्ट साधक व बाधक आहे. त्याच्या मनाची धांव बंद केल्यामुळें साधक. त्याला ज्या कारागारतव बंदींत टाकावयाचा होता तें नसल्यामुळें बाधक.

ही गोष्ट पत्र रूपानें जो सर्वांस आवडेल त्या प्रमाणें खालीं थोडक्यांत व साध्या शब्दांत सांगतों. एक लेखक बाई ह्मणते कीं आज सोळा वर्षें झालीं, पित्त क्षोभानें व अशक्तपणामुळें फारच गांजून गेले आहे. नेहमीं थकून जाऊन अगदीं हलक होऊन जाई. माझी अन्नावरची वासना उडाली, पुढें आणलेले ताटास हात लावीन तर शपथ. कित्येक दिवस माझ्यानें एक घास देखील खाववत नसे. कधीं कधीं मला मळमळ सुटे पोटाचा नगरा होई आणि तोंडावाटें मोठा वह बेडका येई.

मला फारच त्रासदायक खोकला होऊन व बरगड्यांत फारच वेदना होत व दम बरोबर लागत नसे. मी फारच हलक झाले आणि दुकानांत आंत बाहेर करण्याचा माझा तकवा अगदीं निघून गेला. सन १८९१ च्या दिसेंबरांत माझ्या एका गिऱ्हाईकानें मदर सिजेलचा क्युरेटीव सिरपा ( माता-

सिजेलचा रोगहारक पाक ) बद्दल बरेच गुणानुवाद गाईल्या मुळें मी तें औषध घ... ... मी थोडें थेंब घेतल्या बरो... ...न वाटलें आणि पुढें पंधरा दिवस औषध घेतलें नाहीं तरी मला बरें वाटत होतें. मला असा धीर आला ह्मणून मी अगदीं बरी होई तों पर्यंत ह्या औषधाचा उपयोग केला. आमचे चिरंजीव आरपरास एक वर्ष सतत जडत्वाचा जड झाल्या मारखें व वेदना होत होत्या, आणि पोटाची दुखणी होऊन खळग पडल्या सारखें वाटे. त्याला हें औषध घेण्याची मी गळ घातली आणि त्याचा शेवट ह्मणाल तर बाइचा पारखाच झाला. मला पक्कें माहीत आहे कीं, ह्या प्रदेशांतल्या बऱ्याच मंडळीनें दुसरे नाना उपाय करून थकले व जेव्हां ह्या सिरपाचा ( पाकाचा ) उपयोग केला तेव्हां तात्काळ गुण आला ह्या औषधाचा ( ह्मणजे मा. सिजेलच्या सिरपाचा ) मला रामबाण गुण आला तो इतर पिडीतास ह्या मुळें घावा असें आपणास वाटत असेल तर हें पत्र आपण बेलाशक छापावें.

मी तुमची
( सही ) ( मिसेस ) एम वार्ड
१५४ डकसटन रोड
शडफर्ड नोटिंगहाम
ता. १ ली माहे एप्रिल सन १८९२

मिसेस वार्ड बाई साहेब ह्या त्रासदायक व भयंकर रोगा पासून बऱ्या झाल्या ह्मणून आह्मा तीस अभिनंदन करितों आपल्या आयुष्यांत सोळा वर्षांचा काळ सतत शारीरिक व मानसिक वेदनेंत घालवावा ह्मणजे फारच खराब समजावयाचें. कुवेराचे संपत्ती होणें फारच थोड्याच्या ललाटीं लिहिलेलें असतें, परंतु सुदृढता ही सूर्यप्रकाशा सारखी सर्व जगभर जिकडे तिकडे सारखी पसरतें तद्वत् ही पसरली पाहिजे. ही कमी राखावी हें त्याला अवगत आहे. तर तो त्याची काळजी घेईल व तो दूर झाल्यास आपल्या स्वाधीन करून घेईल.

ह्या बाईचा रोग पचनीय पिंडाचा ह्मणजे अग्निमांद्य व अजीर्णाचा होता, जो रोग फारच धोक्याचा व दुःख देणारा आहे, कारण कीं ह्या रोगाचा पगडा इतका बसतो कीं शरिरांतलीं सर्व अंगें ह्याच्या बळी पडतात व रक्ताभिसरणामुळें ह्या रोगाचें बीज सर्व शरिरांत पसरतें .ह्या रोगाचें मुख्य कारण निरनिराळ्या नांवानें होणारे परिणाम व चिन्हें हीं होत. तो जें औषध सांगते त्याच्या गुणाची ज्यास चांगली माहिती झाली आहे त्यास नवल वाटण्याचे नको. मोठ मोठाले असाध्य रोग ह्या औषधास शरण येतात.

आमचे वीर जे आपल्या गुहेंत कसा तरी वेळ काढीत होते. त्यास बाहेर निघून जाण्याची युक्ति माहित नव्हती.

जर ह्या ओळी अवलोकन करणारे दुःखा-

च गुलाम झाले असतील तर त्यास तसें राहण्यास कांहीं कारण दिसत नाहीं

तिच्या सचोटीच्या आटोक्यांत लिहिलेल्या पत्रा वरून रोगाचें शमन कसें होईल ह्याचा रस्ता दाखवून देतों. हें आमच्या पत्रव्यवहार करणाऱ्या गृहस्थाच्या लेखा वरून समजेल.

H. D.

## नोटीस

रा. रा. मोहन हरलाल व किसन हरलाल दुबे राहणार खामगांव यांस.

खालीं सही करणार यांजकडून नोटीस करण्यांत येते कीं, तुह्माकडे आमची खाते बाकी येणें रुपये १६५ बद्दल एकशें पासष्ट ते रुपये आज पावेतों हिशेब करून व्याजा सुद्धां चुकते करून आमची रसीद घेऊन जावी. व दुसरें आह्मी तुह्मां उभयता पैकीं किसन हरलाल यांचे मार्फत मनीआरडरी ३ तीन केल्या. त्यांचा तपशील खालीं लिहिले प्रमाणें:—

१५१॥ देवीप्रसाद खुशाल शुक्ल राहणार घरणगांव यांस करविण्या करितां रुपये १५० ची व १॥ दीड रुपया टपाल खर्ची बद्दल दिले.

५०॥ त्रिम्बक झिनूलाल दिक्षित राहणार नाशिक यांस करविण्या करिता रुपये ५० ची व टपाल खर्चीबद्दल आठ आणे दिले ते.

१९।। त्रिम्बक झिजूलाल दिक्षीत रहणार नाशीक यांस करविण्या करितां रुपये १९॥ व टपाल खर्ची बद्दल चार आणे दिले ते.

२२१॥।

याप्रमाणें तीन मनीआरडरी पोंचल्या बद्दल पावत्या व वर लिहिलेली रकम रुपये १६५ हे तुह्मी ही नोटीस पावल्याचे तारखे पासून आठ दिवसांत द्यावे. व तसें न होईल तर रिती प्रमाणें दिवाणी कोर्टांत फिर्याद करणें भाग पडेल. आणि तुह्मी व आह्मी आप्त असून त्रासास कारण होईल. एवढ्या करिता तुह्मास नोटिशीनें कळविलें आहे. तर नोटिशीचे खर्ची सुद्धां रुपये द्यावे. कळावें तारीख १६ माहे एप्रील सन १८९४ इसवी.

सही
१ ( सही ) गणपत नारायण मिसर
नाशिककर दस्तुर खुद्द.
हल्लीं वस्ती खामगांव

## विजया दशमीचें सोनें

( १४ व्या अंकावरून चालू )

Sweet veiws which in our world above
Can never well be seen
Were imaged by the water's love
Of that fair forest green:
And all was interfused beneath
With an Elysian glow,
An atmosphere without a breath,
A softer day below.
Like one beloved, the scene had lent
To the dark water's breast
Its every leaf and lineament
With more than truth exprest;
Until an envious wind crept by,
Like an unwelcome thought
Which from the mind's too faithful eye
Blots one dear image out.
—Though Thou art ever fair and kind,
The forests ever green,
Less oft is peace in Shelley's mind
Than calm in waters seen !

P. B. Shelley

देखावा सुमनोहर भूवरि या पाहिला
कधीं न असा ।
कासार–दर्पण–गत स्नेहोद्रेकें गमन
दिव्य कसा ? ॥ २८ ॥
रमणीय सृष्टि–रचना, नंदन वन
साम्यता जळीं पावे ।
निर्वात नभोमंडल, अपरुष दिन यासि
काय तोलावें? ॥२९ ॥
या स्वच्छ सरोभागीं बहु तरु फल–
कुसुम रेखिलें भव्य ।
वाटे वस्तु स्थितिहुनि जल–गत वन कांति
हेचि मज दिव्य ॥ ३० ॥
ज्या परि रमणी–निर्मल–हृदयीं
सद्भाव सर्व उमटावे ।
पतिचे; तसेंचि येथें स्नेहप्राचुर्य,
काय तें गावें ! ॥ ३१ ॥
अप्रिय मनोरथ जसा प्रियरमणी–मूर्ति
घालवी पूर्ण ।
सद्भाव ग्रहणक्षम–सत्यनयन–
मनसांतुनीं तूर्ण ॥ ३२ ॥
पवन करी हाहि तसा एक पळांत
नष्ट मत्सरधी ।
जलगत मनोज्ञ रचना, दुष्ट–कृति
कोणती असेल सुधी ॥ ३३ ॥
अनुराग तव असे दृढ, तव रूप मनोज्ञ ।
सर्वदा वनिते ।
वनराजि हरित्, नग हे आमिनवहाचे,
रम्य जरि जलाशय तें ॥३४॥
मन्मानसा न शांती–तप्त सदा–
स्वस्थता न ती थोडी ।
निर्वात भू प्रदेशीं विमल सरोजलाहि
जी कधीं जोडी ॥ ३५ ॥

## एका वाघाची दोन युरोपियनावर झडप.

" मॉर्निंग पोस्ट " वर्तमान पत्राच्या श्री नगर येथील एका बातमीदारानें एका वाघाची एक विलक्षण हकीकत कळविली आहे. तिचा सारांश असा कीं, गेल्या मार्च महिन्याच्या २१ वे तारखेस काश्मीर येथील स्वेडिंग आणि कंपनी या नांवाचे मोठ्या पेढी वरील वुईल किन्सन व मेनर्ड नांवाचे दोन नोकर गृहस्थ सकाळींच एका टेंकडीवर

फिरावयास ह्मणून गेले. फिरत असतां एखादा शिकार कदाचित् सांपडली तर करतां यावा ह्मणून मेनर्ड यानें एक बंदूक घेतली व वुईल किन्सन यानें झाडें तोडण्यास ह्मणून एक कुऱ्हाड घेतली. टेंकडी वरून जातां जातां कांहीं खडकांचे फटींत एक मोठें मधमाशाचें मोहोळ त्याच्या दृष्टीस पडलें. काश्मीर हें शहर मोहोळांविषयीं फार प्रसिद्ध आहे तेथें मोहोळें हरहमेश लागतात. कित्येक लक्षावधि माशांचीं मोहोळें तर एकाच ठिकाणीं वर्षानुवर्ष आहेत व त्यांत पाहिजे त्या ऋतुंत हवा तितका मध सांपडतो. त्या दोघांनीं तें पाहिलेलें मोहोळ मोठ मोठ्या खडकांच्या एका लांब फटींत असून त्यापुढें एका झाडाच्या मुळ्या पसरल्या होत्या. ह्या मुळ्या तोडून आंत जाण्यास वाट करावी अशा इराद्यानें त्यांच्या कुऱ्हाडीनें कांहीं मुळ्या तोडल्या. परंतु दगड एकमेकास चिकटलेले असल्यामुळें त्यांचा व्हावा तसा आंत प्रवेश होईना. ह्मणून मेनर्ड यानें कांहीं सुरुंग लावले. इकडे वुइल किन्सन कांहीं पक्षांची शिकार करूं लागला तेव्हां त्या सुरुंगाच्या व बंदुकीच्या आवाजांनीं जवळपासच्या खडकांच्या सांधीतून एक वाघ चवताळून गर्जना करीत सपाट्यानें बाहेर आला व येतांच त्यानें वुईलकिन्सन यावर झडप मारली व त्यास खालीं पाडून त्याचे तोंडावर जाऊन बसला. वुईलकिन्सन वाघास पाहतांच भर्मगळीत झाला व त्याचे हातांतील बंदुक गळून खालीं पडली. बंदूक ते वेळीं रिकामीच होती. ती बंदूक मेनर्ड यानें उचलली. तींत बार भरण्यास त्याजवळ कांहींच साधन नव्हतें तथापि ती तशीच तोंडाशी धरून मागून हळूच जाऊन तिच्या बुंधाचे दोन तीन रट्टे जोरानें त्या वाघाचे डोक्यावर त्यानें मोठें धारीष्ट करून मारले. त्या सरशी वाघानें वुईलकिन्सन यास सोडलें व मेनर्डवर उडी मारली तों मेनर्ड एका बाजूला होऊन गडबडत दरी खालीं गेला. इकडे वुइलकिन्सन थोडा सांवरला व वाघ मेनर्डवर दुसरी उडी मारित आहे इतक्यांत हातांत कुऱ्हाड घेऊन त्याचे अंगावर धावला व जोरानें त्याचे कंबरेवर कुऱ्हाड मारावयास गेला तों ती वाघाच्या शेपटाला लागून हात तून निसटून लांब खडकांच्या सांदीत जाऊन अडकून पडली या मुळें वाघाचे सोर शेंपूट अगदीं गळून पडे असें झालें. हातांतील कुऱ्हाड नाहींशी झाल्यानें वुईलकिन्सन घाबरला. त्यास अंधारी आली व तो झोकानें पुढें जाऊन पडला. इतक्यांत मेनर्ड यानें पुनः वाघास बंदुकीचा रट्टा मारण्याचा प्रयत्न केला. तों मार चुकून बंदूक निसटली व लांब खड्यांत जाऊन पडली. इतक्यांत वाघानें चवताळून वुईलकिन्सनवर उडी मारिली त्यास फर फर ओढलें व त्यावर बसला आतां वाघ कांहीं करणार तोंच वुइलकिन्सन याची सुटका करावी या इराद्यानें मेनर्ड वाघाचे पाठीमागें गेला व त्यांचे तुटावयास आलेलें शेपूट हळूच मागून चाकूनें तोडून त्या शेपटानें त्यास मारणें सुरू केलें. तरी तो वुईलकिन्सन याजवरून उठत नाहीं असें पाहून त्याचे तोंडावर व डोळ्यावर त्या शेपटानें मारूं लागला. तेव्हां वाघानें वुईलकिन्सन यास सोडलें व मेनर्ड याचे आंगावर धावला. वुईलकिन्सन पळभर निचेष्टित पडल्या सारखा झाला. परंतु मेनर्ड यास पुनः सोडण्याचे इराद्यानें तसाच धीर धरून उठला व मेलों तरी बेहत्तर पण या गुलामाची तर खोड मोडावयाचीच असें मनांत आणून मोठ्या त्वेषानें तसाच धडपडत वाघाचे अंगावर चालून गेला. तों वाघानें आपल्या पंजानें वुईलकिन्सन याचे हात, पाय, मांड्या वगैरे यांस फाडून टाकलें. तथापि तितक्या वेदनांमध्यें त्या बहाद्दरानें वाघाचे दोन्हीं डोळे सपाट्यासरशीं हातच्या बोटांनीं जोरानें ओढिले त्यामुळें वाघ आंधळा झाला व त्यानें मेनर्ड यास सोडून जमिनीवर लोळागोळा होऊन निचेष्टित पडलेल्या वुईलकिन्सन यास धरलें. इकडे मेनर्ड यासही पुष्कळ ओरखडे होतेच तथापि त्यानें तसाच धीर धरून वुईलकिन्सन यास सोडविण्याच्या हेतूनें एक लांब बारीक काठी घेतली व ती जोरानें त्या आंधळ्या वाघाचे डोळ्यांत टोंचली त्या सरशीं वाघानें वुईलकिन्सन यास सोडलें व इकडे तिकडे कावरा बावरा होऊन पळूं लागला. त्यास डोळे गेल्यानें कांहींच दिसेना तेव्हां तो मोठमोठ्यानें ओरडूं लागला. कोठें कोठें खडकावर आपटून पडूं लागला व इकडून तिकडे पळतां पळतां वुईलकिन्सन याचे खिशातून कांहीं कांहीं ठिकाणीं दारू भरलेले बार गळून पडले होते त्यांतील एका बारावर दगड लागून जोरानें आपटला त्या सरशीं मोठा बार झाला व तो त्याचे पोटांत शिरला त्यामुळें वाघ लागलीच गतप्राण होऊन खालीं पडला. इकडे वुईलकिन्सन व मेनर्ड हे अगदीं बेशुद्ध होऊन पडले होते ते कांहीं तासानीं शुद्धीवर आले व आतां आपण आपले बंगल्यावर कसें जाऊं याचा त्यांस विचार पडला तेव्हां ते उभयतां तसेच मोठ्या कष्टानें फरपटत फरपटत क्षणोक्षणीं विसावा घेत टेंकडी खालीं आले. हा रस्ता साधारणपण १५ मिनिटांचा असतां ह्यास तो चालुन जाण्यास ६ तास लागले. असो टेंकडी खालीं पोंहचल्यावर त्यांच्यात अर्धा जीव राहिला तथापि तसेच आणखी फरपटत फरपटत रस्त्याच्या दोन मध्यभागीं कोणाही येणाऱ्या जाणाऱ्याची दृष्टी जाईल अशा ठिकाणीं येऊन पडले. तों पुढें कांहीं वेळानें त्याचाच ठेकेकर नांवाचा मित्र त्याच रस्त्यानें श्रीनगरकडे जात होता. त्याच्या नजरेस हे दोघे पडले तों ते उभयतां असे रक्तानें न्हालेले, अवयव छिन्नभिन्न झालेले व नाका तोंडात पुष्कळ माती जाऊन अस्ताव्यस्त पडलेले पाहून तो घाबरला व तसाच परत गांवांत जाऊन त्यास नेण्या करितां गाडी घेऊन आला. गाडींत त्या उभयतांस घालून मिशन लोकांचे दवाखान्यांत गेला. तेथें डाक्तरानें त्या सर्व जखमा नीट बारकाईनें तपासल्या आणि सांगितलें कीं ह्या सर्व जखमांत जेणें करून जिवास धोका होईल अशी एकही जखम नाहीं. कारण सर्व जखमा वरवरच लागल्या आहेत व यांस औषध पाणी केलें असतां हे दोन्ही गृहस्थ लौकरच बरे होतील.

वऱ्हाडसमाचार

मिती चैत्र वद्य २ शके १८१६

हिंदु ग्राजुएट लोक लवकर मरतात व हें मरणाचें प्रमाण भारी आहे असें वाटल्या वरून डाक्टर रामकृष्ण गोपाळ भांडारकर यांनीं बारिक शोध केला आणि असा सिद्धान्त ठरविला कीं, हिंदु ग्रॅजुएट लोकांमध्यें पारशी लोकांच्या मानानें मृत्युचें प्रमाण जास्त असण्याचें कारण युनिव्हर्सिटीच्या कडक परीक्षा हें नसून पुष्टिकारक अन्न खाण्याच्या बाबतींत अनास्था व बालविवाह सारख्या घातुक चालीरिती ह्या आहेत हा सिद्धान्त सर्वमान्य नाहीं हें वर्तमान पत्रांतून जी चर्चा झाली त्या वरून उघड आहे. डा. भांडारकरा सारख्या विद्वान अनुभविक व शोधक गृहस्थांनीं परिश्रमानें जनसमूहापुढें मांडलेले विचार अयथार्थ म्हणण्याचे धाडस पुष्कळांच्या अंगीं असेल–परंतु ते विचार अनाधार व अदूरदृष्टीचे आहेत असें सप्रमाण सिद्ध करून दाखविण्याची योग्यता व कळकळ थोडे लोकांचे ठिकाणीं दिसून येते. राव बहादूर रानडे यांनीं डा. भांडारकरांनीं गेल्या पदवीदानाचे वेळीं आपल्या भाषणांत नमूद केलेल्या विचारांचे व सूचनांचें महत्व व परिणाम पुरेतपणीं जाणून त्यां मध्यें तथ्यातथ्य कितपत आहे ह्या संबंधानें उल्लेख ग्रॅजुएट असोशिअनच्या वार्षिक सभे पुढें केला.

राव बहादूर न्यायमूर्ती रानडे यांचें व्याख्यान अत्युत्तम झालें हें सर्टिफिकीट देण्याचा आमचा अधिकार नाहीं. त्यांचें भाषण आम्ही समग्र मननपूर्वक वाचलें तेव्हां वाचतां वाचतांना मनानें साक्ष द्यावी कीं ही गोष्ट अगदीं बरोबर आहे. मनाचा संशय फिटून पूर्ण खात्री होत गेली. मन त्या विविषयांत तल्लीन व एकाग्र झालें. विचारगांभीर्य, भाषासौंदर्य, स्वमतप्रकाशन, खंडनमंडनाच्या कोट्या इत्यादि गुणांनीं आमच्या विचारशक्ती त्यांनीं आपल्याशा करून घेतल्या.

राव बहादूर रानड्यांच्या भाषणांचा तर्जुमा विस्तारपूर्वक इतर देशी पत्रांतून झाला आहे तेव्हां आम्ही तीच गोष्ट पुन्हा न करितां त्यांतील कांहीं मुद्दे खालीं देतों.

एम. ए. पदवीवाले फार लवकर मरतात आणि त्यांत हिंदु अधीक आहेत. पार्शी लोकांची गती वैद्य शास्त्रांत विशेष दिसते. गुजाराथी एम. ए. अद्याप कोणी मेला नाहीं हिंदू ग्राज्युएट अधीक मरतात हें खोटें आहे. १०००० हिंदू व १०००० पार्शी घेतले तर त्यां मध्यें वीस वर्षां पासून चाळीस वर्षांच्या उमेदीचे अनुक्रमें २४४० व २१३५ लोक जीवंत आढळतात हिंदू पदवीवाले इतर जातीच्या पदवीवाल्यांच्या मरणाच्या प्रमाणानेंच मरतात. हिंदू पदवीधर मरतात यांचीं कारणें डाक्टर भांडारकर दाखवितात तीं म्हणजे पौष्टीक अन्नाचा अभाव, व्यायामाभाव व अल्पवयीं लग्नें हीं खरीं कारणें नाहींत.

खरें कारण विद्यार्थ्यांची गरीबी हें पहिलें होय. अभ्यासक्रमाचें जबरजस्त ओझें व परीक्षणाची पद्धत फार कडकपणाची हें दुसरें. पदवीवाले पुढील आयुष्यक्रमांत विद्याव्यासंग सोडतात याचें कारण विद्यार्थी व शिक्षक यांच्यावर अभ्यासांचा बोजा एवढा जबर पडलेला असतो कीं एकदां परीक्षेच्या मुशींतून बाहेर पडल्यावर सर्व गात्रें ढिलीं पडतात आणि मन त्या शक्तिसंहारक व्यासंगाकडे ओढ घेत नाहीं. असें आहे तथापि ग्रंथलेखना मध्यें युरोपियन पदवीवाल्या पेक्षां नेटीव पदवीवाले अधिक विद्याव्यसनी निघाले आहेत असें आढळतें.

शेवटीं राव बहादुर रानड्यांनीं कांहीं उपाय सूचविले आहेत त्यांत पहिला हा कीं विद्यार्जन ब्रह्मचर्यव्रतानेंच झालें पाहिजे. शारीरिक शिक्षणाचा समावेश परीक्षेच्या इतर विषयांत करावा. परीक्षा सोप्या होत जाव्या व दोन परीक्षा मध्यें एका वर्षा पेक्षां अधिक कालान्तर असावें. युनिव्हर्सिटी मार्फत उत्तम लायब्ररीचा लाभ विद्यार्थि समूहास मिळावा आणि देशी भाषेतील ग्रंथलेखनास बक्षीसें देऊन उत्तेजन द्यावें.

---

म्हैसूर संस्थान इतकें सुधारलेलें आहे कीं तेथील बहुतेक राज्यव्यवस्था इंग्रजी धर्तीप्रमाणेंच आहे. नेटीव संस्थानांतून मोंगलाई, बेबंदशाही व गैरव्यवस्था फार चालतात असा बोभाटा फार जुन्या वेळे पासून आहे. पण हल्लीं इंग्रजीचा संसर्ग अत्यंत निकट व जोरदारीचा होत चालला आहे त्या मुळें कांहीं नेटिव संस्थानें राज्यकारभारांत अगदीं सुयंत्र व आदबशीर होत आहेत. जसा म्हैसूर संस्थानचा लौकिक चांगला आहे तसा बडोदे संस्थानचा आहे. पण बडोदेकर श्रीमान सयाजीराव महाराज परदेशीं वास करितात आणि त्यांची मुत्सद्दी मंडळी राज्य हांकतात ही गोष्ट कमीपणाची आहे. वऱ्हाड प्रांताला नजिक इंदूर संस्थान आहे पण तेथील व्यवस्था नीटशी नाहीं. कदाचित होळकर सरकारचे दोष सांनिध्या मुळें लवकर कळत असतील. खुद्द हा प्रांत निजाम सरकारचा आहे आणि मागें पुढें हा त्यांना परत मिळण्या सारखा आहे परंतु हैदराबाद दरबारची नादानी व अव्यवस्थितपणा हींच आम्हास नेहमीं दृष्टीस पडतात. सध्यां काल असा आला आहे कीं इंग्रजी अंमल नेटीव संस्थानांतून पुरा होत चालला आहे. लोक ही गोष्ट सुखानें पतकरोत किंवा नको म्हणून ओरडोत तरी त्यांच्यावर इंग्रजी पगडा बसत आहे. तेव्हां शहाण्या कार्यधुरंधर, व स्वकीयपणाचा अभिमान बाळगणाऱ्या नेटीव संस्थानांनीं सर्व राज्यव्यवस्था इतकी नामी केली पाहिजे कीं इंग्रजांस तेथें बोट ठेवण्यास अवसर मिळूं नये आणि ही व्यवस्था व टापटीप संस्थानवाल्यांनीं आपल्या आपणच ठेविली नाहीं तर त्यांस इंग्रजांच्या हस्तंगत होऊन बाहुली प्रमाणें नाचावें लागेल.

म्हैसूर सरकारनें इंग्रजांतल्या प्रमाणें सिव्हील सरव्हीस परीक्षा काढली आहे आणि त्या परीक्षेस हिंदुस्थानवासी कोणाही गृहस्थास बसतां येईल. ही परीक्षेची योजना मोठी उत्तम आहे आणि तिच्या मुळें सर्व देशांतील चांगलीं चांगलीं विद्वद्रत्नें त्या संस्थानाच्या पदरीं सहजीं राहतील. ही गोष्ट इतर संस्थानिकांनीं अगोदर स्वीकारावी. सिव्हील सरव्हीस परिक्षेचा उपयोग निजाम सरकारनें केला आणि परिक्षेच्या कसास उतरलेले योग्य लोक त्या दरबारांत अधिकारसंपन्न झाले तर त्या संस्थानचा दिवस पालटला असें आह्मी समजूं. हा भाग्यकाळ सत्वर आणण्याचा योग निजाम सरकारच्या हातीं आहे आणि त्यांनीं तो दवडूं नये.

मि. नार्टन हे एक राष्ट्रीय सभेचे पुढारी आहेत. यांच्या वर जार कर्मा बद्दल फौजदारी होत होती परंतु तिचा आपसांत निकाल झाला. मि. नार्टन यांस खरोखरच कटिशाळाची व्यथा आहे. दुसऱ्या गृहस्थाची स्त्री व्यभिचारानें बाटविली आणि आपल्या बायकोला ते फारकत देणार आहेत. व ती वेगळी झाली म्हणजे ते स्वयंरत व्यभिचारिणीला गृहिणी करणार आहेत! यांनीलबी व्यभिचारानें काय गती झाली!

The Berar Samachar

MONDAY APRIL,
23 1894

The Municipal Corporation of Bombay is an exemplary institution wherein we can best learn the first rudimentary lessons of the Local Self-Government. The Municipality is a regular state and its branches of working are as many as those of a provincial Government. The body of members that regulate the working of a high emporium consists of course of men of wide experience, high learning and great influence. When we read the learned, useful and instructive deliberations in the Municipal Councils a spirit of imitation and a high type of Municipal life develop in our mind. We can simply advise our Municipalities to hold forth the Corporation as an ideal and to tread in its ways of doings if possible.

The other day, we read a highly flown, floral and eloquent letter of the Hon'ble Mr. Mehtha. As a member of the corporation he was elected to work on the Committee appointed to settle the important question of an increase in the police force of the city. The Committee worked very badly. The procedure was wrong and the matter was carried in a high handed manner It was Mr. P. M. Mehtha who alone stood in opposition. He remained bold, intrepid and conscientious. He did not forsake his conscience and wisdom. The Committee is trying to pass off its work and our Parsee gentleman would move heaven and eatrh before he could let the matter drop. He is a strong hand and will get the defaulters, whoever they be, to account before the bar of public opinion if the Government of Bombay proves inadequate to decide upon the matter. Let people admire in him the high towering sense of duty, the unflinching honesty of purpose and the inimitable tone of of a first-class citizen.

We should not also pass over another instance, though a sad occasion. Mr. Edulji Watcha is another member who is also a capital man. Mr. Ackworth the Municipal Commissioner was said to be in the habit of giving advertisements to those English papers who sided with him in Municipal discussions to the exclusion of native papers who criticized his actions. While he was *plausibly* explaining away this mal-assertion against him Mr. Watcha exclaimed that was all false. The latter gentleman was convinced of the truth and he would not detract his remark. The President urged him to do so but he left the hall indignanty. On second thoughts and calm consideration Mr. Wataha saw the wrong he did to the President in disobeying his ruling. He apologised for his past error in the next meeting and the matter was hushed up. But it is to be observed that Mr. Watcha retracted his words as being *unparliamentary* because he had that high regard for the constitutional laws but nevertheless he worshipped the sole and solid truth in his convictions and was not a bit sorry for the remark he made to which he still sticks and will do so unless he is convinced otherwise. We are almost prone to say that an erring man is hundred times better and should be preferred to a man of worldy-wise hypocrisy.

## वऱ्हाड.

हिंस्र पशूंस मारण्या बदल सरकारांतून बक्षीस मिळतें पण तें निरनिराळ्या प्राण्यांच्या हिंसकपणाच्या मानानें लहान मोठें असतें. तरस या जनावराची शिकार करणाऱ्यांस आज पर्यंत ५ रुपये बक्षीस होतें तें बंद करून वाघाच्या शिकारीला १५ रुपये बक्षीस होतें त्या ऐवजीं १० रुपये केलें.

मि. जे. ओ. ओम्रिडी एक्स्ट्रा आसि. कमिशनर यांस पुढील महिन्याच्या १ ले तारखे पासून एक महिन्याची हक्काची रजा मिळाली.

मि. सी. एच. प्राईस एक्स्ट्रा असि. कमिशनर यांस मे १ लीं पासून तीन महिन्यांची हक्काची रजा मिळाली.

लेफ्ट० मारिस असि. कमिशनर यांस मुल्की कडील पूर्ण अधिकार देण्यांत आले.

मि. जीरार्ड स्टीम बायलरचे इनस्पेक्टर आहेत त्यांच्या कडेस फ्याक्टरी तपासण्याचें काम सोंपविलें.

क्याप्टन हार्सिंग्रव आसि. कमिशनर यांस मे ७ वी पासून एक महिन्याची हक्काची रजा मिळाली.

आलिशान रेसिडेंट साहेबांनीं खालील गृहस्थांच्या बदल्या केल्या आहेत त्या गांववार येणें प्रमाणें:—

| नांव | गांव |
|---|---|
| रुस्तुमजी फर्दूनजी अ. क. | उमरावती |
| कुमारश्रीहरचानजी अ. क. | यवतमाळ |
| त्रिम्बक गणेश ए. अ. क. | मोर्शी |
| हैदरअली खान अव्वल्.ची | उमरावती |
| गणेश बापूजी ए अ. क. | यवतमाळ |

मि. मल्लासमुद्रम रामय्या एल. सी. इ. यांस हैद्राबादेंस अप्रेन्टीस इंजिनिअर नेमिलें.

रा. रा. गणेश बापूजी ए. अ. कमिशनर हे गेल्या आठवड्यांत येथून यवतमाळास रवाना झाले. त्यांच्या बदली मुळें मित्रमंडळीस बरेंच वाईट वाटलें.

रा. रा. विश्वनाथ नारायण दांडेकर सिव्हील जज्ज आकोला हे पुढील महिन्याच्या १ ले तारखे पासून एक महिन्याच्या रजेवर जाणार आहेत.

राव साहेब सिताराम विश्वनाथ पटवर्धन डायरेक्टर यांची स्वारी चिखलदऱ्याहून काल रोजीं येथें आली.

उमरावती हायस्कूलचे विद्यार्थी काल रोजीं संस्कृत विक्रमोर्वशीय नाटकाचे तीन अंक करून दाखविणार होते.

मि. निकोलेट यांस तीन महिन्यांची रजा मिळाली आणि मि. गाडविन आस्टीन हे त्या रजेंत डेपुटी कमिशनर होतील.

मुनशी अजिजुद्दीन ए. अ. क. रजेवरून परत येऊन उमरावतीस दाखल झाले.

प्रोफेसर रंगराव हरराव डुबेरकर यांचें सरकस हल्लीं येथें आलें आहे. गेल्या पांच रात्रीं त्यांचे खेळ झाले. वाघांचे खेळ नांवाजलेल्या सरकसवाल्यांच्या तोडीचे आहेत. मनुष्यांची कसरत अगदीं अप्रतिम आहे. इतर सरकस मधील जुने व उष्टे खेळ या सरकस मध्यें नाहींत. नवीन नवीन टूमी पुष्कळ आहेत. या सरकसचा थाट नुकताच जमत चालला आहे तेव्हां हत्ती, वाघ, सिंह वगैरे प्राण्यांचे खेळ अद्याप हे दाखवीत नाहींत. या खेळाचे मालक भाऊसाहेब डुबेरकर हे गर्भश्रीमान असून पेशवाईपासून यांच्या घराण्याचा शिपाईबाणा आहे. केवळ हौसेसाठीं हे सरकस काढलें असून त्यांनीं आपले चिरंजीव रंगराव यांस त्यांत चांगलें तरबेज केलें आहे. हल्लींच्या स्वरूपावरून आम्हास बळकट आशा आहे कीं प्रोफेसर डुबेरकर यांचें सरकस नामांकित होऊन युरोपियन सरकसवाल्यास मागें सारील.

### नोटीस

तुळशीबाई भ्रतार गणेश थोंडदेव देशपांडे प्रगणे जामनेर वस्ती मलकापूर हीस खालीं सह्या करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुमची नोटीस उमरावती प्रमोदसिंधूंतील आमचे नावानें आलेली पाहिली ती नोटीस बरोबर नाहीं. तुह्मी दुसरे लोकांचें सांगण्यावरून विनाकारण दिली आहे. असें दिसतें. तुह्मास तुमचे सासऱ्याकडून अन्नवस्त्रा बद्दल दरसाल ६० रुपये मिळत आहेत. असें असतांही निळकंठराव आप्पा यांस तुमचा कळवळा येऊन त्यांनीं तुमचे समक्ष आह्मास मरते वेळीं सांगितलें कीं ही मुलगी आमची आहे माझे मागें माझे स्थावर व जंगम जिंदगी व लवाजमा आंबराई शेत वगैरेवर तुमचे शिवाय हक्क पोहचत नाहीं यास्तव तुह्मी इजला १०० रुपये वर्षाचे अन्नवस्त्राकरितां दरसाल देत जावे ते आह्मी कबूल करून त्यांचे समक्ष हयात असतांना लागलीच त्यांचे देखत तुह्माला करारनामा लिहून दिला आहे तो तुह्मी कबूल करून तुमचे जवळ ठेवून घेतला आहे व दुसरें स्थावर जंगम वगैरे जिंदगी आमच्या अनुमतें तुमच्याजवळ ठेविली आहे ती जेव्हां आह्मी मागूं तेव्हां आमचे स्वाधीन करून द्यावी असें तुह्मी कबूल केलें आहे. या प्रमाणें असतांना आतां त्या कबुलायतीला अनुसरून चालण्यास तुमची इच्छा नसेलतर मर्जी तुमची. तुमचा कोणतेही प्रकारें आपालीचे स्थावर व जंगम वगैरे वर हिंदुधर्मशास्त्रा प्रमाणें हक्क संबंध नाहीं सबब तुह्मी आमची स्थावर जंगम जिंदगी तुमचे जवळ ठेविली जाहे ती खरेदी किंवा गहाण वगैरे कोणतेही प्रकारें कोणास देऊं नये त्याबद्दल जबाबदारी तुमचेवर आहे त्याजबदल एक पैशाचे देणेदार आह्मी होणार नाहीं कळावें. ता. २०।४।९४ इ.

सह्या

१ नारायण अमृत देशपांडे अकोलें द. खुद्द.

१ माधव अमृत देशपांडे अकोलें द.

१ कृष्ण जेकृष्ण देशपांडे प्रगणे अकोलें व मलकापूर द. खुद्द.

### नोटीस.

फकीऱ्या वा दावजी झाली रहाणार मानिकवाड प्रां नेर ता० दारव्हा जि० वणी यास

मी तानी मर्द फकीऱ्या इजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुझा माझा गंधर्व विवाह होऊन सुमारें दहा वर्षे झालीं त्यावेळेस मी आज्ञान होती तेव्हांच कार्ये एक वर्ष तूं मला आपले घरीं नेलें नंतर तुझ्यानें माझ्या खाण्याची व्यवस्था होईना सबब मला ह्मणून दिलें त्या दिवसा पासून आज नऊ वर्षे झालीं तेव्हां पासून मी आपले बापाचें आश्रयानें राहिली. माझा बाप गरीब असल्यामुळें सावकारी पैसा काढून निर्वाह केला आता मी वयांत येऊन ऋतु प्राप्त होण्यास बरेंच दिवस झाले. मध्यंतरी तुझे घरीं येण्यास बराच उपाय केला परंतु त्वा मला घरी येऊं दिलें नाहीं आणि तुझ्या शरीरास मेहम फूटन रक्तपित्ती होण्याचा संभव वाटतो करितां कळविण्यांत येत आहे कीं नोटीस पावल्या पासून आठ दिवसाचे आंत मी खाण्या करितां दरमहा पांच रुपये प्रों नऊ वर्षाचे रकम रुपये ५४० पांचशे चाळीस सावकाराचे देणें आहेत ते द्यावें वरील रुपये वरील कराराचे आंत न दिल्यास मी दुसरा नवरा करीन पुढें तुशी कोणतीही तकरार ऐकली जाणार नाहीं. कळावें ता० १९।४।९४ इ०

(सही)

तानी मर्द फकीऱ्या

निशाणी बांगडी.

### नमुना नंबर १४३.

कोणी स्थानापन्न होतो तेव्हां त्यास कर्ज वसूल करितां येण्यासाठीं सरटिफिकीट मिळावें ह्मणून त्यानें जिल्हे कोर्टांत अर्ज केल्याविषयीं जाहिरात.

सन १८८९ चा आक्ट ७
कलम ६ प्रमाणें.

दि. कि. क्लास १५ मिसल नंबर ९/१८९४

विद्यमान सिव्हील जडज्य साहेब जिल्हा यांचे कोर्टांत.

नांव—मुकुंदराव व सिताराम
बापांचे नांव—जानजी देशमुख
राहणार रिधोरे ता० बाळापूर
जि० अकोला यांस मयत

जानजी बापाचें नांव बापूजी राहणार रिधोरे ता० बाळापूर जि० अकोला यांचें कर्ज वसूल करितां येण्या साठीं सरटीफिकीट मिळावें ह्मणून सदरहू अर्जदार यांनीं अर्ज केला आहे त्याज करितां सदरहू मयत मनुष्याचे माल मिळकतीवर किंवा तिचे कांहीं भागावर आपला हक्क आहे म्हणून ज्या मनुष्याचा दावा असेल त्यास जाहिरातीचे द्वारें कळविण्यांत येत आहे कीं त्याणीं तारीख २८ माहे एप्रिल सन १८९४ इ० रोजीं सदर्हू अर्जाची चांकशी होईल त्या वेळीं या कोर्टांत हजर होऊन आपआपले हक्का विषयीं लेखी हकीकत दाखल करावी. तारीख १३ माहे एप्रिल सन १८९४ इ०

V. N. Dandeker.
सिव्हिल जडज्य.

## वर्तमानसार.

अगदीं ताज्या बातमी वरून असें कळतें कीं, शनसो येथील फ्रेंचांचा देवळें चीनी लोकांनीं जाळून त्यांतील पाद्री कैद केले; व त्यांस निष्ठुरतेनें वागविलें ह्या अरुध्या वर्तना बद्दल फ्रेंचांनीं चीनच्या सरकाराकडून जबाब मागितला आहे.

मुंबई .. अपूर्व पलंग—दाद्रीशेट अग्यारी समोरील कावेल गल्लींत एक पलंग निझाम सरकाराकरितां मुद्दाम तयार केला आहे. या पलंगाच्या कोणत्याही बाजूवर बसलें असतां बाजा सुरू होऊन पलंगाच्या मोठ्याच्या बाजूस दोन स्त्रिया उभ्या आहेत त्या पंख्यानें वारा घालूं लागतात व पायाच्या बाजूस दोघीं उभ्या आहेत त्या तंबोरी वाजवूं लागतात, ह्या चारही माना फिरवीत असतात पलंगावरून उठल्या बरोबर ह्या सर्व क्रिया बंद होतात. हा पलंग पाहण्यासारखा आहे व त्याचे मालक तो सर्वांस दोन प्रहरीं ३ वाजल्यापासुन संध्याकाळीं ७ वाजेपर्यंत फुकट दाखवितात.

हैद्राबाद संस्थानांत गुलबुर्गा येथें एक बाईनें झाडास फांस लावून आत्महत्या केली. तेव्हां तें झाड मुद्देमाल समजून त्यावर मोहोर करून तें मुळासकट उपटून न्यायाचे कोर्टांत आणून ठेविलें आहे ! पुढें काय कसें होतो पहावें. पु मं०

लंडन येथें डेमोक्रेटिक क्लबमध्यें, मि. दादाभाई नवरोजी यांनीं नुकेंच एक मोठें भाषण झालें, त्यांत त्यांनीं असें ठरवून दिलें कीं "हिंदू किंवा मुसलमान या दोहोंचे राजकीय हक्क एकच असून, गेल्या गणतींत इंग्लंडची वस्ती शेंकडा ११.६० वाढली. तेव्हां हिंदुस्थानची ९.७ वाढली. आणि इंग्लंडांत जेव्हां दर चौरस मैली अदमासें ५०० माणसांची वस्ती आहे तेव्हां तितक्याच जागेंत हिंदुस्थानांत २२९ माणसें आहेत; ह्मणजे वस्ती देखील विशेष नसल्या मुळें, त्यांच्या उन्नतीस योग्य मार्ग आहे. तसेंच दुष्काळाची भीति, इंग्रजी राज्य पूर्वी ह्मणजे अदमासें १८०२ ते १८५४ ह्मणजे ५२ वर्षांत तेरा दुष्काळ पडले व पन्नास लक्ष माणसें मेलीं, आणि तेंच सन १८६० ते १८७९ या अवघ्या एकोणीस वर्षांत ह्मणजे इंग्रजी राज्यछत्राखालीं दुष्काळनिवारणार्थ कालवे, रेल्वे, सडका वगैरे कामें सुरू असतांही सोळा दुष्काळ पडले असून, सतरा कोटी माणसें मेलीं. या सर्व बाबतींवरून पाहिलें तर, जोंपर्यंत राज्यकारभारांत देशी लोकांना योग्य हिस्सा देण्यांत येत नाहीं, तोंपर्यंत देशांत खरी आबादी उत्पन्न होणार नाहीं असें स्पष्ट दिसतें."

आमच्या हिंदु देवळाच्या जुन्या हक्कास हरकत आणिली यामुळें आह्मास फार वाईट वाटतें. असा निझाम हैदराबादच्या बऱ्या हिंदुनीं सभा करून ठराव केला व तो निझाम, रेसिडेन्ट व हिंदुस्थान सरकार यांजकडे पाठविला.

काठेवाडांत पालिठाण्याच्या शेजारी सत्रंजा ह्मणून जे डोंगर आहेत त्यावर जैन लोकांचें एक मोठें देवस्थान आहे. त्या देवळांतल्या माल मिळकतीची लूट करण्याकरितां कांहीं दरोडेखोरांनीं हत्यारबंद होऊन त्या देवळावर हल्ला केला. या देवळाच्या रक्षणार्थ असलेल्या आरब पाहरेकऱ्यांनीं दरोडेखोरांशीं कांहीं वेळ सामना केला; पण दरोडेखोरांनीं मोठ्या निकारानें त्यांच्यावर हल्ला करून गोळी घालून एकास घायाळ्ही केलें तेव्हां आरबही त्यांच्या अंगावर गेले व दोघांचे कांहीं वेळ दोन हात झाले. व त्यांत दरोडखोरांच्या हातांत या तरवारीनीं दोन आरब जखमीही झाले नंतर त्या आरबांच्या मदतींत दुसरे लोक आले व त्यांनीं दरोडेखोरांस हाकून लाविलें त्यांचेकडील देवळांत सुमारे दोन लाखाची मिळकत असून सुमारें दहालाख रुपयांची मिळकत नुकतीच तेथून सुरक्षित ठेवण्या करितां दुसरीकडे नेली होती.

फ्रेंच व इंग्रज प्रजा यांच्यांत— एशिया आफ्रिका व अमेरिका खंडाच्या निरनिराळ्या भागांत द्वैत वाढत चाललेलें आहे.

ब्राझिल देशांत मोठी बंडाळी उत्पन्न झाली असून बंड उद्धरणारांनीं राजधानीचें शहर तब्यांत घेतलें असल्याची अफवा आहे.

तुरुंगांतू सुटलेल्या लोकांना एखाद्या प्रामाणिक धंद्यास लावून देण्या करितां लखनौ येथें एक मंडळी निघाली आहे फार चांगलें. सर्वांनीं कित्ता घेण्यासारखी गोष्ट आहे.

वायव्य सरहद्दीवरील रेल्वेवर, लढाईच्या वेळीं उपयोगीं पडतील असे लोक नेमण्याची हिंदुस्थानसरकारनें तजवीज चालविली आहे. श्री० स०

एकट्या लंडनशहरांत रोज सकाळीं जितकीं वर्तमानपत्रें निघतात त्यांच्या एका अंकाच्या प्रती कमींत कमी १६,४२,००० निघून त्या सर्व खपतात! व रोज संध्याकाळीं जीं वर्तमानपत्रें निघतात त्यांच्या रोजच्या प्रती ६,४५,००० निघतात. लंडन शहरच्या बाहेर, स्काटलंडात आणि आयर्लंडात मिळून रोज १९२२००० प्रतींचा खप होतो इतक्यांना लागणाऱ्या कागदांचें वजन ध्यानात ठेवण्याजोगें आहे

| | |
|---|---|
| | वजन खंडी. |
| लंडनमधील प्रातःकाळचीं वर्तमानपत्रें. | ४९० |
| सायंकाळचीं पत्रें .... .... .... | ९८ |
| इंग्लंड, स्काटलंड व आयर्लंड यांतील इतर. वर्तमानपत्रें .... .... .... .... | २९८ |
| एकंदर .... | ८८६ |

क०

## नोटीस.

श्रीमंत महाराज राजमान्य राजश्री भाई श्रीराम शालिग्रामजी साहू दुकान खामगाव यांस.

खालीं सही करणार यांजकडून नोटिशीनें कळविलें जातें कीं साल मजकूरीं आह्मी तुमचे दुकानात डेपुटेशन रक्कम रुपये ७५० सातशें पन्नास अनामत शेंकडा पांच आणे व्याजा प्रमाणें ठेऊन कपाशीचा व्यापार व रूईचा व्यापार केला. त्यांतील शर्ती खालीं येणें प्रमाणें:–

तोंडी शर्ती ठरल्या त्या.

( १ ) आह्मी जें डेपुटेशन ठेविलें त्याचें व्याज तुह्मीं आम्हांस पांच आणे प्रमाणें भरून द्यावें.

( २ ) व्यापारांत जी रक्कम तुमची माझे नांवें पडली त्याचें व्याज मी तुह्मास कटमितीनें ॥= आणे प्रमाणें भरून द्यावें.

( ३ ) तुम्ही रायबोचे एजंटाशीं जीन मधून ६००० ओझें जीन मधून दर खंडी रुपये ४॥= प्रमाणें ठराव करून कंत्राट घेतलें त्या वेळीं आम्हास तुम्ही असें सांगितलें कीं या दरा प्रमाणें मी तुमचे जो जचा भाव येणार नाहीं. ४॥. प्रमाणें घेईन.

( ४ ) जीनचा भाव साडेचारचा ठरला ह्मणून अडत तीन आणे जीना प्रमाणें ठराव झाला असून चार आणेचा जीनचे भावांत कमी केल्या वरून अडतचा भाव वाढविला.

येणें प्रमाणें शर्ती झाल्या होत्या.

सदर्हू शर्ती बाहेर तुम्ही वागला तें:—

१ कलम तीन ३ यात जीनचा भाव ४॥ साडेचार प्रमाणें कबूल केला तो न देतां निम्मे जीनचा भाव ४॥ घेतला व निम्मेचा ४॥= घेतला. तो रक्कम मला दोन आणे प्रमाणें तुमचे जवळून न कापुन मजरा येणें आहे.

२. अडत मध्यें माझी तक्रार नाहीं.

३. व्याजात तुह्मास भरून देण्यास व मजला तुमचे पासून घेण्यास वरील कलम [ २ ] यांत लिहिल्या प्रमाणें माझी तक्रार नाहीं.

४. तुह्मी २३ तेवीस ओझें आमचे गंजींतू नंबर १ चे शिवदास भटा यांच उसनें तुह्मी आपल्या स्वतांचे नांवें देवविलें. त्याचा भाव तुह्मी ५६॥।= चा घेतला व सदरहु २३ ओझ्यांचा भाव मजला माझे विक्रीचा भाव ५९ प्रमाणें भरून द्यावा तो. तो न देतां तुह्मी ५८ अठ्ठावनचा भाव धरून दिला, करितां त्यांतील नुकसान दर १ रुपया प्रमाणें २३ रुपये.

५ मी बाहेर गांवीं दवऱ्यांत असतां माझे परवागी वांचून दुकानचा कारकून व माझा भाऊ तुम्हास प्रतिबंध करीत असतां त्याचा हुकूम तोडून उत्तम मालाचें नंबर १ चें १०० ओझें माझी आमना नफ्याची मोडून विकलेंशी नुकसान सदर्हू सर्व माझे मालाचा विमा तुम्ही मुंबईचे व्यापाऱ्यास विकला असून त्याची जोखीम आपले उभयतांचे शिराबर नसून जबरीनें माल परवानगी वांचून विकला. तो माल माझा चैत्र शुद्ध १५ पौर्णिमेचे आंत बाजार भावानें विकण्याचा होता, त्या प्रमाणें आंत तारखेला जो बाजारभाव उत्तम तारदार मालाचा असेल त्या भावानें नुकसानी तुमचे जवळून येणें आहे.

६. आमची हातवही हिशेबीं तुमचे हातचीं तुमचे जवळ आहे ती वापस मजला दिली नाहीं.

७. आज तारखेचे आंत जे आंकडे तुमचे जवळ माझे इंग्रजी मराठी एकत्र सहीचे आहेत ते मी तुम्हास दाखवा असें म्हणत असतां तुम्ही मजला सांगितलें कीं तुम्ही ज्या गंजीचे मागाल त्या गंजीचे मी दाखवितों. असें सांगितल्या वरून मी तिसऱ्या गंजीचे आंकडे दाखवा म्हणून म्हटल्यावर दाखविले असतां सदर्हू आंकड्यांत रकम रुपये ३४०॥। तीनशें चाळीस पाऊण आण्याचा बिनसहीचा आंकडा माझी सही एकत्र नसतां स्वीकारला. ती रक्कम मजकडे आली नाहीं. हा आंकडा माझ्या नांवें कां पडला याचा योग्य खुलासा झाला नाहीं तर माझ्या दुकानदारीच्या इजती साठीं मला आपल्यावर प्रसंग विशेषीं फौजदारीही करावी लागेल.

८ सदर्हू आंकड्यावरून मजला तुमचे दुकानावर जो माझे खात्यांत हिशेब तुमचे हातानें मांडला आहे त्याजवर मजला बिलकूल भरंवसा ठेवितां येत नाहीं.

९ माझ्या तर्फें आपल्या दुकानांतील हिशेब तपासण्यास मी रा. रा. गोविंद अंताजी चितळे (आकोलेकर) कुलमुखत्यार निसबत श्रीमंत राजश्री नारायणराव बाबूराव देशमुख व रा. रा. जालनचंद बाळापूरकर यांस तपासणीदार कायम करितों; त्यांची तपासणी मला मंजूर आहे. फक्त हिशेब दाखविण्याची इच्छा असल्यास मला पूर्वी ३६ तासांची नोटीस द्यावी.

येणें प्रमाणें हकीकत आहे. भाईजी, आपण कीर्तीमान असून प्रसिद्ध साहूकार आहां. या वरच्या हकीकती वरून निघालेला माझा संशय दूर होण्या साठीं योग्य खबरदारी घ्यावी व मलाही यश द्यावें अशी विनंती करितों. तुमचेवर सरकार सुद्धां तुमचे लौकिकाचे मानानें भरंवसा ठेवतील असें असून ही गैरव्यवस्था ह्मणजे आश्चर्यच समजलें पाहिजे. सदरहु नोटिशीचा जबाब मजला दोन दिवसांत देऊन तुमचा आमचा निकाल करावा. नाहीं तर कायद्या प्रमाणें तजवीज करणें आह्मास भाग पडेल. हा नोटीस दिली सही. तारीख १६–४–१८९४ इसवी.

सही— गणपत नारायण मिसर नाशिककर.

NEARLY READY

**CRIMINAL COURT MANUAL**

*for the*

Hyderabad Assigned Districts

by

Mr. R. Obbard

assisted by

Syed Meer Alum,

Containing the uncancelled Notifications of the Government of India extending Laws and promulgating Local Laws (with reprints of Forest Law, Abkari Rules, Municipal Act, Courts Law, Rules,regulating Legal Practitioners and other Local and Special Laws ), the Notifications and rules published under the authority of the extended Laws, the uncancelled Circulars and Orders of the Government of India, Resident, Commissioner, and Judicial Commissioner relating to Crimial matters, and full information in regard to the prescribed registers, returns and forms, to be used in and by Criminial Ccurts, with notes by Mr. R. Obbard, and a copious Index.

PRICE RUPEES 5

Subscriptions registered by Syed Meer Alum at the office of the Civil and Sessions Judge, Amraoti Camp Berar.

☞ हें पत्र आकोलें येथें के० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

किरकोळ अंकास ..................८४

Single copy..................

नोटिशीबद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
पुढें दर ओळीस ०।०६
दुसरें खेपेस ..........०।

# वऱ्हाडसमाचार.

Advertisement
Below 10 lines...2 Rs
per line over10... 4 as
Repetition per line 3 as

THE BERAR SAMACHAR.

VOL XXVIII AKOLA MONDAY 30 APRIL 1894 NO 17

वर्ष २८ आकोला सोमवार तारिख ३० माहे एप्रील सन १८९४ इ० अंक १७


## ह्या राजश्रीनें केव्हां तरी पळ काढला असावा.

एका गृहस्थास त्याच्या स्वर्य वेडामुळें एका जुलमी सरकारानें कारागृह दाखविला. तो ज्यांत कोंडला होता त्याच्या मजबूत दगडी भिंती पाहून त्याच्या मनाची खात्री झाली कीं, आतां आपलें राहिलेलें आयुष्य ह्या एकांत व भयाण कारागृहांत घालविलें पाहिजे. जरी त्याला आतां पुढची गत चांगली नाहीं असें भासत होतें तरी त्याला दुःखांत सुख इतकेंच वाटत होतें कीं, मला जुलमामुळें बळी व्हावें लागलें परंतु सद्वर्तनाचें उल्लंघन केल्यामुळें कांहीं नाहीं. जर त्याच्या स्वाधीनची गोष्ट असती तर ह्या संकटांतून तो सहज पार पडला असता.

असें असून त्या बिचाऱ्यास सतत सोळा वर्षें हाल काढीत राहावें लागलें. हीं वर्षें संपतात तों त्याच्या मनांत आलें कीं, ह्या भिंतीवर पुढें आलेल्या दगडाच्या आधारानें वर चढावें व त्यानें खिडकीच्या वरून काय दिसतें ह्मणून वर डोकें केलें. आणि असें हें केल्या मुळें त्याला वाटलें कीं पुढें लोखंडाचे गज आहेत ते काढून टाकतां येतील व त्या धोकटींची आगळही लावली नव्हती. त्याच्या मनांत घोळूं लागलें कीं, काय मी पळ कां न काढावा ! त्यानें खिडकी तर उघडली आणि सहा फूट उडी जमीनीवर मारली आणि त्या प्रदेशांस शेवटचा राम राम ठोकला. जर त्यानें त्याच्या ठाम झालेल्या विचारोस एकिकडे ठेऊन विचाराची दोरी जर सैल सोडली असती तर ह्या स्थळीं इतके दिवस कुंथत राहावें लागलें नसतें.

ह्या स्वधर्मार्थ प्राण अर्पण करणाऱ्या या विचाराची दैवघटित गोष्ट साधक व बाधक आहे. त्याच्या मनाची धांव बंद केल्यामुळें साधक. त्याला ज्या कारागास्तव बंदींत टाकावयाचा होता तें नसल्यामुळें बाधक.

ही गोष्ट पत्र रूपानें जी सर्वांस आवडते त्या प्रमाणें खालीं थोडक्यांत व साध्या शब्दांत सांगतों. एक लेखक बाई ह्मणते कीं आज सोळा वर्षें झालीं, पित्त क्षोभानें व अशक्तपणामुळें फारच गांजून गेले आहे. नेहमीं थकून जाऊन अगदीं हलक होऊन जाई. माझी अन्नावरची वासना उडाली, पुढें आणलेल्या ताटास हात लावीन तर शपथ. कित्येक दिवस माझ्यानें एक घास देखील खावत नसे. कधीं कधीं मळमळ सुटे पोटाचा नगारा होई आणि तोंडावाटें मोठा बहु वेडका येई.

मला फारच त्रासदायक खोकला होऊन व बरगड्यांत फारच वेदना होत व दम बरोबर लागत नसे. मी फारच हलक झाले आणि दुकानांत आंत बाहेर करण्याचा माझा तकवा अगदीं निघून गेला. सन १८९१ च्या दिसेंबरांत माझ्या एका मित्रिणीनें मदर सिगेलचा क्युरेटीव सिरप ( माता- शिजलचा रोगहारक पाक ) बद्दल बरच गुणानुवाद गाईल्या मुळें मी तें औषध घेण्यास सुरू केलें. मी थोडें येव घेतल्या बरोबर मला बरेंच समाधान वाटलें आणि पुढें पंधरा दिवस औषध घेतलें नाहीं तरी मला बरें वाटत होतें. मला असा धीर आला ह्मणून मी अगदीं बरी होई तों पर्यंत ह्या औषधाचा उपयोग केला. आमचे चिरंजीव आरथरास एक वर्ष सतत जेवल्यावर जड झाल्या सारखें व वेदना होत होत्या, आणि पोटाची दुखटी होऊन खळगा पडल्या सारखें वाटे. त्याला हें औषध घेण्याची मी गळ घातली आणि त्याचा शेवट ह्मणाल तर माझ्या सारखाच झाला. मला पक्कें माहीत आहे कीं, ह्या प्रदेशांतल्या बऱ्याच मंडळीनें दुसरे नाना उपाय करून थकले व जेव्हा ह्या सिरपाचा ( पाकाचा ) उपयोग केला तेंव्हां तात्काळ गूण आला. ह्या औषधाचा ( ह्मणजे मा. सिगेलच्या सिरपाचा ) मला रामबाण गुण आला तो इतर पिडीतास ह्या मुळें यावा असें आपणास वाटत असेल तर हें पत्र आपण बेलाशक छापावें.

मी तुमची
( सही ) ( मिसीस ) एम वार्ड
१९४ डकसटन रोड
शडफर्ड नॉटिंगहाम
ता. १ ली माहे एप्रिल सन १८९२

मीसीस वार्ड बाई साहेब ह्या त्रासदायक व भयंकर रोगा पासून बऱ्या झाल्या ह्मणून आह्मी तीस अभिनंदन करितों. आपल्या आयुष्यांत सोळा वर्षांचा वाटा सतत शारीरिक व मानसिक वेदनेंत घालवावा ह्मणजे फारच खराब समजावयाचें. कुबेराचे सोबती होणें फारच थोड्याच्या ललाटीं लिहिलेलें असतें. परंतु सुदृढता ही सूर्यप्रकाशा सारखी सर्व जगभर जिकडे तिकडे सारखी पसरते तद्वत् ही पसरली पाहिजे. ही कमी राखावी हें त्याला अवगत आहे. तर तो त्याची काळजी घेईल व तो दूर झाल्यास आपल्या स्वाधीन करून घेईल.

ह्या बाईचा रोग पचनीय पिंडाचा ह्मणजे अग्निमांद्य व अजीर्णाचा होता, जो रोग फारच धोक्याचा व दुःख देणारा आहे, कारण कीं ह्या रोगाचा पगडा इतका बसतो कीं शरिरांतलीं सर्व अंगें ह्याच्या बळी पडतात व रक्ताभिसरणामुळें ह्या रोगाचें विष सर्व शरिरांत पसरतें. ह्या रोगाचें मुख्य कारण निरनिराळ्या नांवानें होणारे परिणाम व चिन्हें हीं होत. तो जें औषध सांगते त्याच्या गुणाची ज्यास चांगली माहिती झाली आहे त्यास नवल वाटण्यास नको. मोठ मोठाले असाध्य रोग ह्या औषधास शरण येतात.

आमचे वीर जे आपल्या गुहेंत कसा तरी वेळ काढीत होते. त्यास बाहेर निघून जाण्याची गुरुकिल्ली माहित नव्हती.

जर ह्या ओळी अवलोकन करणारे दुःखाचे गुलाम झाले असतील तर त्यास तसें राहण्यास कांहीं कारण दिसत नाहीं

तिच्या सचोटीच्या आटोक्यांत लिहिलेल्या पत्रा वरून रोगांचें शमन कसें होईल ह्याचा रस्ता दाखवून देतों. हें आमच्या पत्रव्यवहार करणाऱ्या गृहस्थाच्या लेखा वरून समजेल.

H. D.

## विजया दशमीचें सोनें

ODE TO THE WEST WIND.

O wild West Wind, thou breath of Autumn's being,
Thou, from whose unseen presence the leaves dead
Are driven, like ghosts from an enchanter fleeing,
Yellow, and black and pale, and hectic red,
Pestilence-stricken multitudes: O thou
Who chariotest to their dark wintry bed
The winged seeds, where they lie cold and low,
Eeach like a corpse within its grave, until
Thine azure sister of the spring shall blow
Her clarion o'er the dreaming earth, and fill
(Driving sweet buds like flocks to feed in air)
With living hues and odours plain and hill:
Wild Spirit, which art moving every where:
Destroyer and Preserver; Hear, O hear!

॥ पश्चिमपवनगीत ॥

पश्चिमपवना! घे घे अव्याहतगति फिरे जगीं बापा ॥
निःश्वास शरदृतुचा तू; निवव्रो मारुता ॥ जगत्तापा ॥ १ ॥
काळीं पिवळीं तांबुस पांडुर पर्णें वसुंधरा वसना ॥
ल्याली चित्रविचित्रा; ही दिर्घसरित् गमे तिची रसना ॥ २ ॥
अदृश्यरूप तू परि तरुपर्णें समूह तुजपुढें पळतो ॥
मंत्राक्षरि मंत्रानें न ठरे जेवी पिशाचगण पळतो ॥ ३ ॥
व्याधिग्रस्त तयांतिल कुटिल शतावधि विचित्रवर्ण शरें॥
उडवुनि तुझिया रेंहें प्रभुसत्ता कार्य को णतें रचितेः ॥ ४ ॥
वाहन होसि समीरण! तरुबीजा न्यावयासि दूरवरी ॥
मास चतुष्टय निजतें वाटे तें कप गूढ महादरीं ॥ ५ ॥
निश्चेतन शवेंसे हें; पावस्तदूवें विमल मधुवायु ॥
निद्रित भूला देतो दुंदुभिनादें जणो नवें आयु ॥ ६ ॥
तद्बीज जन्य लवुतरु वाटे तत्सवनीं नभीं धावे ॥
सत्पर्ण रुचिर कांती, सुमगंध न तेववां वनीं मावे ॥ ७ ॥
उद्दाम मरुद्देवा! अप्रातिहतगाते असे तुझी मान्या ॥
संहर्ता रक्षक तू ; ऐके महत्व विभो! असामान्या ! ॥ ८ ॥


वऱ्हाडसमाचार

मिती चैत्र वद्य १० शके १८१६


वऱ्हाडांतील फारेस्ट खात्याचे जे मुख्य अधिकारी आहेत त्यांच्या कडून आह्माकडे एक गोष्ट वर्ष दीड वर्षां पूर्वी प्रसिद्ध करण्या साठीं आली होती ती गोष्ट इतकीच होती कीं डेहराडून येथें सरकारी फारेस्ट स्कूल आहे आणि त्या संस्थे विषयीं माहिती एका छापील पुस्तकांतून मिळेल. फारेस्ट कडील अधिकाऱ्यांनीं लोकहिता साठीं ही कळकळ ठेविली हें पाहुन आम्हास आनंद वाटला. दगडा पेक्षां वीट बरी ह्याच मथितार्थ खरा. चार रस्ते जेथें फुटतात तेथें फळ्या वरील हस्ताकृती जशी रस्ता दाखविते त्या प्रमाणें फारेस्ट अधिकारी वागले हें कांहीं थोडें नाहीं.

ही फारेस्ट शाळा इंडियांत एकच आहे आणि ती डेहराडून येथें हिंदुस्थानच्या एका कोंपऱ्याला आहे. येथील अभ्यासक्रम दोन वर्षांचा आहे आणि फारेस्ट खात्याला आवश्यक विषय तेथें चांगले शिकविले जातात. या शाळेंत जाणाऱ्या विद्यार्थ्यांस सरकारी चाकरीच्या दृष्टीनें भावी फायदे पुष्कळ आहेत. प्रथम तेथें शिकलेल्या लोकांची फारेस्ट खात्याला फार जरूर आहे. जरूरीच्या मानानें उमेदवारांचा भरणा थोडा असतो. विद्यार्थ्यांला घर सोडून लांब परकी लोका मध्यें रहावें लागतें. शरीर सामर्थ्याची देणगी ईश्वरानें पूर्वीच दिलेली पाहिजे आणि पैशाचें साह्यही पुष्कळ लागतें. या तिन्ही गोष्टी अनुकुल ज्यास आहेत असे गृहस्थ या शाळेंत जाण्यास पात्र आहेत. आरंभीं ६१ विद्यार्थी सन १८९२ साली या शाळेंत गेले त्या पैकीं एक जण प्रकृति नीट नसल्या मुळें घरीं परतला आणि एकजण पटकीनें निवर्तला. बाकी ५९ पैकीं ५२ विद्यार्थी परीक्षा पसार होऊन आपापल्या प्रांतांत परत गेले. या शाळेंतच विद्यार्थ्यांची राहण्याची व खाण्यापिण्याची सोय होत असते. येथील अभ्यास क्रमांत शारीरिक श्रमाचे खेळ व शिकार हे मुख्य विषय आहेत. नेहमीं रानांतून डोंगरांतून फिरावें लागतें आणि त्या मुळें शरीरांत एका प्रकारचा

टणकपणा व मजबुती येते. या शाळेंत हिंदु, ख्रिश्चन व मुसलमान विद्यार्थी एक मतानें वागतात आणि त्यांच्यांत परस्पर वळणवळण व एकोपा विशेष वाढते हा अप्रत्यक्ष दुसरा फायदा आहे. या शाळेंत कांहीं विद्यार्थी आमच्या प्रांतातून जावेत अशी आमची उत्कट इच्छा आहे आणि आमच्या मित्रीला आम्हास व गोष्टीची फार जरूरी आहे. परंतु आमची स्थिती अगदीं चमत्कारिक व परस्वाधीनपणाची आहे. द्रव्य बळ, शरीरबळ, व मानसिक दृढनिश्चय हीं साधनें एकत्र होणें संभव नाहीं. आमची फारेस्ट आफिस कान्सस विनंती आहे कीं त्यांनीं वाटाडेपणा पूर्वी पत्करला आहे त्या बरोबर येथून डेहराडूनला जाणाऱ्या विद्यार्थ्यांस उत्तेजनार्थ कांहीं स्कालरशिपा सरकारांतून ठेवाव्या. हा मार्ग इतर विद्याकला संबंधानें प्ररूढ आहे तेव्हां फारेस्ट कडील विशिष्ट विद्यादानाकडे सरकार उदारहस्त पुढें करण्यास मागें घेणार नाहीं परंतु फारेस्ट आफिसरांनीं हें काम हातीं घेतलें पाहिजे.

ग्लाडस्टन साहेबांनीं राजिनामा दिला तरी त्यांचें अलौकिक वक्तृत्व, विलक्षण बुद्धिसामर्थ्य, प्रजापक्षीय मतें, अद्भुत योजना शक्ति व अत्यंत वंद्य आत्मसंयमन इत्यादि गुणातिरेकानें त्यांचें वजन लोकांवर कांहीं अनुपम व अपूर्व आहे. अगदीं वृद्धापकाळा पर्यंत त्यांचें चरित्र म्हणजे सर्व राष्ट्राचा इतिहास आहे. ग्लाडस्टन लोकाचे प्राण होते एवढेंच नाहीं तर त्यांच्या असामान्य कर्तृत्वानें सर्व राष्ट्राचा राजकीय इतिहास बदलला. असा लोकमान्य, उदारचरित व राज्यकर्ता पुरुष त्या देशांत कित्येक पिढ्यांत उपजला नाहीं असें तिकडील पत्रकार म्हणतात. त्यांच्या अंगचे कांहीं गुण निरनिराळे आढळतील परंतु हा गुणसमुच्चय एकत्र क्वचित् आढळतो. ग्लाडस्टन साहेबांच्या अतुल देशसेवेनें लोकवृंद फार आनंद पावला व त्यांच्या मनांत ग्लाडस्टन विषयीं पूज्यभाव व भक्तिप्रेम होतें त्याला आतां भरती आली आहे. राजिनामा दाखल केल्या पासून त्यांच्याकडे प्रेमदर्शक देणग्या व विनंतिपत्रें हीं हजारो येत आहेत. कित्येक ग्लाडस्टन साहेबांच्या समागमीं असणार लोक ढळढळा रडले. लोकप्रेम अत्यंत उचंबळलें असून त्या आनंददुःखाच्या लाटांत ग्लाडस्टन व लोकसमूह वाहवला आहे. सारांश हाच कीं, देशसेवेचें बीज फार विलक्षण आहे गुणाकडे लोकसमूह धांव घेतो आणि अखेर गुणिजन सर्वत्र पूज्य होतो. इंडियांत ग्लाडस्टनच्या तोडीचे लोक नाहींत असें नाहीं. फक्त तसा अनुकूल योग व कालमहिमा अद्याप जुळून येत नाहीं तथापि देशसेवेचें ब्रीद प्रत्येकानें पाळावें म्हणजे सर्व ऋद्धि सिद्धि आपल्या देशांत पाणी भरतील आणि तो देशभक्त यथाकाळ लोकमान्य होईल.

सर वेस्टलांड यांनीं आपल्या बजेटांत 'दुष्काळ निवारण फंड' सफा बुडविला. आणि त्याच्या करितां लार्ड एल्जिन, सर इक्लिपट इत्यादिकानीं मान्यता जोरदार व कुटिल भाषणानीं दर्शविली. पण यंदा मध्यप्रांतात गव्हाचें पीक कित्येक ठिकाणीं अगदां आलें नाहीं त्यामुळें अन्नाचें दुर्भिक्ष कांहीं स्थळीं झालें आहे. दुष्काळ होळे केव्हां पडेल याचा नेम नाहीं तेव्हां सरकारनें या भावी दुष्काळा मुळें मरणासन्न होत होत चाललेल्या मुलामाणसांच्या संरक्षणा साठीं काय योजना केली आहे! दुष्काळा निमित्त फंड होता तो बंद केला. हा अन्याय एखाद्या सत्कार्या साठीं झाला असता तरी हरकत नव्हती. युरोपियन आफिसरांस कांपेन्सेशन अलावन्स देण्याला सरकारनें पूर्ण निश्चय केला आणि तो प्रजेच्या तोंडची भाकर ओढणाऱ्या करतां तडीस नेला हें अपकृत्य सामान्य नाहीं युरोपियन आफिसर त्या अलावन्सा शिवाय मरत नाहींत शिवाय सर्व गव्हर्नमेंटचा दिवसेंदिवस खजिना रिकामा आहे अशा वेळीं चैनबाजींत व सुखविलासांत आयुष्य घालविणाऱ्या आफिसरांना पैशाच्या पैशा पगार मिळत असतांनाही नवीन भर घालावी हें आमच्या देशाचें दुर्भाग्य होय! आपलपोटेपणाची कडेलोट सरकारनें केली आहे या अनीतीचें प्रायश्चित्त कालावधीनें राज्यकर्त्यांस भोगावें लागेल.

अमदाबादच्या गोऱ्या पलटणी पैकीं एक सोल्जर दारू पिऊन धुंद झाला आणि त्या मद्याच्या निशेंत तो इतका बेफाम झाला कीं त्यानें तीन गोळीबारांनीं दोन अधिकारी मृत्युंगत व तिसरा घायाळ केला. त्याच्या अपराधाची चौकशी होऊन त्यास देहान्त शिक्षा गेल्या १३ वे तारखेस दिली. हे खून त्यानें नेटिवांचे केले असते तर कदाचित तो सुटला असता किंवा निदान सुळावर फाशी गेला नसता. ओहरा नांवचा हा सोल्जर होता. त्याला त्याच्या कर्तीची आठवण कांहीमात्र नव्हती परंतु पश्चात्तापानें विव्हळ होऊन तो मोठ्या कळवळ्यानें आपल्या पलटणीच्या लोकांस शेवटचा निरोप सांगू लागला कीं:— वेळेवर जागे व्हा. मद्यपानाचे भयंकर परिणाम मी भोगीत आहे ते पहा. पलटणींत बहुतेक अपराध मद्यपानामुळें घडतात. मला देहान्त शासन होत आहे हें यथायोग्य आहे." हे वरील उद्गार मद्यपी लोकांनीं रात्रंदिवस ध्यानांत धरावे आणि त्यापासून शहाणपण शिकावें.

हल्लीं 'वकिली'चा बिन भांडवली व्यापार इतका तेजीवर आहे कीं ऋणको किंवा धनको मरो अथवा तरो पण वकिलाची फी दिलीच पाहिजे. मनुष्यस्वभावच विलक्षण आहे कीं आपल्या विरोधी पक्षावर कायद्यानें चाल होत असली म्हणजे कांहींमात्र गम खावयाची नाहीं. एकमेकांचें उखळ फुटून तुकडे होई पर्यंत उभयतांनीं निकरानें लढावें आणि वकील व सरकार यांची भरती करावी. वकिलांची मगरमिठी किती धननाशक व अन्नाचा मोताद करणारी आहे हें गांजा कमिशना समोर साक्ष देणाऱ्या एका वकिली गृहस्थानें सहजी विनोदानें कळविलें तें अत्यंत उपदेशपर आहे. लाहोर मुक्कामीं तो कमिशनच्या गृहस्थास उद्देशून म्हणाला कीं आपण इकडून तिकडे ठिकठिकाणीं फिरून अफू, गांजा वगैरे किरकोळ क्षुद्र अपायकारक पदार्थां पासून लोकांचें संरक्षण करूं पाहतां हें कांहीं ठिक नाहीं. मोठा भयंकर दगा काय तो वकिला पासून आहे आणि जों पर्यंत त्यांचा व्यापार अप्रतिहत व मनसोक्त चालला आहे तों पर्यंत देशाची सुधारणा होणें नाहीं." वरील उद्गार एका भल्या विचाराचे द्योतक आहेत परंतु मांडलेल्या सुधारणेच्या चक्राला अन्य गती मिळे पर्यंत ही वकिलांची घोरपड कायम व चपल राहणार आहे.

येवल्याचा दंगा बराबर मिटला आहे खरा परंतु त्याच्या मुळें जी अनर्थश्रेणी उसळली आहे ती फार हृदयद्रावक आहे. हिंदु यवनांचा चुराडा सरकारें आरंभला आहे. जुनी पोलिस फौज ठेविली आहे तिचा खर्च देखील बरोबर वाटत नाहीं. येवल्याचे मुख्य मुख्य हिंदु लोकांवर खटले केले आणि त्यांत ते दोषमुक्त झाले तरी कित्येक हिंदुद्वेष्ट्या, पक्षपाती व क्रूरकर्मी अधिकाऱ्यांची तृप्ति नाहीं. मुंबई सरकारचे वारंवार ठराव बाहेर येतात त्यांत सरकारची करडी नजर हिंदु लोकांवर आहे असें स्पष्ट दिसतें. सरकारचे डोळे म्हणजे त्यांचे हाताखालील अधिकारी आहेत परंतु दंग्याच्या बाबतींत वरिष्ठ सरकार अंतर्वृत्तानें खालील लोकांच्या एकतर्फी विचारांवर विश्वास ठेवितें म्हणून फार विस्मय व दुःख वाटतें.

पुण्यास दुसऱ्या मारुतीच्या पालखी संबंधानें कांहीं चकमक घडण्याचा संभव गेल्या पौर्णिमेस होता परंतु योग्य बंदोबस्ता मुळें येवल्या सारखा प्रकार घडला नाहीं. पण अलीकडे हिंदु मुसलमानांमध्यें सर्वत्र लहान मोठे तंटे प्रचलित झाले आहेत. स्वरूप भयंकर नसलें तरी किती पळ घांत तें भयंकर होईल याचा नेम उरला नाहीं. सरकारी अधिकाऱ्यांची गलती, एकतर्फी कल व गैर वर्तन हींच खरीं कारणें आहेत. अशा प्रसंगाला आपसात दुही व फाटाफूट व्हावी व हिंदु मुसलमानांनीं लढावें असें शहाणा मनुष्य म्हणणार नाहीं. सध्यां दंग्याचें रण माजलें आहे तें सरकारनें अगोदर विलयास नेलें पाहिजे. या उभय जातींच्या लोकांमध्यें पंच व कमिट्या नेमून त्यांच्या मार्फत जुने वंशपरंपरा चालत आलेले हक्क कायमचे ठरवावे आणि जातीचे तंटे त्यांनींच निकालास लावावे. हाच एक चांगला उपाय दिसतो. त्याचें अवलंबन करणें सरकारच्या मर्जीवर आहे.

नवीन क्रिमिनल प्रोसिजरचा मसुदा इंडिया कायदे कौंसिला समोर आहे. या बिलांत दंग्याची माहिती अगाऊ सरकारास वेळेवर देण्या विषयींची प्रत्येक नागरिकावर जबाबदारी ठेविली आहे या कर्तव्यांत चूक झाली अगर विलंब लागला तर तो इसम गुन्हेगार होऊन शिक्षेस पात्र ठरतो. या बिलाची खरोखर अंमलबजावणी येवल्याच्या प्रकरणांत केली तर पहा कसा अनर्थ घडला आहे तो! ज्या हिंदूंनीं तार करून कलेक्टरांस दंगा होण्याची वर्दी दिली त्यांच्या वर खोटी माहिती दिल्याच्या आरोपा वरून पुढें फौजदारी करण्यांत आली. परंतु ईश्वरसत्तेनें पुढें दंगा खरोखरीच झाला म्हणून ते इसम सुटले. बातमी द्यावी तर खोटी बातमी दिल्याच्या संशया वरून फौजदारी आणि मौनव्रत धरण करावें तर या बिला प्रमाणें निराळा गुन्हा; सारांश न्यायानें व कायदेशीर वागणाऱ्यांस देखील एकीकडून आड व दुसरीकडे विहीर असा बिकट मार्ग आहे. तेव्हां तात्पर्य एवढेंच कीं हा नवा मसुदा सध्यां आहे तसाच पसार होऊं देऊं नये.

विलायत सरकारच्या खजिन्यांत तूट आहे पण ती आटोक्यांतली आहे. इनकम ट्याक्स (उत्पन्ना वरील कर) १ पेनीनें वाढविला व दारूवरील कर वाढविला. विलायतेंत १६० पौंडा वरील उत्पन्नावर कर आकारित असत ती हयत्ता १६० पौंड केली कारण त्या सरकारचा असा नियम आहे कीं नित्याच्या आवश्यक पदार्थांवर कर बसविले किंवा वाढविले तर इनकम ट्याक्सला योग्य ठरलेली उत्पन्नाची रक्कम वाढवावी. पण हिंदुस्थानाला अर्थशास्त्र निराळेंच लागू आहे. या देशांत ५०० रुपया वरील उत्पन्नावर हा इनकम ट्याक्स आकारला जातो. परंतु मिठावर कर बसविला व वाढविला व नवीन जकातीच्या कायद्यानें नित्याच्या वापरण्यांतल्या पदार्थांवर शेकडा पांच जकात बसवून हा अप्रत्यक्ष कर बसविला तथापि देखील ५०० रुपये उत्पन्नाची मर्यादा राष्ट्रीय सभेच्या म्हणण्या प्रमाणें १००० रुपये केली जात नाहीं हें नवल आहे! आणि आरंभीं इनकम ट्याक्स बसविला त्या वेळीं ५०० रुपये सालिना उत्पन्न या कराला पात्र नव्हतें तरी धारणी फार महाग झाल्या आहेत व साधारण प्रपंचवाल्याचा ५०० रुपयांत फारच पराकाष्ठेनें निर्वाह चालतो असें असून देखील ही रुपये ५०० ची मर्यादा वाढली जात नाहीं हा केवढा अन्याय! क्षणभर तूट खजिन्यांत फार मोठी आहे हें कारण अनिर्वाह मानलें तर युरोपियन आफिसरांस हुंडणावळीच्या भावांतली कसर भरून देण्याचा ठराव लागू केला हा स्वार्थसाधु आपलपोटेपणा किती अनर्थावह आहे हें शहाणें व न्यायी म्हणून नांवलेल्या सरकारास कळत नाहीं असें नाहीं.

शेतकऱ्या साठीं पेढ्या पाहिजेत आणि ही आवश्यकता वऱ्हाडांत जितकी आहे तितकी इतर ठिकाणीं असेल असें आम्हास वाटत नाहीं. सरकारी पेढी निघेल तर फार नामी. सरकारांतून जमीनदार रयतेला कर्ज शेतकामा साठीं देण्या विषयीं कांहीं योजना झाल्या आहेत. परंतु त्यांची उपयुक्तता व्हावी तशी होत नाहीं सरकारी पेढी विषयीं लोकांचें अज्ञान, पैसा कर्जाऊ मिळण्याला लागणारा द्राविडी प्राणायाम, पैसा कर्ज किती द्यावा या विषयीं अपुरे धरबंध इत्यादि कारणामुळें या सरकारी पेढीची योग्य अंमलबजावणी व लोकांचा लाभ म्हणण्या सारखा होत नाहीं. शेतकामा साठीं सरकारांतून जो कर्जाऊ पैसा दिला जातो तो आज थकलेल्या कुळास पहिलें कर्ज काढण्याच्या वेळीं देता येतो. परंतु जें कुळ अगोदर कर्जदार आहे आणि ज्याच्या मागें सावकाराचा तगादा लागला आहे अशा मनुष्यास आपल्या स्थावर इस्टेटीच्या बळावर कर्जमुक्त होऊन कमी व्याजाच्या रकमेची फेड हळू हळू करण्यास कांहींच सवड मिळत नाहीं. तो

इतका शरणंगत निरुपाय, व अक्कलशून्य होऊन जातो कीं त्याच्या जवळ इस्टेट असूनही त्याला कर्जाची फेड करण्यास कोठे चांगला आश्रय मिळत नाहीं. व्याजाचे दर अगोदरच फार भारी म्हणजे शेकडा सालीना २४ प्रमाणें आहेत तेव्हां अशा व्याजाच्या चक्राखालीं सांपडलेल्या जमीनदारास कांहीं ऋणमुक्त होण्याचा उपाय नाहीं. मुद्दल पुढें व्याज थोड्या प्रमाणें धांवत असतें. सरकारातून कांहीं तजवीज होण्याचा संभव दिसत नाहीं परंतु अशा वेळीं धनिक लोकांनीं शेअर्स काढून मोठें भांडवल उभारलें तर कंपनीचा धंदा चांगला चालेल आणि व्याजाचे दर जरा उतरतील आणि पुष्कळ कर्जवान पण इस्टेटवाल्या लोकांचें जन्माचें कल्याण होईल. निजाम सरकारची इंडिया सरकाराकडे या प्रांता बद्दल ४० लक्ष जमा आहे. ही रक्कम वरील प्रकारच्या पेढी स्थापण्यांत घातली तर रयतेचा बचाव होऊन बचेत रकम योग्य कामीं लागेल. वऱ्हाड प्रांत परत मागणें तर फार दुरवरचा पल्ला आहे परंतु निजाम सरकारनें वऱ्हाडच्या रयते साठीं इंग्रज सरकारास वर सूचविल्या प्रमाणें एखादी शेतकऱ्याची पेढी स्थापण्यास आग्रह केला तर इतकीं वर्षें स्वामित्वाचा म्हणून जो काभाग निजाम दरबारास मिळतो तो अन्यथा नाहीं असें आम्ही मानूं

The Berar Samachar

MONDAY APRIL, 30 1894

The rendition of Berar is a question newly opened by Sir Roper Lethbridge in the Asiatic Quarterely. The province is a 'trust' with the British Government and the time has come when the Government should restore it to its proper ruler. The whole debt is discharged. Moreover there is a balance of some forty lacs of Rupees in favour of His Highness the Nizam. The province is under a double Goverument. The administration is British but the surpluses in its revenue go to swell the Nizam's treasuries from year to year. The revenue is realized from the purse of the people and often times their best interests are sacrificed to to pay off the largly spending British administration, to defray the expenditure of the Hyderabad contingent forces and lastly to send annually not less than 10 lacs of Rupees to the Nizam as '*King de jure.*' The Government of India is politic enough to silence all questions about the restoration. There are no two opinions about the good faith of the Paramount power but some people object to the restoration on the ground that the ryots will suffer a good deal upon the return of the old *Monglai*. This objection is not altogether groundless but the Grand premier of the Hyderabad State had made an important declaration in this connection. We request our readers to to take time to think over the weighty words of that late Prime Minister SIR Salar Jung who was conscious of this objection to his demand for he wrote in 1866 to the British Resident:—

"It may be possibly be objected that the restoration of Berar to the Nizam would bring back the former misrule, & disorder; but you may have observed that this has not been the case with regard to the restored districts of Raichoor Dharaseo, &c. in which the system of administration under the British Government is continued in all its main features; and not only so but the same system is being introduced into all the other districts under this Circar. In respect to Berar also, there would be little or no change in the system pursued and the native officials trained to the work under British officers would be either continued or sent into other districts to carry out the same system of administration."

We suppose for all practical purposes this is a conclusive answer to the objection. And this view finally settles the question for ever with a further prospect of improvement of the Nizam's administration.

A friend of ours writes to us thus on the subject of Import Duty on Cotton:—

"There is another subject of importance to which I should like to draw your attention, if you please. There is a great cry being raised against the exclusion of cotton duties. The cry is a cry in the wilderness. The Anglo Indians join you this time, because they want to throw the compensation question in the back ground' by directing public attention to another glaring subject. Whatever may be their object, certain it is that no ministry will give the least weight to your prayer. But I ask why should we pray, if the thing is in our hand and we can turn it any way we like. I think you all should resolve not to use English made cloth and yarn. This is the most constitutional and loyal way of doing the whole thing. Shut the nose, the mouth opens. But if your skin has grown so delicate that you cannot bear the rough local cloth, if you are not ready in short to undergo the smallest self sacrifice for your country's sake, then why should you have Congresses and meetings at all? It is the Congress people who must set an example to the people of foregoing the use of foreign cloth If they begin, people I am sure will follow them. The great consumers of Manchester cloth are those very people who profess themselves to be the representatives of the people. Suppose you spend Rs. 10 on cloth made in England. Well spend the same sum on local cloth. The difference will be: you will get some inferior cloth for the same amount. But can you not or should you not endure so much hardship for your country? If you want to be happy and prosperous you cannot succeed without enduring hardships. There is then work for you. If you all delegates begin to use native cloth, many people will follow you in course of time. You will thus bring pressure upon the people of Lancashire. They will at once fall at your feet and not only advocate the levying of import duties on English cotton goods but give support to your other demands also.

I depreciate the tendency to always depend upon the Government, even when we can do the thing ourselves And if the Congress is unable to do what it must be able to do the main reason is that the delegates do not do their duty and the result is the loss of real influence upon the masses. This is the grestest point to which you should in all seriousness divert your attention."

The following paras quoted fromthe Resident's remark on the destruction of wild animals and the prizes paid therefor will show how far the system for encouraging the destruction of wild animals is successful in Berar.

"The number of cattle destroyed by wild animals has increased from 1,350 to 1492 in 1893, but, as pointed out by the Deputy Commissioner of Wun district, the district most fatal to men and animals, this result may be due to better registration, and the fact must not be lost sight of that many of the animals reported to have been *killed* and eaten by wild animals have in reality been only eaten after dying a natural death from old age in the jungles, where they had gone to graze.

The amount paid in rewards for wild animals has decreased from Rs 4,417 3 0 to Rs. 3,499 8 0. The Commissioner reports that this diminution is due to the fact that the rainfall of the year was abnormal and sinks impossible. The number of wolves killed has fallen from 153 to 131 in spite of the increase sanctioned last year in the scale of rewards; the number of men and animals killed by them is 4 and 344, as compared with 10 and 363 in 1892. The Commissioner has separately asked that the reward of Rs. 5 for hyænas be discontinued, and that for panthers be raised from Rs 15 to Rs. 20. The change has been foreshadowed in the reviews for 1891 and 1892, and will be sanctioned, 108 hyænas were killed in 1893 and 121 panthers, so that the improvement will not be expensive."

The idea of a religious endowment is not a novelty to India either past or present. We have traces of it even in olden times. But our system of endowing religious institutions with munificent and permanent grants was rather crude, im perfect and not productive of full benefits. The religion of India was never one worth mention. It was a tolerable mixture of all religious and their manifold sects; or rather two or more divergent religions coexisted and continue to coexist in India with that amiable spirit of toleration which is the chief tenet of the true philosophical Hindu religion In fact there never was one state—religion and hence the principle of religious endowments is not sound and systematic. Several and separate temples either Hindu or Mahomedan have been allowed Jahagirs or Inams for their permanent continance. The race and religion of the ruler generally determined the character of these grants though instances are not wanting to point out that Hindu and Mahomedan governors in India have fully favoured the rival institutions of anti-religiousists. Jahagir is a grant of a rent-free village or villages while Inam means a grant of one or more fields. We have nothing to say as to grants of a personal nature. Before the advent of the British rule good and noble service to the state was rewarded with such grants. They ran in the same family of the original donee. But when grants were made for public purposes, say either religious or charitable, they are clogged in course or time with so many restrictions that they have now become almost personal and are transmitted in the groove of a particular family. A fitting and exact description of such grants we find in the last Administration report from which we reproduce it below:—

"Grants to religious or charitable institutions by the sovereigns or their deputies are very numerous, none of them date from a time earlier than the 17th century, and most of them are under the seal of Aurangzeb to Muhammadans. Land has been made over rent—free for the support of many musjids, Hindu temples, holy places, tombs, dharamsalas (or hospitals) and shrines innumerable. Money payments from certain revenues have been allotted, and the right to collect dues from specified villages. Where the grants were for religious rites, liturgies, or menial services at an institution, they have shown a tendency perceptible even in Christian countries, to merge into personal estates, vesting in an ecclesiastical family or community. The services have become obsolete, and the buildings decayed These grants or inams are now continued on condition of service and maintenance of buildings. Other grants are personal by origin. It was very common for the Mogul rulers, and for the Mahrattas, while they had power to make petty allotments of rent free land for the maintenance of persons whose piety, poverty or learning gave them some claim. Waste land was usually granted, often on a lifetenure only, but a little interest got the rent free estate continued to heirs; and tenures of this sort are among the oldest in the province. There seems to have been a tacit understanding that grants of this kind once bestowed, should not lapse."

Now, an institution stands the test of time and progress if it improves and keeps pace with the progress of the world. One that remains stationary, unchanging and conservative continues no useful existance and becomes a source of abuse and evil results. Our only contention is that a time has come when the old religious endowments should be remodelled and continued on progressive principles. There should be a public inquiry as to whether these grants are rightly employed for the useful and charitable purposes for which they were started. Any misuse or misappropriation that may come to light should be at once discontinued. We are hopeful that an inqury through a public commission will set right the whole matter and an immense fund that is decaying und the palsy hand of time will be utiliz for the real good of the people.

## वऱ्हाड.

हवामान— ऊन फार प्रखर असुन उ[illegible] ह्यामुळें अतिशय गुदमरतें. उष्णतामापक [illegible] त्रांत पारा ११२ अंशावर चढतो. यंदा पा[illegible] वसा कमी झाल्या मुळें पुष्कळ ठिकाणीं पाण्याविषयीं हाकाटी आहे. रोगराई म्हणण्या सारखी विशेष नाहीं.

बाळापूर तालुक्यांतील चरणगांवास आग लागून निम्मा गांव जळून फस्त झाला !

अडगांवास कुणबी माळी वगैरे लोकांमध्यें बहिष्काराचें प्रकरण इतकें माजलें आहे कीं सार्वजनिक शांतता बिघडेल अशा भितीनें मुख्य मुख्य ग्रामस्थ लोकांपासुन जामीन मागितले आहेत.

प्रमोदसिंधू करून कलेंत गेल्या २१ वे तारखेस उमरावती हायस्कूलच्या विद्यार्थ्यांनीं संस्कृत विक्रमोर्वशी नाटक व मराठींत एक फार्स असे दोन प्रयोग करून दाखविले ते फार उत्तम वठले. अल्प काळांत तयारी चांगली करून निरनिराळ्या पात्रांनीं आपापली कामगिरी वर्णनीय प्रकारें बजावली. विद्यार्थ्यांचे नैसर्गिक, अभिनय, स्वाभाविक मनोहरवृत्ती, रूपसंपन्नता, शारीरिक सौष्ठव, गोड व रसाळ भाषण, कालिदासा सारख्याची कविकृती इत्यादि गोष्टींनीं प्रेक्षकसमूह आनंदित व प्रफुल्लित झाला. पण असे प्रयोग करण्यांत विद्यार्थ्यांचें कांहीं नुकसान होत नसेल तर बरें !

## वर्तमानसार.

आगबोटीचा वेग किती जलद होणार तें कांहीं समजत नाहीं विलायतेंत एका कंपनीनें दर तासांत ३० मैल चालणारी एक नवीन आगबोट हल्लीं काढिली आहे. ह्या आगबोटीच्या चाकांचे दर मिनिटास १७० फेरे होतात; इतकी तीव्र गति त्याला दिल्ली आहे!

२२० बायकांस १ पुरुष—एका जर्मनतत्ववेत्त्यानें असें शोधून काढिलें आहे कीं आजपासून ३००० हजार वर्षांनीं २२ बायकांस १ पुरुष ह्या प्रमाणें बायका जास्त व पुरुष कमी अशी स्थिती होईल.

१५ मैल लांबीचा अर्ज—दारू व अफू यांची बंदी करण्या बद्दल एक प्रचंड अर्ज चिकागो येथील प्रदर्शनात मांडण्यांत आला होता; हा अर्ज जगावरील सर्व राजांस असून तो आठ वर्षे सह्यासाठी फिरत होता. त्यावर ५० देशांतील लोकांच्या ४० लक्ष सह्या आहेत. हा अर्ज सर्व देशांच्या राजांकडे पाठविण्यांत येणार असून पुढें तो विलायतेतील पदार्थ संग्रहालयांत ठेवण्यांत येणार आहे.

हैदराबादेंत जुलूम—हैदराबादेंत हिंदुलोकांस चेतविणारें मशिदींचें एक खटलें उपस्थित झालेंच आहे; ह्याच संधीस नवीन प्रधान नबाब विकार उलअमरा व यांचे हुकमानें एक जुलमाचा प्रकार झाल्याची तार "हिंदु" पत्रांत छापली आहे; त्यावरून समजतें कीं—एका मारवाड्यावर कोर्टांत खटल्याचें काम चाललें असतां दिवाणांनीं पोलिसपार्टी पाठवून त्याला व त्याच्या माणसांला घरांतून बाहेर काढिलें व घरांतील चीजवस्त; लत्तेकपडे; दागदागिने; हिशेबाच्या वह्या वगैरे सुमारें अर्धालक्ष रुपयांचे किंमतीचे ७०।८० गाड्या सामान जप्त करून नेलें. हा मारवाडी तुर्त हैदराबाद सोडुन शिकंदराबाद येथें जाऊन राहिला असून ह्या खटल्यानें लोकांत चळवळ होऊन गेली आहे. मारवाड्यानें हें खटलें सरकारांत नेलें असून दिवाणांवर २ लाख रुपये नुकसानीचा दावा केलेला आहे.!

मि० क्राफर्ड (वड्या क्राफर्ड साहेबांचे चिरंजीव) यांस हिंदुस्थान सरकारच्या फॉरेन अफिसांतील डेपुटी सेक्रेटरी नेमिलें, असें टा० इं० वरून समजतें.

नरमांस भक्षक मनुष्य—बंगाल्यांत बेलासर येथें अपूनायडू नांवाचा एक मद्रासी ब्राह्मण ४ कुत्र्यांनिशी आला आहे. बाहेर मसणवटींत त्याचें वास्तव्य असून तेथें मृतमनुष्यांची प्रेतें वगैरे फाडून खाण्याचा क्रम त्यानें चालविला आहे! प्रेत शिजवून त्यांचे तेल तो आंगास लावित असतो. या नरराक्षसास पाहण्यास लोकांच्या झुंडोच्या झुंडी गेल्या होत्या असें समजत !!

बंगाली भविष्य—बंगाल्यातील प्रसिद्ध जोतिर्विद तारिणी प्रसाद यांणीं चालू सालचें भविष्य वर्तविलें आहे, त्यांत पुढील गोष्टी आहेत—मुंबई, मद्रास, व पंजाब येथील स्थानिक सरकारें प्रजेच्या संबंधानें चांगली वागतील. इंग्लिश आणि फ्रेंच यांचा तिढा पडून अकस्मित लढाया होतील व रक्तपात होईल—इंग्लंडा बरोबर राशियाची लढाई होणार नाहीं. फ्रान्स आणि राशिया यांचे मेतकूट जमेल—काश्मिरच्या राजाचें नशीब उघडेल. ११२ मांडलिक राजांना त्यांच्या प्रधानांची कृत्यें भोंवतील—पुढील वर्षी कापूस, व कापड यावर जकात बसेल—व्यापाऱ्यांची दिवाळी निघेल. पजेला अन्न; कर, आणि वन्यश्वापदें यांचा फार उपद्रव होईल. तारकेश्वर येथील देवाचा खजिना लुटणाऱ्या लोकांचा फडशा उडेल व नवीन होणारा महंत मरेल. हिंदुस्थानांत आणखी एक कमिशन बसेल व तें इन्फ्ल्यु-एंझाच्या साथी प्रमाणें देशभर पसरेल.

पोलिस पुराव्याची तऱ्हा—ठाणें येथील गेल्या सेशनांत एक खुनी खटला आला होता त्यांतील तिन्ही आरोपी सेशन जज मि० क्राफर्ड यांणीं सोडुन दिले. ज्या मनुष्याचा खून झाला ह्मणून पोलिसांचें ह्मणणें होतें, तो मनुष्य मिळत नाहींसा झाला असून त्याचा पत्ता नाहीं. तो मेला असें शाबीत करण्याकरितां पोलिसानें काहीं हाडें एकत्र करून मयताचा सांगाडा ह्मणून कोर्टापुढें आणिला होता. त्याची परिक्षा ठाण्याचे डाक्तर कितीकर यांणीं करून जुरीस असें शाबीत करून दिलें कीं, पोलिसांनीं आणलेलीं हाडें निरनिराळ्या वेळीं मयत झालेल्या ३ मनुष्यांची असून त्यांत १ हाड जनावराचें आहे!! पोलिसानें मयताची गळून पडलेली ह्मणून शेंडी कोर्टापुढें आणिली होती; परंतु ती गळून पडलेली नसून कातरून आणलेली आहे, अशी डाक्तर यांणीं सूक्ष्मदर्शक यंत्रानें जुलाची खात्री केली त्यावरून पोलिस पुराव्याचा फज्जा उडून आरोपी सुटले.

रामेश्वरचा कालवा—सेतुबंध रामेश्वरचा खडक फोडून तेथें कालवा खणण्याच्या कामासाठीं तेथील सर्व्हे करण्यासाठीं सरकारच्या मरीन सर्व्हे कडील लोक गेलेले होते; त्यांचें काम या आठवड्यांत पुरें झालें, व ते इतक्यांतच मुंबईस येऊन रिपोर्ट प्रसिद्ध होईल. हा कालवा तयार झाला ह्मणजे सुएझ येथून मद्रास कडे व कलकत्या कडे जाणाऱ्या आगबोटीस सिलोन बेटास ३५० मैलांची प्रदक्षिण घालून जाण्याचा हल्लीं जो हिसका बसतो तो बसणार नाहीं. स० शो०

नुकतीच अशी एक चमत्कारिक गोष्ट घडून आली कीं, हंगेरिया येथील एका गृहस्थानें आपल्या बायकोचा घटस्फोट करून आपली १ वर्षांची मुलगी एका आप्ताजवळ ठेवून आपण अमेरिकेंत गेला. त्याच्या बायकोचाही कोंठ पत्ता नव्हता पुढें २० वर्षेंपर्यंत त्या गृहस्थास मुलीकडची विशेष हकीकत कळली नाहींच. ती मुलगी ज्यांच्या येथें ठेवली होती त्यांनीं तिचा १६ वर्षे चांगला सांभाळ केला परंतु पुढें ते नीट वागवीनात ह्मणून ती मुलगी तेथून निघून दैववशात् तिचा बाप होता त्याच गांवांत ती त्याच्या घराजवळ येऊन, कांहीं व्यापार करून राहिली. तिला आपल्या बापाविषयीं मुळींच माहाती नव्हती, व बापालाही मुलीकडील कांहीं हकीकत कळली नाहीं कांहीं दिवसांनीं साधारणपणें त्याची व तिची ओळख झाली व ती पुढें बरीच वाढत गेली. नंतर त्यानें विचारल्यावर त्याच्याशीं लग्न लावण्यास ती कबूल होऊन लग्न लागलें आपण उभयतां एकाच गांवचे आहोत यापेक्षां उभयतांना एकमेकाची विशेषशी कांहीं माहिती नव्हती. अशा स्थितींत त्यांना संतती झाली नंतर आतां तें बापलेकीचें जोडपें आपल्या गांवाला जावें ह्मणून गावीं आलें, तों त्यांचे खरें नातें बापाला समजतांच त्यानें तिला अमेरिकेस जाण्या विषयीं निरोप देऊन हा मजकूर गुप्तच ठेविला, आणि आपण आत्महत्या केली. ज्यावेळेस हकीकत कळेल तेव्हां काय करील तें करो.

विजापूरच्या रेल्वेवरील एका लहानशा स्टेशनावर एका सुस्वरूप तरूण व सवत्स स्त्रीवर स्टेशनच्या सर्व लोकांच्या विचारानें जुलूम करण्याविषयांची हकीकत लोकांत पसरली आहे. खरी असल्यास तो मोठी चमत्कारिक परंतु भयंकर दिसते त्या स्त्रीविषयीं स्टेशनच्या लोकांच्या मनांत पापवासना आल्यावरून मोठ्या शिताफीनें तिची गाडीची वेळ चुकवून एका कोटडींत तिला बसण्यास सांगून स्टेशन लहानच असल्यामुळें तेथें असलेले ते थोडेसेच लोक त्या खोलींत जाऊन तिच्यावर बळजबरी करण्याची त्वरा करू लागले. परंतु तिनें या गोष्टीस नाकारणी कबूली दाखवून खोलीच्या बाहेर येऊन दाराला कडी घालून त्या मडळीस आंत कोंडलें परंतु हात बाहेर काढील त्यावर दगड मारू लागली. त्यामुळें ते निरुपाय होऊन त्रासेल. परंतु त्या बाईचें मूल आंत राहिलें होतें, "तूं दार न उघडशील तर आम्ही तुझ्या मुलाला मारू" अशी त्यांनीं तिला धमकी दिली. तिनें साफ उत्तर दिलें, कीं "मी बाहेर पडले तेव्हांच मुलाची आशा सोडली आहे." हें ऐकून व तिचा हट्ट पाहून त्या राक्षसांनीं त्या मुलाचा जीव घेतला. तरी तिनें कडी ह्मणून काढली नाहीं. अखेर स्टेशनावर दुसरी गाडी येऊन थडकली पण सिग्नल देतो कोण, आणि पहातो कोण? अखेर गार्ड चालत स्टेशनावर आला तेव्हां त्या गार्डाला बाईनें सर्व हकीकत सांगून, त्या अधमाधमांनां पकडून दिलें. त्यांच्यावर खटला चालू आहे असें ह्मणतात. शिव! शिव! काय पापवासना? एकंदरींत बाईचा निश्चय वर्णनीय आहे. त्या अधमांनां मिळेल तेवढी शिक्षा थोडीच झाली पाहिजे. स०

सिकंदराबाद व हैदराबाद यांच्या दरम्यान ट्रामवे करण्याच्या बाबतींत मि. हाजी सजन व निजाम सरकार यांच्या दरम्यान पत्रव्यवहार चालू आहे.

निजामहैदराबादच्या हिंदूंच्या देवळाच्या जुन्या वहिवाटीस हरकत आणण्याचा व हिंदु लोकांस नाखुष करण्याचा दोष निजामांच्या दिवाणाकडे आहे असें तिकडच्या लोकांचें ह्मणणें आहे.

चालू वर्षाचा इंग्लंडचा बजेट पुढें आला. साडे चार कोटींचा तोटा आहे व त्याकरितां इन्कमटाक्स एक पेनीप्रमाणें वाढवून दारू व बीर यांच्यावरील कर वढविण्याचें योजलें आहे. तोट्याची रकम भरून काढून २९,००,००० रुपये शिल्लक ठेवण्याचें योजलें आहे. तोटयाचें कारण लढाऊ गलबतांची तयारी हें आहे. या व्यवस्थेस वर्तमानपत्रें बरें ह्मणत नाहींत.

दर तासांत साठ मैल चालणारी एक आगबोट एका माणसानें तयार केली आहे. यास कोळसा जास्त लागत नसून आगबोट तयार करण्याचा खर्चही फारसा जास्त लागत नाहीं, असें त्यांचें ह्मणणें आहे. ही आगबोट चालू झाली ह्मणजे इंग्लंड व हिंदुस्थान यांच्या दरम्यानचा दोन दिवसांचा रस्ता होईल व मग हिंदुस्थानांत युरोपियन लोकांच्या झुंडीच्या झुंडी येऊं लागून हिंदुस्थानच्या लोकांची फार वाईट दशा होईल.

सरकारांतून सुटलेले वेळोंवेळचे हुकूम सरकारी कामदारांस माहीत असलेच पाहिजेत व ते माहीत नाहींत अशी कोणा कामदाराची सबब कधींही ऐकली जाणार नाहीं असें पंजाबच्या ले. गव्हरनरानें आपल्या ताब्यांतल्या कामदारांस पुन्हा नुकतेंच सुचविलें आहे. असें पुन्हा सूचविण्याचें कारण काय झालें हें मात्र बाहेर आलें नाहीं.


## जाहिरात.

सर्वत्र लोकांस या जाहिरातीनें गुलाम यासिन वा। गुलाम रसूल वज्यान दुकान आकोट हे असें जाहिर करितात कीं, आमचा नोकर नावे रहीमानजी वा। याकुबजी मोमीण बाळापूरकर यास आह्मी नोकरीतून कमी केलें आहे. तो तारीख १० माहे मार्च सन १८९४ ई० आता सदरील तारखे पासून आमचे ज्याणी देणें वगैरे आहे त्या लोकांनीं सदरहू बाळापूरकर मोमीण यास आमचे देणेचा पैसा वगैरे काही एक देऊ नये. जर करितां कोणी दिला तर त्याज बद्दलचे जबाबदार आम्ही कोणच्याही प्रकारें नाहीं ज्याचा तो जबाबदार आहे म्हणून दिली जाहिरात तारिख २६ माहे येप्रील सन १८९४ इसवी.

सही

सही गुलाम यासीन वल्द गुलाम
रसूल वज्यान आकोटकर
दस्तूर सेलारआमद वल्द
सेरमहमद राहणार
बाळापूर.

NEARLY READY
**CRIMINAL COURT MANUAL.**
*for the*
Hyderabad Assigned Districts
by
Mr. R. Obbard
assisted by
Syed Meer Alum,

Containing the uncancelled Notifications of the Government of India extending Laws and promulgating Local Laws (with reprints of Forest Law, Abkari Rules, Municipal Act, Courts Law, Rules, regulating Legal Practitioners and other Local and Special Laws), the Notifications and rules published under the authority of the extended Laws, the uncancelled Circulars and Orders of the Government of India, Resident, Commissioner, and Judicial Commissioner relating to Crimial matters, and full information in regard to the prescribed registers, returns and forms, to be used in and by Criminial Courts, with notes by Mr. R. Obbard, and a copious Index.

PRICE RUPEES 5

Subscriptions registered by Syed Meer Alum at the office of the Civil and Sessions Judge, Amraoti Camp Berar.


☞ हें पत्र आकोलें येथें कै० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.